म.ग्रं.सं. वाचनालय, शाखा ठाणे
विषय : नाटक
दा.क्र.: २९८९९

२९८९९

IRBK-0121911

२९०७७
२६।७।८८

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible]
आ. क्र. २९०७७ नों. दि. २६/७/८८
वि. ... क्र. ...

# सौजन्याची

वसंत कानेटकर

IRBK-0121911

परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई – चार

**आवृत्ती पहिली**
७ डिसेंबर १९८६

**सरकारी प्रमाणपत्र**
१२८७/१९८६
१८-११-१९८६

**प्रकाशक**
सौ. शुभदा विष्णु परचुरे
परचुरे प्रकाशन मंदिर
३११, राजा राममोहन
रॉय मार्ग, गिरगाव,
मुंबई–४०० ००४

**मुखपृष्ठ**
मोहन वाघ

**मुद्रक**
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
' शिव-पार्वती '
४६१/४, सदाशिव पेठ
टिळक रोड,
पुणे–४११०३०

**मूल्य**
पंचवीस रुपये

या नाटकाच्या प्रयोगाचे, भाषांतराचे, चित्रपटाचे इत्यादी सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन आहेत.

आगाऊ लेखी परवानगी-शिवाय या नाटकाचा कोणीही प्रयोग करू नये. तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी परवानगी आणि प्रयोगमूल्य याबद्दल सौ. उषा वसंत कानेटकर, शिवाई, शरणपूर रोड, नाशिक ४२२००२ येथे पत्रव्यवहार करावा.

दूरध्वनी क्रमांक ७३०९२

# सोनचाफा

## वसंत कानेटकर यांचे साहित्य

### नाटके

वेड्याचं घर उन्हात। देवांचं मनोराज्य। प्रेमा, तुझा रंग कसा? । रायगडाला जेव्हा जाग येते। दोन ध्रुवांवर दोघे आपण। मत्स्यगंधा। मोहिनी। अश्रूंची झाली फुले। लेकुरे उदंड जाली। इथे ओशाळला मृत्यू। घरात फुलला पारिजात। मला काही सांगायचंय। तुझा तू वाढवी राजा। मीरा मधुरा। हिमालयाची सावली। बेइमान। अखेरचा सवाल। नलदमयंती। विषवृक्षाची छाया। कस्तुरीमृग। माणसाला डंख मातीचा। सूर्याची पिल्ले। एक रूप : अनेक रंग। गोष्ट जन्मांतरीची। गाठ आहे माझ्याशी। कधीतरी कोठेतरी! पंखांना ओढ पावलांची। छू मंतर! गगनभेदी। प्रेमाच्या गावा जावे। वादळ माणसाळतंय। मदनबाधा।

### एकांकिका

व्यासांचा कायाकल्प। मद्रासीने केला मराठी भ्रतार। गड गेला, पण सिंह जागा झाला। स्मगलर-सम्राटांच्या न्यायालयात रामशास्त्री। झेंडे-पाटील महाविद्यालयात गंगू, अंबू, विठा। आनंदीबाई आणीबाणी पुकारतात। शहाण्याला मार शब्दांचा।

### कादंबऱ्या

घर। पंख। पोरका। तेथे चल राणी।

### कथा

लावण्यमयी। रमाई। हे हृदय कसे आईचे।

### टीका

नाटक : एक चिंतन।

### आत्मचिंतन

मी...माझ्याशी

# निवेदन

हे नाटक तसे स्वतंत्र नाही. इंग्लंडमधे फ्रॅन्सेस हॉजसन बुर्नेत या कादंबरीकार महिलेने १८८६ साली, म्हणजे बरोबर शंभर वर्षांपूर्वी Little Lord Fauntleroy नावाची कादंबरी लिहिली होती. ही कादंबरी मुलांची तर आवडती झालीच पण पुढे वडिलधाऱ्यांनाही ती कमालीची आवडू लागली. या कादंबरीतली मध्यवर्ती घटना, काही प्रसंग, व्यक्तिरेखा घेऊन आणि त्यात माझी स्वतःची काही जोड देऊन मी 'सोनचाफा' ही नाट्यकृती उभी केली आहे. त्यासाठी स्वातंत्र्यपूर्व कालातल्या आणि दुसरे महायुद्ध चालू असतानाच्या एका संस्थानाच्या पार्श्वभूमीवर मी नाट्यवस्तूची मांडणी केली आहे. तो काळ, ती माणसे, त्यांच्या श्रद्धा, निष्ठा आता संपल्या असल्या तरी त्यातली भाबडी गोडी आजही वास्तव परिस्थितीने विटलेल्या कडू जिभेला गोड करून जाईल याची मला खात्री वाटते. हे नाटक मुलांच्यासाठी असले तरी मुलांच्या माता-पित्यांनासुद्धा ते आवडेल अशी मी उमेद बाळगून आहे.

श्री. मोहन वाघ, सौ. पद्माताई वाघ, त्यांच्या कन्या कु. अपर्णा आणि कु. शर्मिला, श्री. यशवंत दत्त, श्री. दिलीप कोल्हटकर, श्री. आप्पासाहेब, सौ. शुभदाताई आणि कु. नूतन परचुरे, नरेन परचुरे, श्री. कदम, श्री. हनुमान शिंदे, श्री. शिरीष आणि सौ. वंदना गुप्ते तसेच श्री. वसंतराव लिमये या मित्रांची नेहमीप्रमाणेच मला अमोल मदत झाली. श्री. आप्पासाहेब परचुरे यांची हौस आणि कष्ट पुस्तकाच्या पानोपानी प्रगट होत आहे. या सर्वांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे.

वसंत कानेटकर

'सोनचाफा'
या नाटकाचा
पहिला प्रयोग,
चंद्रलेखा, मुंबई
या संस्थेने
दि. ८ डिसेंबर १९८६
या दिवशी रात्री ९ वा.
बालगंधर्व रंगमंदिर, पुणे
येथे सादर केला.

पहिल्या प्रयोगात
भाग घेणारे
कलावंत व तंत्रज्ञ

दिग्दर्शन
**दिलीप कोल्हटकर**
निर्माता, नेपथ्य, प्रकाश
**मोहन वाघ**
पार्श्वसंगीत
**अनंत अमेंबल**
रंगभूषा
**कृष्णा बोरकर**
प्रकाश-योजना आणि
ध्वनि-सहायक
**सुरेश, मधु, मेघनाथ**
नेपथ्य-सहायक
**बाबू पुरोहित, विजय मिस्त्री**
**अण्णा शिंदे**
निर्मिति-सहायक
**हनुमान शिंदे**
व्यवस्थापक
**मनोहर कदम**

## पात्र-परिचय

श्रीमंत जीवाजी महाराज
**यशवंत दत्त**
बॅरिस्टर शासाहेब
**जगन्नाथ कांदळगावकर**
दिवाण शाहूराव
**उपेंद्र दाते**
सुभानमामा
**जनार्दन सोहनी**
अप्पू पानवाला
**संजय भालेकर**
सटवाजी
**वसंत विचारे**
रतन
**मा. जयेश कामत**
आक्कासाहेब
**शीला पोतनीस**
मंजुळा
**रोशनी मुरकर**
योगितादेवी
**वंदना गुप्ते**

**कै. श्रीमती शारदाबाई वाघ**
यांच्या प्रेमळ स्मृतीस
कृतज्ञतापूर्वक

**॥ मोहन वाघ ॥ वसंत कानेटकर ॥**

# माझी आई



'सोनचाफा' हे माझ्या आईच्या आठवणींनी ओथंबलेलं एक नाटक. वसंतरावांनी या नाटकाचं कथानक ज्या वेळी मला सांगितलं त्याच वेळी माझ्या डोळ्यांसमोर माझी आई आणि माझं बालपण उभं राहिलं. माझे वडील आम्हाला सोडून गेले त्या वेळी माझी आई जेमतेम वीस वर्षांची असावी आणि मी तर नऊ महिन्यांचा होतो. त्यानंतर तिनेच मला संभाळलं, जपलं आणि मोठं केलं. वयाच्या विसाव्या वर्षापासून वयाच्या ७३ व्या वर्षापर्यंत स्वतःचं सारं दुःख झुगारून तिनं कष्ट केले ते केवळ माझ्यासाठी. तिने कष्टाची पर्वा केली नाही. शेवटपर्यंत दुसऱ्यांसाठी ती कष्ट करतच राहिली. आज मी थोडा फार समाधानी आहे त्याचं एक कारण असं की तिला तिच्या कष्टांच्या मोबदल्यात मी थोडं फार नाव मिळवून तिला थोडं तरी सुख व समाधान देऊ शकलो. 'मोहन तुझ्या आईला पाहिलं की प्रसन्न वाटतं,' असं काहीजण म्हणत तर 'मोहन नाटक पाहायला तुझी आई पहिल्या रांगेत बसलेली पाहिली की एखादी तेजस्वी देवता किंवा महाराणी तिथे बसल्यासारखं वाटतं' असं काहीजण म्हणत. आता त्या आठवणी आणि ते शब्दच केवळ शिल्लक उरलेत. तिच्या डोळ्यांत मी अश्रू कधी पाहिलेच नाहीत. बहुतेक वयाच्या विसाव्या वर्षीच तिने ते सारे माझ्यासाठी पुसून टाकलेले असावेत. तिने माझ्यासाठी पुसून टाकलेल्या त्या अश्रूंनी मला खूप काही शिकवलंय. त्या पुसून टाकलेल्या तिच्या अश्रूंनीच मला घडवलंय. त्या वेळी मी अवघ्या नऊ महिन्यांचा असल्यामुळे तिच्या ओघळलेल्या अश्रूंपैकी दोन अश्रूदेखील मी माझ्या चिमुकल्या हातात पकडून ठेवू शकलो नाही.

तिला नाटकांची खूप आवड होती. अलीकडेच तिने मला सांगितल्यामुळे मला माझी जन्मकथा समजली. कारवारला मा. दीनानाथांच्या एका नाटकाचा प्रयोग पाहून ती पहाटे घरी आली. घरी येता येता तिच्या पोटात दुखू लागलं आणि थोड्या वेळातच माझा जन्म झाला. तिच्या त्या नाट्यवेड्या जिवासाठी व माझ्यावरील तिच्या अमाप प्रेमासाठी 'सोनचाफा' ही नाट्यकृती तिला मी भावपूर्णपणे अर्पण करीत आहे. हे गोड नाटक मला लिहून दिल्याबद्दल मी वसंतरावांचा सदैव ऋणी आहे. तसेच इतकं सुरेख पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल आप्पा परचुरे ह्यांचाही मी ऋणी आहे. हे नाटक रंगभूमीवर आणण्यासाठी ज्यांनी ज्यांनी कष्ट घेतलेत त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

**मोहन**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. 29599 नों. दि 26/8/66
वि. नाटक ...... क्र. ..................

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

[ मुंबई. त्यातही गिरगाव. गिरगावातली केळुसकरांची चाळ. चौथा मजला. ७६ नंबरचा दोन खोल्यांचा गाळा.

समय दुसऱ्या महायुद्ध काळातला. १९४४ चा. महायुद्ध चालू आहे; बेचाळीसच्या चळवळीतला जोर ओसरला आहे आणि आझाद हिंद सैन्याची आगेकूचही रोखली गेली आहे–तो काळ.

७६ नंबरच्या दोन खोल्यांच्या बिऱ्हाडात राहतात श्रीमती योगिता जितेंद्र शिलाहार आणि त्यांचा पुत्र रतन ऊर्फ रत्नाकर. योगिता पस्तिशीची, देखणी. आघातामुळे मुद्रा विषण्ण, गंभीर आणि पराकाष्ठेची अभिमानी. रतन दहा वर्षांचा हुशार, चुणचुणीत गोड मुलगा. योगिताचे पती आणि रतनचे वडील मेजर जितेंद्र तीन वर्षांपूर्वी युद्धकैदी म्हणून ब्रह्मदेशाच्या युद्धात पकडले गेले. पुढे ते आझाद सैन्यात दाखल झाले. तेव्हापासूनच योगिताचा वनवास सुरू झाला. इम्फाळच्या लढाईत दोन वर्षांपूर्वी ते मारले गेले. तेव्हापासून योगिता रतनला घेऊन या चाळीत राहायला आली आणि शिवणकाम करून तिने कष्टाने दोघांचा प्रपंच संभाळला. शिवाय या घरावर आधारवडासारखी छाया धरून उभे आहेत सुभानमामा महाडीक. सुभानमामांनी साठी कधीच ओलांडली आहे. सैन्यात ते हवालदार होते. जितेंद्रांच्या बंगल्यावर ऑर्डर्ली म्हणून ते प्रारंभी त्यांची सेवाचाकरी करीत होते. त्या वेळचा लोभ या घरावर संकटे कोसळू लागली तशी वाढतच गेला. शिवाय या चाळीच्या बाहेरच पानाचा एक ठेला आहे. 'अप्पू पान स्टॉल'. त्याचा मालक वीस वर्षांचा अप्पू रतनचा जिगर दोस्त. तोही या घरात अडल्या नडल्या वेळी हाकेसरशी धावतो. योगिताच्या ममतेत तोही गुरफटला आहे.

पडदा वर जातो त्या वेळी या बिऱ्हाडातली दर्शनी खोली दिसते. बाहेरून आत यायचा दरवाजा डाव्या बाजूला. बाहेर लांबलचक गॅलरी असावी. गॅलरीतूनच इतर बिऱ्हाडांकडे जायचा–यायचा रस्ता. उजव्या हाताला आत स्वयंपाक-घराकडे जायचे दार. समोरच्या भिंतीवर मेजर जितेंद्रचा लष्करी वेशातला एक फोटो. योगिता–जितेंद्र यांचा लग्नानंतर काढलेला फोटो आणि रतनचा एक फोटो लावले आहेत. खोलीत टापटीप आणि रसिकता सर्वत्र दिसते. दारिद्र्याची छाया तर आहेच. जमिनीवर सतरंजी, भिंतीशी गुंडाळून ठेवलेल्या गाद्या, खुंटाळे, त्यावर कपडे, कोनाडा– त्यात छोटे देवघर, एक जुनाट लाकडी कपाट, त्यावर लष्करी छापाच्या एक दोन ट्रंका, एक टेबल, खुर्ची. टेबलावर शिवणाचे हातमशीन. शेजारी एक जुना रेडिओ.

रंगमंच प्रकाशाने उजळतो त्या वेळी योगिता खुर्चीवर बसून हातमशीनवर काही शिवणकाम झपाट्याने उरकीत बसली आहे. वेळ सकाळी दहा वाजण्याची. योगिताच्या अंगावर साधेच पातळ पोलके. रेडिओवर मराठी बातम्या संपत आल्या आहेत. पण त्यावरून काळ सूचित व्हावा. पुढे बातम्या संपतात आणि अनौन्सर '...ये ऑल इंडिया रेडिओ बंबई है' असे जाहीर करून, श्रोत्यांनी सुचवलेल्या चित्रपटातील ध्वनिमुद्रिकांची घोषणा देतो. पहिल्याच ध्वनिमुद्रिके-वरूनही तो काळ लक्षात यावा.

तेवढ्यात बंद दारावर कडीचा खडखडाट होतो. तशी हात लांबवून योगिता रेडिओ बंद करते आणि विचारते— "कोण आहे?" तशी बाहेरून उत्तर येतं— "म्या हाय ताईसाब...सुभानमामा." तशी योगिता काम ठेवून उठते आणि पुढं होऊन दार उघडते. पुन्हा येऊन खुर्चीवर बसत— "कुठं बेपत्ता झाला होतात सुभानमामा तुम्ही?"

तशी दारातच थबकत विस्मयानं सुभानमामा म्हणतात—]

**सुभानमामा :** (थक्क होत) म्या? आन बेपत्ता? हतंच तर होतो की ताईसाब. काल परवाच तर तुमच्या हातची फणसाची भाजी खाल्ली की. लई ग्वाड

**योगिता :** (हसून) काल परवा नाही सुभानमामा, आठ दिवस झाले तुम्ही फणसाची भाजी खाल्ली त्याला.

**सुभानमामा :** असं नवं का? असंल असंल. आमी आंगठे बहाद्दर. लडाईत बहा-दुरी गाजवली तरी येळ आन तारीख कोनाच्या बाला कळतोया असंल.... तसंच असंल. मंजी त्याचं काय जालं पगा ताईसाब—(म्हणत सतरंजी बाहेर जमिनीवर बसू लागतो तशी ते पाहून—)

**योगिता :** किती वेळा सांगायचं तुम्हाला सुभानमामा, तुम्ही खाली जमिनीवर बसलेलं मला आवडत नाही. आधी उठा आणि वर बसा पाहू.

**सुभान :** तुमचं आपलं तिसरंच काहीतरी. म्या हतं टेकलो मंजी बुडाला काय निवडुंग टोचतया ? अवो म्या हाय कोन ? शारंगधरचा एक कुणबी. सरकारांनी किरपा केली म्हून सैन्यात भरती जालो. योक काळचा तुमच्या बंगल्यावर आर्डरली म्हून राबलो. मेजर साहेबांनी माया लावली म्हून—

**योगिता :** तेवढी मायाच राहिलीय आता. आणि तेवढी मला पुरे. बाकी सगळं सगळं गेलं. मेजरसाहेब गेले...बंगला गेला...सगळं गेलं...पण मला त्याची पर्वा नाही तुम्ही आधी उठा बघू.

**सुभान :** छा छाऽऽ... काय येड का काय ? असं बरं जाईल समदं ? त्येच तर सांगतूया. ताईसाब, आज कुलाब्याला गेलो आणि थेट सी. ओ. सायबालाच गाठला म्या आन—

**योगिता :** आधी वर बसा आणि मग सांगा. चला उठा—की मी उठू ?

**सुभान :** ( कष्टानं आणि नाराजीनं उठत ) बरंऽ बरं...उटतो माज्या गुनाच्या बये. आमी संस्थानची मानसं.. तुमा खालसातल्या शहरी मानसांना आमच्या संस्थानच्या रीतीभाती न्हाई पटायच्या. ( पद्धतशीर बसत ) लई ब्येस... एकदम नंबरी काम जमलं पगा ताईसाब. सी. ओ. साब, कर्नल मिचेलसाब म्हनायचा हाय. लई नामी मानूस. त्योच भेटला तवा म्या हेरलं की काम व्हनार. आपल्या नेटीव सायबात काय दम नाही पगा. जखमेवर मुता म्हनलं— तर 'वरून तशी आर्डर न्हाय' म्हनत्याल. ( हसतो ) पण मिचेल सायबांनी फाड फाड उब्या उब्याच कामाचा फडशा पाडला. मंजी त्याचं काय जालं पगा ताईसाब—

**योगिता :** सुभानमामा, मुद्द्याचं तेवढं सांगा. बाकीचा तुमचा गोष्टीवेल्हाळपणा मला नकोय. हे शाळेतल्या मुलींचे युनिफॉर्म ! दुपारी तीन वाजेपर्यंत पुरे करून मला सेंट फिलोनिना शाळेत नेऊन द्यायचेत ( घाम पुसत ) इतक्यात रतन शाळेतून घरी परत येईल. मग मला तासभर त्याच्या तैनातीत नाचाव लागेल. तुमच्या शारंगधर संस्थानच्या सरकारांचाच नातू तो. दारिद्र्य आलं तरी रक्तातलं राजेपण असं सहजासहजी थोडच जाईल ? नोकरचाकर नसले, तरी दिमतीला हक्काची आई तर आहे ?

**सुभान :** तसं न्हाय ताईसाब... लेकरू मंजी सोन्याचा तुकडा हाय.

**योगिता :** असू दे. पण त्याचं नशीब सोन्याचं नाही ना... ते आहे पत्थराचं.

**सुभान :** असं कसं व्हईल ताईसाब ? म्या सांगनू कवातरी—

**योगिता :** दुसरं तिसरं काही सांगू नका. पेन्शनबद्दल मिचेलसाहेब काय म्हणाले

तेवढंच सांगा.

**सुभान :** सांगतू. मिचलेसाब म्हनाला, की सरकारला अशी रास्त शंका हाय की मेजर जितेंद्रसाब गद्दारी करून नेताजींना गुप्तपणे मदत करीत होते आणि त्यातच ते मारले गेले.

**योगिता :** खोटं आहे. सरकारकडं तसा काहीही पुरावा नाहीये.

**सुभान :** पन सरकारला शंका आली हाय आन चौकशी बी चालू हाय.

**योगिता :** आणि चौकशीचा निकाल लागेपर्यंत पेन्शनचा निर्णय होणार नाही असंच म्हणायचं आहे ना तुझ्या मिचेल सायबाला ?

**सुभान :** तसंच काय न्हाय, पन... तुमी अर्जात असं लिवायला हवं की माज्या नवऱ्यानं गद्दारी केली पन त्याला शिक्षा बी मिळाली. माजा त्येचा काय संबंध न्हाय. तवा —

**योगिता :** सरकारनं कृपावंत होऊन मला आणि माझ्या लेकराला उदरनिर्वाहासाठी पेन्शनची भिक्षा घालावी– हेच ना ? [ सुभानमामा मान खाली घालून काहीतरी स्वतःशीच पुटपुटतो तशी ] – सुभानमामा, तू चार वर्षं आमच्या घरी राहिला आहेस. हे शिवणयंत्र घेऊन मी अहोरात्र कशी राबतेय, माझ्या नवऱ्याच्या माघारी या लेकराला कशी संभाळतेय, ते तू बघतो आहेस. मी असला अर्ज करून सरकार-कडं दयेची भीक मागीन असं तुला वाटलंच कसं ?

**सुभान :** तसं न्हाई ताईसाब... आपला हात दगडाखाली सापडलाय तवाऽऽ —

**योगिता :** हात तुटून पडला तरी बेहत्तर; पण असला अर्ज मी कधी कधी करणार नाही. दयेची भीकच मागायची, तर मी माझे सासरे श्रीमंत सरकार जिवाजी मल्हारराव महाराजांच्याकडं मागितली नसती ? मुलावरचा राग त्यांना आपल्या नातवावर काढायचा असेल तर त्यांनी खुशाल काढावा. माझा नवरा लढाईत मारला गेला तेव्हाच मी हातातल्या बांगड्या फोडून टाकल्या आहेत.

**सुभान :** तरीसुद्धा ताईसाब म्या म्हनतू—

**योगिता :** तुम्ही काही एक म्हणू नका. मला तुमचासुद्धा राग आलाय.

[ पुन्हा शिवणकाम चालू करते. घुश्श्यातच. सुभानमामा मुकाट्यानं न बोलता उठतो आणि जाण्यासाठी दाराकडं वळतो तशी– ] तसेच चाललात कुठं सुभान-मामा ? तुमच्यासाठी थालपीठ आणि लोणी काढून ठेवलंय थाळीत.

**सुभान :** ( रागानं ) नगं मला थालपीठ आन लोनी...

**योगिता :** ( थबकून कडाडत ) सुभानमामा—तुम्ही उपाशीपोटी या घरातून बाहेर पडलात तर माझी अन् रतनच्या गळ्याची शपथ आहे तुम्हाला. आम्ही दोघंही अन्नाला आज हात लावणार नाही.

**सुभान :** ( थबकून ) आन वर पुन्हा ही दमदाटी. शपथ सुटली म्हन...

**योगिता :** ( हसून सौम्य आवाजात ) सुटली. चला आधी आत. मी तुम्हाला वाढते.

**सुभान :** काय तुमी वाडायची गरज न्हाय. समदं ठावं हाय मला. म्या कोनी परका मानूस हाय का काय ?

[ रागारागात आत जातात. योगिता उठलेली पुन्हा बसून मनगटावरील घड्याळात बघते आणि घाईघाईने शिवणकाम सुरू करते. काम करता करताच हात लांबवून पुन्हा रेडिओ सुरू करते. तशी मघाच्याच गीतमालेतले दुसरे एक त्याच काळातले चित्रपटगीत सुरू होते. तेवढ्यात बाहेरचं, नुसतं लोटून घेतलेलं दार धाडकन उघडून अप्पू धापा टाकीत येतो. अप्पू हा पानवाला. याच चाळीत खाली राहणारा अठरा-एकोणीस वर्षांचा तरुण आणि रतनचा जिगर दोस्त. ' अप्पू पान स्टॉलचा मालक '. त्याच्या येण्याबरोबर— ]

**योगिता :** अरे पण हो... जरा हळू... काय रे तुझं हे येणं अप्पू ? काय वाघ बीघ मागं लागलाय काय तुझ्या ?

**अप्पू :** वाघापेक्षा खतरनाक प्राणी आपल्या सोन्याच्या मागावर आहे. मला आधी सांगा ताई सोन्या शाळेतून परतला की नाही ?

**योगिता :** नाही अजून. पण बैस तर खरा— इतक्यात रतन येईल.

**अप्पू :** बसायला टायम नाही. ताई खाली पानाचा स्टॉल उघडा ठेवून आलोय वर. दोन मिनिटांत मला जायला हवं.

**योगिता :** अरे पण—

**अप्पू :** ताई, मला आधी सांगा चिमणदादा इथं आला होता का ?

**योगिता :** कोण चिमणदादा ?

**अप्पू :** माझा थोरला भाऊ. अंधेरीच्या स्टुडियोत असिस्टंट कॅमेरामन आहे. माझ्या बरोबर आला होता बघा एकदा तुमच्या घरी. असे पांढरे केस रंगवून लाल केलेला आन—

**योगिता :** हं आठवलं. तो होय ? नाही आला. तो इथं कशाला येईल ?

**अप्पू :** सिनेमाकंपनीचे डायरेक्टर नजमलहुसेनसाहेबांना घेऊन तुमच्याकडे जाणार म्हणाला होता, चिमणदादा काल मला.

**योगिता :** अरे पण कशासाठी ?

**अप्पू :** चिमणदादा काल पान खायला माझ्या स्टॉलवर थांबला; तेवढ्यात आपला सोन्या आला.

**योगिता :** मघापासून ' सोन्या सोन्या ' काय लावलं आहेस ? त्याचं नाव रतन आहे. वाईट आहे का रत्नाकर हे नाव ?

**अप्पू** : ताई, ती आमची गंमत आहे. सांगेन कधीतरी. तर सोन्याला पाहून चिमणदादा मला म्हणतो— "अरे अप्पू, कोण रं हे पोरगं ?" मी त्याला म्हटलं, हा आमचा सोनचाफा. तशी म्हणतो, आमच्या पिक्चरमधे करील का हा काम ? नजमल हुसेनसाहेब असल्याच पोराच्या शोधात आहेत. मी साफ सांगितलं, 'नाऽ हीऽऽ...' आमचा सोन्याला तू काय समजलास ? अरे तो शारंगधर संस्थानच्या जिवाजी मल्हारराव महाराजांचा नातू आहे. त्याचे वडील लष्करात मेजर होते. शाळेत पहिला नंबर आहे त्याचा. तो आय. सी. एस. कलेक्टरच होणार... तशी चिमणदादा म्हणतो– 'जिवाजी मल्हारराव महाराजांचा नातू ? बाप मेजर होता सैन्यात ? मग हे पोरगं इथं कुठं आलं केळुसकराच्या चाळीत राहायला ?' मी ठणकावलं त्याला– 'त्याच्याशी काय घेणं आहे तुला ? गुमान पान खा आणि रस्त्याला लाग की... आमचा सोन्या आम्हाला सिनेमात घालायचा नाहीऽऽ कळलंऽऽ ?' तशी चिमणदादा म्हणाला— 'अरे जा जा... नजमल हुसेनसाहेबांनाच घेऊन येतो मी उद्या. या पोराच्या आईपुढं नजमल हुसेनसाहेबांनी नोटांची चवड ठेवली की ती —' [ थबकतो. तशी काम करता करता योगिता वर पाहते. ]

**योगिता** : आणिऽऽ ? पुढं काय म्हणाला ?

**अप्पू** : पुढं काहीच म्हणाला नाही तो. फक्त जीव घेऊन पळत सुटला.

**योगिता** : जीव घेऊन पळत सुटला ? मारामारी केलीस वाटतं त्याच्याशी ?

**अप्पू** : केली नाही पण करणार होतो. स्टॉलवरून झेप घेऊन मी अंगावर धावलो त्याच्या, तशी तो पळालाच. तुमच्यासारख्या साध्वी बाईबद्दल ही भाषा ? कोण ऐकून घेईल ? अप्पू पान स्टॉल म्हणजे काय मवाल्याचा अड्डा वाटला त्याला ?

**योगिता** : कशी रे तुम्ही मुलं आहात ? अशी गुंडगिरी बरी नव्हे अप्पू.

**अप्पू** : ते मला नका सांगू. चिमणदादाला सुनवा. आमच्या सोन्याला सिनेमात घालायचा नाही म्हणजे नाही. फार घाणेरडी खराब माणसं असतात स्टुडियोत ताई.

**योगिता** : अरे पण कोण घालतंय त्याला सिनेमात ?

**अप्पू** : हे पाहा ताई, मघा तुमच्या बिऱ्हाडाची चौकशी करीत एक इसम स्टालवर आला होता माझ्या. मी बिट्याला गादीवर बसून चहा प्यायला गेलो, तेवढ्यात हा आला. झकपक पोशाख होता त्याचा. बिट्या म्हणाला, तेव्हाच मी ओळखलं— हा नजमल हुसेनसाहेब. चिमणदादा काही इकडं फिरकायचा नाही, तेव्हा हा नजमल हुसेनच आला. मी तसा धावत इथवर आलो.

**योगिता** : हे बघ, इथं कोणी तुझा नजमल हुसेन आला नाही की गेला नाही. आणि समजा आलाच आणि त्यानं माझ्या समोर नोटांची चवड ठेवलीच तर—

**अप्पू :** ताई, तुम्ही फक्त खिडकीतून मला हळी द्या. आमची सगळी कंपनी घेऊन धावत येतो इथं आणि एका नजमल हुसेनचे—

**योगिता :** ते कळलं. आलाच आहेस तर थोडं थालपीठ लोणी खाऊन जातोस? आत सुभानमामा बसलेत बघ

**अप्पू :** दुपारी जेवायच्या टायमाला येईन ताई. आता धंद्याची वेळ आहे. मी जाई तोवर बिऱ्या गादीवर टिकला म्हणजे भरून पावलं.

[ तेवढ्यात उघड्या दारातून धावत येतो रतन. एक नऊ–दहा वर्षांचा गोड मुलगा. अंगावर शाळेतला युनिफॉर्म आणि पाठीवर भले मोठे दप्तर. येतो तोच मुळी अप्पूपुढे ऐतिहासिक नाटकातली एक पोज घेऊन उभा राहात, थाटात म्हणतो— " अलमगीर, तुला जसा तुझा धर्म प्यारा, तसा माझा मला. जन्माला आलेल्या प्रत्येक माणसाला मरण प्राप्त आहे. आज माझी पाळी असली तर उद्या तुझी आहे. तुझी दया भाकू ? तुझा धर्म पत्करू ? अलमगीर, या संभाजीनं अद्याप कोणापुढं मान लवविली नाही. बापास जुमानलं नाही, मित्रास जुमानलं नाही की शत्रूस जुमानलं नाही. हा संभाजी आपल्याच तंत्रानं जगला आणि आपल्याच तंत्रानं मरणार. अलमगीर, लक्षात ठेव, धर्मासाठी जीवाची आटाआटी केलेल्या शिवाजीचा मी ( पाय आपटून ) बच्चा आहे .. तशी—" ]

**अप्पू :** ( चक्रावत ) अरे अरे हे काय चाललंय तुझं ?

**रतन :** ( दप्तर काढून ठेवीत ) अप्पू द ग्रेट... धिस इज नाटक... ए ' अगं ', नाटकाला इंग्लिशमध्ये काय म्हणतात गं ?

**योगिता :** ड्रामा. आज झाली का तुमची रंगीत तालीम ?

**अप्पू :** ताई, तुम्ही सोन्याला नाटक कंपनीत घातलात ?

**योगिता :** काहीतरीच काय बोलतोस रे अप्पू ? अरे त्याच्या शाळेत बक्षिस समारंभ व्हायचा आहे ना, त्या वेळच्या एका प्रवेशात रतनला संभाजीची भूमिका मिळालीय. त्यातले संवाद म्हणतोय तो.

**अप्पू :** असं नाही का ? मग ठीक आहे. कधी आहे रे सोन्या तुझं नाटक ?

**रतन :** परवा दिवशी. रविवारी, सायंकाळी सहा वाजता.

**अप्पू :** आम्हाला पास मिळणार का ?

**रतन :** काय प्रश्न विचारतोस रे अप्प्या ? मी टीचरना आधीच सांगून ठेवलंय. माझ्या घरचे तीन पास. माझी आई, माझा अप्पू आणि माझे सुभानमामा—वेळेवर यायचं हं पण. उशीर केलास तर खबरदार. गडाचे दरवाजे बंद होतील.

**अप्पू :** ( हबकून ) अरे बापरे ! तर मग दुपारचा खाना घेतला की तसाच तुझ्या शाळेच्या फाटकात येऊन ठिय्याच देतो.

**रतन :** ए 'अगं', हे शिवाजी—संभाजी महाराजांच्या वेळची सगळीच माणसं नाटकात लिहिल्यासारखंच बोलत होते का ग ?

**योगिता :** तर काय ?

**रतन :** तसं बोलताना अंगात कशी सुरसुरी येते नाही ?

**योगिता :** होय ना.

**रतन :** मग आपण आज तसे का बोलत नाही ?

**योगिता :** बोलाव की ! शारंगधर संस्थानात तुझे आजोबा अजूनही असंच बोलतात. तुझे बाबाच सांगायचे मला.

**रतन :** आं ? खरंच ? म्हणजे कसे गं ?

**योगिता :** ( थबकून नक्कल करीत ) दिवाणसाहेब, मुदपाकखान्यात जाऊन मासाहेबांना वर्दी द्या की छोटे सरकार आले आहेत, ते आमच्या संगतीत दुपारचा थाळा घेतील.

**रतन :** छोटे सरकार ? छोटे सरकार म्हणजे ग कोण ?

**योगिता :** तुझे बाबा. ते शारंगधरला होते तेव्हा तिथे सगळे लोक त्यांना छोटेसरकार म्हणायचे.

**रतन :** आणि आजोबांना ?

**योगिता :** ते थोरले सरकार नाहीतर थोरले महाराज.

**रतन :** आता छोटे सरकार कोणाला म्हणतात तिथं ?

**योगिता :** कोणास ठाऊक !

**रतन :** कोणास नाही... मला आहे ठाऊक. मीच छोटे सरकार. आपले सुभानमामा सांगत होते एकदा मला.

**योगिता :** कळलं कळलंऽ ! छोटे सरकार, आता दप्तर जागेवर ठेवा आणि आत कपाटात यादी आणि पैसे ठेवले आहेत. चटकन् वाण्याकडून सामान घेऊन यायचं. काही फार नाहीये सामान. तू परतलास की लागलीच वाढते तुला.

**रतन :** ( दप्तर उचलीत ) मासाहेब, आमच्या संगती हे अप्पाजीरावसुद्धा दुपारचा थाळा घेतील. मुदपाकखान्यात जाऊन तयारी करा.

**अप्पू :** नाही रे बाबा...ही धंद्याची वेळ आहे. उन्हं कलल्यावर थालपीठ खायला येईन मी. पण सोन्या मला एक सांग, तू संभाजी होणार म्हणजे दाढीमिश्या लावणार का रे ?

**रतन :** मग ? दाढीमिश्यावाचून संभाजी, संभाजी कसा दिसेल ? तेवढंच नाही अप्पू, अरे अंगात सुरवार, वर अंगरखा, डोक्याला जिरेटोप, हे असे आडवे, उभे पट्टे, कमरेला तरवार...खरीखुरी बरं का...

**अप्पू** : ( उत्साहानं ) अरे मग मी येणारच तुझं नाटक बघायला. ताई, आपला सोन्या ह्याक शोभेल नाही संभाजीराजाच्या वेशात ?

**योगिता** : ( थबकून, वळून रतनला जवळ घेत ) मग मी माझ्या राजाची दृष्ट काढणार आणि अस्सा ( गालाचा पापा घेत ) पापा घेणार.

**रतन** : ( गाल पुसत) हे काय गं अगं ? संभाजीराजांच्या दाढीमिश्यांतून मासाहेबांना गालाचा पापा कसा घेता येईल ?

**योगिता** : ( खळखळून हसते आणि ) रतन...रतन...आजोबांचा नातू शोभतोस बघ. ( हसू आवरीत ) आत मधे यादी, पैसे आणि पिशवी ठेवलीय. ती घेऊन गणेशभाई मनोरभाईच्या दुकानात जायचं आणि—

[ तेवढ्यात आतून ढेकर देत सुभानमामा येतात आणि— ]

**सुभान** : ताईसाब, छोटे सरकारना कशाला धाडताया उनातानाचं ? म्या मोकळाच हाय...प्वाट बी गपगार झालंय तवा— [ रतन आत जातो ]

**योगिता** : ( कडकपणे ) नाही. सुभानमामा, रतन 'छोटे सरकार' नाही; आणि कदापि होण्याची शक्यताही नाही. उगीच त्याच्या डोक्यात भलतंसलतं भरवू नका. घरातली ही कामं रतननंच केली पाहिजेत.

**सुभान** : बरं ताईसाब, तुमच्या मनाप्रमानं होऊ द्या.

[ तेवढ्यात खालून कोठून तरी इशाऱ्याची तोंडात बोटं घालून वाजवलेली शिट्टी ऐकू येते. तशी अप्पू चटकन गॅलरीत धावतो आणि वरून खाली बघतो. काही इशारे, संकेत होतात. अप्पू गडबडीनं परत येऊन—]

**अप्पू** : ताई...तो येतोय वर. बिस्त्यानं खूण केली मला खालून.

**योगिता** : कोण ? तुझा चिमणदादा ?

**अप्पू** : नाही डायरेक्टर नजमल हुसेन.

**योगिता** : येऊ दे.

**अप्पू** : तुम्हाला काही मदत लागली तर ताई नुसती—

**सुभानमामा** : तुझ्या मदतीची काय बी गरज न्हाय लागनार. अरं ह्यो सुबानमामा जिता हुभा हाय तवर कुनाची छाती न्हाय इथ गमज्या करायची. नजमल हुसेन येऊ दे न्हायतर—

[ तेवढ्यात पैसे, यादी आणि पिशव्या घेऊन आतून रतन येतो. "चला चला" करीत अप्पू गडबड करू लागतो. तेवढ्यात—]

**रतन** : सुभानमामा, थोरल्या सरकारना लोक मुजरा कसा हो करतात ?

**सुभान** : त्याचं काय हाय छोटे सरकार—

**योगिता** : पुरे, ते सांगाय शिकवायला पुष्कळ वेळ आहे पुढं. आधी सांगितलेलं काम.

[ "चिंता करू नका मासाहेब—कामगिरी फत्ते करूनच आम्ही या किल्ले केळूस-करांच्या गडावर परत येऊ...चल रे अप्पू..." असे म्हणत रतन अप्पूचा हात धरून ओढून घेऊन जातो. योगिता दार ढकलून घेऊन पुन्हा शिवणकाम उचलून बसत, क्षणमात्र विचार करीत ]

**योगिता** : सुमानमामा, तुम्ही निचिंतीनं बसा. तो जो कोणी येणार असेल त्याला येऊ दे. हातातल्या बांगड्या फुटल्यापासून मी माझ्या एकटीच्या हिमतीवर उभी आहे. माझ्या पद्धतीनं मी माझ्या लेकराला घडवतेय. मी सांगितल्याशिवाय तुम्ही मधे पडायचं नाही की एक शब्दही बोलायचा नाही.

**सुभान** : ( बसत ) बरं माज्या गुनाच्या बये...तुज्या मर्जीप्रमानं होऊ दे. हा बसलो म्या मुकाट तोंडात गुळणी धरून.

[ योगिता भराभर शिवू लागते. क्षणमात्र तंग वातावरण. तेवढ्यात दारावर टॅपिंग ऐकू येतं. तशी योगिता वरसुद्धा न बघता 'कोण आहे?' हा सवाल पुसते. पण त्या आधीच धडपडून सुभानमामा उठतात आणि धावून दार उघडतात. बाहेरून दबकत येतात शारंगधर संस्थानचे दिवाणसाहेब– शाहुराव सामंत. पन्नाशीचे रुबाब-दार गृहस्थ, पायात बूट, सुरवार, अचकन आणि वर ऐटदार फेटा असा वेश. बोलणे चालणे अत्यंत आदबशीर. ]

**शाहूराव** : नमस्ते ताईसाहेब. मला वाटतं आपणच योगितादेवी शिलाहार.

**योगिता** : ( उठत नमस्कार घेत ) होय. मीच योगिता.

**शाहूराव** : मी आपल्या चिरंजीवांच्या संदर्भात बोलणी करायला आलोय. म्हणजे—

**योगिता** : बोलणी करण्यासारखं काही नाहीये. माझ्या मुलाबद्दल माझ्या स्वतःच्या फार वेगळ्या कल्पना आहेत.

**शाहूराव** : तरी पण आपल्या मुलाचं भलं व्हावं असं तुम्हाला वाटतंय ना? त्याचा सर्वांगीण विकास व्हावा, अशीच तुमची इच्छा आहे ना? त्यासाठीच मी एक योजना घेऊन आलोय ताईसाहेब.

**सुभान** : लेकराचं भलं कशात हाय आन कशात न्हाय, त्येच्या आईला कळतं का—

**योगिता** : ( दरडावून ) सुभानमामा—

**सुभान** : न्हाय... गप्पच हाय म्या.

**शाहूराव** : इथं येण्यापूर्वी मी आपल्या चिरंजीवांच्या शाळेत जाऊन त्याचे टीचर्स आणि हेडमिस्ट्रेस यांना भेटून आलो. हजारांत एक ठरावा असा गुणी हुशार मुलगा आहे असंच सगळ्यांनी एकमुखानं सांगितलं. सध्या नाटकाच्या तालमी चालू आहेत आणि—

**सुभान** : च्यामारी... त्येबी तुमी शोधून काढलं का ?

**योगिता** : ( दरडावून ) सुभानमामा तुम्ही गप्प राहा. नाटक कसलं – शाळेच्या संमेलनात करायच्या एका प्रवेशात तो काम करतोय इतकंच.

**शाहूराव** : पण त्याच्या अभिनयगुणाचीही फार तारीफ ऐकायला मिळाली ताई-साहेब.

**सुभान** : ( उसळून ) ऐकली असली तरी बी म्या सांगतू... आमच्या लेकराला सिनेम्यात न्हाय घालायचा.

**शाहूराव** : बरोबरच आहे. इतक्या गुणी मुलाला सिनेमात नाहीच घालायचा.

**सुभान** : ( थक्क होत ) आंऽ ? सिनेम्यात न्हाय घालायचा ? मग तुमी इथं कशापाई टपकलात हो खानसाब ?

**शाहूराव** : ( चक्रावून ) खानसाब ? कोण खानसाब ?

**सुभान** : आम्हास्नी तुमचा समदा कावा कळला हाय नजमल हुसेनसाब.

**शाहूराव** : कोण नजमल हुसेन ? ताईसाहेब हा कोण माणूस आहे ? तुमच्याकडे कोणी नजमल हुसेन यायचे होते का ?

**योगिता** : सुभानमामा तुम्ही मधे बोलू नका म्हटलं तरी –

**सुभान** : म्या सुबानराव महाडीक. रिटायर्ड हवालदार शारंगधर रायफल्स. आपली तारीफ ?

**शाहूराव** : ( थंडपणे हसत ) मी शाहूराव सामंत. दिवाण, शारंगधर संस्थान.

**सुभान** : ( पार कोकरू होत ) आंऽ ? दिवानसाब ? गलती हुई सरकार. मापी करा. म्या वळीकलं नाय आपल्याला. मुजरा सरकार.

( मुजरा करतो )

**योगिता** : नमस्ते शाहूराव. आमच्याकडं एक नजमल हुसेन नावाचे सिनेमा डायरेक्टर यायचे होते आत्ता असं कळलं, म्हणून घोटाळा झाला. सुभानमामांचाच नव्हे तर माझासुद्धा. ( खुर्ची पुढं करीत ) बसा आपण.

**शाहूराव** : आणि– ( सभोवार पाहात ) आपण कुठं बसणार ताईसाहेब ?

**योगिता** : ( हसून ) हा काही शारंगधरचा नीलकमल राजवाडा नाहीये. मी इथं चाळीत राहते. मी उभीच ठीक आहे. बसा आपण.

**शाहूराव** : नाही ताईसाहेब. आपण उभ्या तर मीही उभाच राहणार.

**सुभान** : ( गडबडीनं ) तसं कशापाई ? वाईच थांबा

[ असे म्हणत तो आत धावतो. क्षणभरातच आतून एक लाकडी पेटी ओढून बाहेर आणून ठेवतो. लष्करात असते तशी ही काळी पेटी. त्यावर पुसट अक्षरे ' मेजर जितेंद्र शिलाहार ' ही पेटी. ठेवून त्यावर चादर टाकून त्याचं एक आसन

तयार करण्यात सुभानमामा गुंतला आहे. दरम्यान—]

**शाहूराव :** ताईसाहेब, श्रीमंत सरकार नववे हिंमत बहादूर जिवाजी मल्हारराव शिलाहार महाराजांच्या वतीनं मी आपल्याशी बोलणी करायला आलोय—संस्थान शारंगधरचा दिवाण म्हणून.

**योगिता :** ही बोलणी ज्यांच्याशी व्हायला हवी होती ते तर गेले. मी कोण ? मी कोणी शाण्णव कुळीतली सरदार कन्या नाहीये. मी आहे एका अनाथाश्रमात वाढलेली एक गरीब अनौरस पोरकी मुलगी. माझ्याशी बोलणी करण्याएवढी काय धनदौलत आहे माझ्याजवळ ?

**शाहूराव :** ताईसाहेब, माफ करा, पण आता तरी हा कडवटपणा आपण विसरायला हवा.

**योगिता :** 'आता तरी' म्हणजे काय ? मी आणि माझ्या मुलानं इतक्या हालअपेष्टा आणि दारिद्र्याची झळ सोसल्यामुळं—'आता तरी' मी झालं गेलं विसरायला हवं, असंच म्हणायचंय ना तुम्हाला ? तुम्ही चुकताहात. मी फार घट्टमुट्ट नि ताठ आहे अजून. येतील ते सगळे आघात सोसण्याइतकी मनानं आणि शरीरानं मी कणखर आहे.

**शाहूराव :** तुम्ही चुकताहात ताईसाहेब. अगदीच गैरसमज करून घेतलात तुम्ही माझ्या बोलण्याचा. 'आता तरी' या शब्दांनी मला फार वेगळी परिस्थिती सुचवायचीय. आता तरी म्हणजे थोरले सरकार ऐंशी वर्षांचे वृद्ध झालेत. गादीच्या वारसाचा प्रश्न लवकर सुटला नाही तर सरकारांच्या पश्चात संस्थान खालसा होईल. सरकारांची प्रकृती बरी नसते. तेव्हा आता तरी मागला सर्व कडवटपणा विसरून तुम्ही सरकारांच्या योजनेचा विचार केला पाहिजे. इतकंच मला म्हणायचं होतं.

[ सुभानमामांनी बैठक तयार केलेली पाहून —]

**योगिता :** ( विचार करीत ) बसा आपण त्या खुर्चीवर.

[ योगिता पेटीवर बसते. मग शाहूराव खुर्चीवर बसतात. ]

**शाहूराव :** छोटे सरकार घरी दिसत नाहीत ? शाळेतून—

**सुभान :** शाळेतून मघाच घरी आले छोटे सरकार. ताईसायबांनी त्यानला पिशव्या घेऊन दुकानावर धाडलंया. तरी म्या म्हनत व्हतो की—

**योगिता :** सुभानमामा ! ( थबकून ) रतनला पाहायचंय तुम्हाला ?

**शाहूराव :** हो म्हणजे—छोटे सरकारांच्याबद्दल महाराज, मी परतल्यावर चौकशी करणारच, तेव्हाऽऽ—

**योगिता :** सुभानमामा, गणोरभाईच्या दुकानावर जा आणि—

**सुभान :** हा आत्ता घेऊन येतो ताईसाबे छोटे सरकारना. ( जातो )

**योगिता :** जे काय बोलणं व्हायचं असेल ते रतन घरी परत यायच्यापूर्वी व्हायला हवं.

**शाहूराव :** ताईसाहेब, तुम्हाला हे माहीत असेल की आपले छोटे सरकार हे महाराजांच्या पश्चात गादीला एकमेव वारस आहेत. म्हणजे अर्थातच महाराजांनी तसं ठरवलं आणि पोलिटिकल एजंटनं मान्यता दिली तर.

**योगिता :** तुम्ही सांगता म्हणून मला कळतंय. एरवी मला ठाऊक व्हायला दुसरा काय मार्ग होता ?

**शाहूराव :** छोट्या सरकारना काय काय माहिती आहे ?

**योगिता :** शारंगधरचे श्रीमंत जिवाजी मल्हारराव महाराज आपले आजोबा आहेत आणि आपले वडील आजोबांच्या मर्जीविरुद्ध सैन्यात जाऊन लढाईवर गेले, म्हणून आजोबा त्यांच्यावर रागावले आहेत, हे रतनला माहीत आहे.

**शाहूराव :** फक्त एवढंच ?

**योगिता :** हो. तेवढंच. "गरीब मुलीला आम्ही श्रीमंत करू शकतो पण अनाथाश्रमातल्या पोरीला शाण्णव कुळीतली कशी करता येईल ?–" हा महाराजांनी आमच्या लग्नाला विरोध करताना विचारलेला प्रश्न, मी त्याला सांगायला हवा होता का ?

**शाहूराव :** ते कळण्याचं त्यांचं वयही नाहीये.

**योगिता :** तसं म्हणू नका दिवाणसाहेब, त्याला वयापेक्षा जास्त कळतं. त्याला वस्तुस्थिती कळली असती तर त्यानं महाराजांचं नावच टाकलं असतं.

**शाहूराव :** महाराजांच्याबद्दल त्यांना आदर, प्रेम आहे ?

**योगिता :** आदर जरूर आहे. प्रेम निर्माण व्हायला पुष्कळ गोष्टी लागतात. मुख्य म्हणजे सहवास लागतो.

**शाहूराव :** ताईसाहेब, श्रीमंत महाराजांनी आपल्या नातवाला घेऊन येण्यासाठी मला पाठवलंय. अर्थातच तुमच्यासह.

**योगिता :** कशासाठी ?

**शाहूराव :** 'दहावे हिंमत बहाद्दर राजे' म्हणून आपल्या देखरेखीखाली छोट्या सरकारांचं शिक्षण व्हावं अशी त्यांची इच्छा आहे.

**योगिता :** रतन शाण्णव कुळीतला नसताना देखील ?

**शाहूराव :** त्याबाबत, जमिनीला महत्त्व नाही, बीज महत्त्वाचं आहे, असं श्रीमंत सरकार म्हणाले ताईसाहेब.

**योगिता :** याचा अर्थ श्रीमंत महाराज त्या वेळी जसे होते तसेच आजही आहेत. श्रीमंतांच्या आणखी काही अटी असणारच.

**शाहूराव :** होय आहेत. छोट्या सरकारांच्या मातोश्री म्हणून ते तुम्हाला शारंगधरला बोलावीत असले तरी राजघराण्यातल्या सूनबाई म्हणून तुम्हाला राजवाड्यावर काहीही स्थान असणार नाही.

**योगिता :** तशी माझी अपेक्षाही नव्हती आणि नाही.

**शाहूराव :** छोटे सरकार नीलकमल प्रासादातच महाराजांच्या संगे राहतील. तुमच्या राहण्यासाठी मात्र राजवाड्याच्या परिसरातच एक वेगळी स्वतंत्र बंगली दिली जाईल. तुमच्या खर्चासाठीही तुम्हाला भरपूर तनखा दिला जाईल.

**योगिता :** अस्सं ऽ !

**शाहूराव :** छोटे सरकार दिवसातून एकदा काही वेळ आपल्या भेटीसाठी आपल्या त्या घरी येत जातील. पण– ( थबकतो )

**योगिता :** पण काय ?

**शाहूराव :** पण कोणत्याही कारणासाठी तुम्ही कधीही राजप्रासादात पाऊलही टाकता कामा नये. श्रीमंत सरकार तुमच्याशी एक अक्षरही बोलू इच्छीत नाहीत की तुमचे मुखावलोकनही करण्याची त्यांची तयारी नाही.

**योगिता :** आणि ही अट मी किंवा माझा मुलगा निमूटपणे मान्य करून, श्रीमंतांच्या आश्रयाला आम्ही येऊ असं तुमच्या श्रीमंत जिवाजी मल्हारराव महाराजांना वाटलं काय ?

**शाहूराव :** ताईसाहेब, श्रीमंतांना काय वाटलं किंवा वाटतं ते मला ठाऊक नाही. पण मुलाच्या सर्वांगीण हिताकडं पाहून तुम्ही त्यांची ही अटसुद्धा मान्य करावी अशी माझी कळवळीची विनंती आहे.

**योगिता :** ते शक्य नाही दिवाणसाहेब.

**शाहूराव :** ताईसाहेब, श्रीमंत महाराज फार थोड्या काळचे सोबती आहेत.

**योगिता :** तरीसुद्धा स्वाभिमानाचा प्रश्न आला तर —

**शाहूराव :** ताईसाहेब, तुमच्या कै. पतिराजांच्या शेवटच्या इच्छेचा विचार करा: आपला मुलगा गादीवर यावा, प्रजेची सेवा करायची संधी त्याला मिळावी असं त्यांना वाटत होतं, हे खरं आहे ना ?

**योगिता :** तरी पण–

**शाहूराव :** ताईसाहेब, त्यांच्या श्रीमंतांना आणि तुम्हालाही आलेल्या शेवटच्या पत्राची प्रत मी पाहिलीय. [योगिता दारापाशी जाऊन पाठ करून उभी राहते. विचारमग्न. तशी हळूच ] ताईसाहेब, तुमच्यापेक्षा चार उन्हाळेपावसाळे मी जास्त पाहिलेत. तुम्ही हा प्रश्न स्वतःच्या प्रतिष्ठेचा करू नका. छोट्या सरकारांचाच नव्हे तर प्रजेचाही तुम्ही दुवाच घ्याल. [ पुन्हा क्षणभर स्तब्धता. मग— ]

**योगिता :** ठीक आहे. तुम्ही म्हणता त्यात तथ्य आहे. मी हा प्रश्न माझ्या प्रतिष्ठेचा करीत नाही. पण श्रीमंतांची ही योजना स्वीकारण्यापूर्वी मलाही माझ्या काही अटी घालायच्या आहेत.

**शाहूराव :** तुमच्या अटीऽ ?

**योगिता :** होय, होय. माझ्या अटी. श्रीमंत महाराजांनी त्या मान्य केल्या तरच रतनला घेऊन मी शारंगधरला येऊ शकेन.

**शाहूराव :** आपल्या अटी तर सांगा ताईसाहेब ?

**योगिता :** श्रीमंत महाराजांचा माझ्यावर राग झालेला आहे म्हणूनच त्यांनी मला राजवाड्यात पाऊल टाकायची बंदी केलीय, वा माझी स्वतंत्र वेगळी राहायची व्यवस्था केलीय—हे खरं असलं तरी ते रतनला समजता कामा नये. त्याला नुसती शंका आली तरी तो महाराजांचा तिरस्कार करील आणि उठून चालायला लागेल.

**शाहूराव :** त्यासाठी तुम्ही काय मार्ग सुचवता ताईसाहेब ?

**योगिता :** रतनला असंच वाटत राहिलं पाहिजे की ही योजना माझी आहे. वेगळं राहायचा हट्ट माझा आहे. राजवाड्यात पाऊलसुद्धा न घालायचा निश्चय माझा आहे. महाराजांना भेटायचं नाही की त्याच्याशी बोलायचंसुद्धा नाही हे माझं मीच ठरवलंय. महाराजांचा त्यात काही संबंध नाही.

**शाहूराव :** अमळ अवघड आहे पण श्रीमंतांची समजूत काढता येईल.

**योगिता :** समजूत काढण्याचा हा प्रश्न नाही दिवाणसाहेब, रतनला महाराजांच्याबद्दल प्रेम, आदर वाटावा एवढ्याचसाठी ही अट मी घालतेय. चुकूनही कधी श्रीमंत सरकार माझ्याबद्दल वा रतनच्या वडिलांच्याबद्दल तुच्छतेनं बोलले तर—

**शाहूराव :** ताईसाहेब, तुमचा मुद्दा लक्षात आलाय माझ्या. ते सगळं तुमच्या मनाप्रमाणे होऊन जाईल.

**योगिता :** माझी शेवटची अट. माझ्या मुलाची राहण्याची, जेवणाखाणाची, कपड्यालत्त्याची आणि शिक्षणाची काय काय व्यवस्था केली आहे ते पाहण्यासाठी पहिल्या दिवशी मला राजवाड्यावर यावंच लागेल.

**शाहूराव :** त्याला कोणीही हरकत घेणार नाही ताईसाहेब.

**योगिता :** माझ्या मुलाच्या जवळपास राहणं मला भाग आहे आणि तुमची गरज म्हणून मी शारंगधरला येते आहे. म्हणून श्रीमंतांनी देऊ केलेलं घर मी स्वीकारणार आहे. पण ज्यांना आपल्या मुलाबद्दल कधीही माया वाटली नाही आणि माझ्याबद्दल तर एवढा जळजळीत द्वेष, तिरस्कार ज्यांच्या मनात धगधगतोय, त्या तुमच्या श्रीमंत सरकार स्वारींच्याकडून, माझ्या निर्वाहासाठी मी एक पैसासुद्धा कधी घेणार नाही.

**शाहूराव :** ताईसाहेब मग निर्वाहासाठी आपण काय करणार ?

**योगिता :** ते माझं मी पाहीन. हे शिवणयंत्र तर कुठं गेलं नाही ?

**शाहूराव :** ( घुटमळत ) ताईसाहेब, ही तुमची अट श्रीमंत सरकार मान्य करतील असं मला वाटत नाही.

**योगिता :** श्रीमंत सरकारांना आपला नातू हवा असेल तर ही माझी अट मान्य करणं त्यांना भागच पडेल.

**शाहूराव :** ताईसाहेब, राजवाड्याच्या परिसरात आश्रित म्हणून इतकी कुटुंबं —

**योगिता :** मी त्यातली नाही.

**शाहूराव :** ताईसाहेब, समजा महाराज जर असं म्हणाले की —

**योगिता :** ते काहीही म्हणाले तर त्यांना माझा एकच निरोप, मी सांगते त्या शब्दांत स्पष्टपणे सांगा. तुम्ही शारंगधरचे राजे असलात तरी आज हात पसरून काहीतरी मागण्यासाठी तुम्ही माझ्या दाराशी आला आहात. देणारी मी आहे तेव्हा या बाबतीत माझाच शब्द खरा झाला पाहिजे. दॅटस ऑल.

**शाहूराव :** जे काय ठरेल त्याबद्दल तसा लेखी करार व्हावा अशी श्रीमंतांची इच्छा आहे.

**योगिता :** मला त्याची गरज वाटत नाही, पण माझी त्याला हरकतही नाही.

[ तोच रतन येतो. पाठोपाठ दोन पिशव्या घेऊन अप्पूही येतो. ]

**रतन :** हे बिल, हे पैसे आणि पिशव्या. ए अगं, गणोरभाई म्हणाले–

**शाहूराव :** ( उठत ) ओ हो ! हेच का आमचे छोटे सरकार ? मुजरा सरकार.

[ मुजरा करतात. तशी परत त्यांना तसाच मुजरा करीत रतन– ]

**रतन :** मुजरा दिवाणसाहेब.

**शाहूराव :** ( रतनला जवळ घेत ) छोटे सरकार, मोठ्यांनी छोट्यांना नाही मुजरा करायचा. किंचित अशी ( करून दाखवीत ) मान झुकवून मुजरा घ्यायचा.

**रतन :** पण छोटे कोण ? दिवाणसाहेब तुम्ही का मी ?

**शाहूराव :** अर्थात मीच. आपण गादीचे वारस. एक दिवस आपण दहावे हिंमत बहाद्दर राजे म्हणून शारंगधरच्या गादीवर बसणार आहात.

**योगिता :** रतन तुझ्या आजोबांनी तुला यापुढं शारंगधरच्या राजवाड्यावर कायमचं राहायला बोलावलंय.

**रतन :** आणि तू ?

**योगिता :** अरे जिथं तू तिथं मी असणारच की !

**रतन :** आणि माझी शाळा ? क्रिकेट ? नाटक ?

**शाहूराव :** तुमच्यासाठी सगळी खास व्यवस्था करायचं श्रीमंत सरकारांनी ठरवलंय. मग येणार ना तुम्ही छोटे सरकार ?

**रतन :** 'अगं' म्हणेल तसं करायचं.

**शाहूराव :** ( बुचकळ्यात पडून ) अगं ? कोण अगं ?

**योगिता :** त्याची 'अगं' म्हणजे मी. त्याचे वडील मला 'अगं' म्हणूनच हाक मारायचे. तेवढंच या बाळराजांनी लहानपणी वडिलांपासून उचललं.

**शाहूराव :** ( हसत ) असं असं...

**रतन :** पण दिवाणसाहेब, इतक्या वर्षांत आजोबांनी एकदासुद्धा आम्हाला शारंगधरला कसं बोलावलं नाही हो ?

**शाहूराव :** ( गडबडून ) ते म्हणजे...त्याचं असं झालं...म्हणजेऽऽ

**योगिता :** अरे ते दिवाणसाहेबांना काय पुसतोस ? कधीतरी तुझ्या आजोबांनाच विचार. पण त्यांची खुषी-नाखुषी पाहून विचार हो. नाहीतर गेल्या गेल्या तुझी सरबत्ती सुरू करशील.

**रतन :** पण दिवाणसाहेब, आजोबा फार रागीट आहेत का हो ?

**शाहूराव :** कोणी बेशिस्तपणे वागला तर त्यांना राग येतो.

**रतन :** पण आमच्या शाळेतल्या गणपुले सरांच्या सारखे ते मारकुटे तर नाहीत ना ?

[ सगळे हसतात. ]

**योगिता :** काहीतरीच काय विचारतोस रे रतन ?

**रतन :** अगं काहीतरीच नाही काही. जरा चुकलं किंवा कोणी हसलं की सर पालथ्या हातावर उभ्या पट्टीनं मारतात.

[ सगळे हसतात. ]

**शाहूराव :** ( हसू आवरीत ) आजोबा कसे असतील असा तुमचा अंदाज आहे छोटे सरकार ?

**रतन :** मी सांगू ? ते कितीही रागीट असले तरी माझ्याशी ते प्रेमानं गोडगोडच वागणार. कारण सांगू का ए अगं ? अगं मी कोण आहे त्यांचा ?

**योगिता :** नातू असलास म्हणून काय झालं ?

**रतन :** इथंच फसलीस तू अगं. आजच मराठीच्या तासाला सरांनी नवा धडा शिकवला. नातू म्हणजे काय ? दुधावरची साय.

[ 'वा वा' करून शाहूराव त्याला पोटाशी घेतात. सगळे हसतात.]

**शाहूराव :** ताईसाहेब, गादीच्या भवितव्याबद्दल मी निश्चिंत झालो. ही दुधावरची साय सगळ्यांचीच तोंडं गोड करणार आहे.

**योगिता :** तरी पण दिवाणजी —

**शाहूराव :** ताईसाहेब, आता बोलण्यासारखं काही उरलंच नाही. तुम्ही श्रीमंत सरकारांच्या अपेक्षा मान्य केल्यात. श्रीमंत सरकारांच्या वतीनं मी तुमच्या सगळ्या

मागण्या मान्य करतो आहे. इथला सगळा प्रपंच आवरून निघायची तयारी करायला तुम्हाला आठ एक दिवस पुरतील ?

**योगिता :** पुरतील पण —

**शाहूराव :** ताईसाहेब तुम्ही पैशाची काळजी करायची नाही. ( खिशातून नोटांची चवड काढीत ) किती देऊ ? हजार, पंधराशे, दोन हजार...?

**योगिता :** पैशाबद्दलही आपलं बोलणं झालंय, नाही का ?

**शाहूराव :** ताईसाहेब, ते फक्त तुमच्या संदर्भात. हे पैसे श्रीमंत सरकारांनी छोटे सरकारांच्या खर्चासाठी दिलेत. नाही म्हटलं तरी त्यांना कपडेलत्ते करावे लागतील. इथून जाताना मित्रांना, आप्तेष्टांना काही भेटी द्याव्या लागतील, शिवाय–

**रतन :** किती पैसे खर्च करायची मला परवानगी आहे दिवाणसाहेब ?

**शाहूराव :** तुमच्या मर्जीला येईल तितके.

**रतन :** या पैशातून मी माझ्या मित्रांना काहीबाही दिलं तर ते आजोबांना आवडेल ?

**शाहूराव :** ती चिंता करू नका छोटे सरकार तुम्ही. दुधावरल्या सायीला हव्वं ते द्या असा श्रीमतांचा मला हुकूम आहे. ( चवड पुढं करीत ) घ्याऽ...

**रतन :** थांबा थांबा... इतके नकोत. ( चवडीतून शंभराची एक नोट काढीत ) अप्पू... फार वर्षे तुला घड्याळ घ्यायचं होतं नाही का एक ? त्यासाठी घे...माझी आठवण म्हणून घे रे. ( नोट अप्पूच्या हातात कोंबतो ) दिवाणसाहेब, आमच्या सुभानमामाला एक गरम कोट शिवायचाय. थंडीच्या दिवसांत गॅलरीत बसून हूहूहूहू... मेलो मेलो म्हणून विवळत असतो ( एक नोट त्याच्या हातात देत ) आगोदर कोट शिवायचा बरं का मामा. अप्पू, (आणखी दोन नोटा काढीत) या बिस्त्याला दे आणि आईला नेऊन डॉक्टरला दाखव, नीट औषधपाणी कर म्हणावं.

**योगिता :** ( पुढं होत ) झालं.. संपलं ना ?

**रतन :** छे छे, इतक्यात कसं संपेल ? ए अगं—

**योगिता :** दिवाणसाहेब, ती नोटांची चवड उचलून खिशात घाला. सगळ्याची खिरापत करून टाकील हा. स्वतःजवळ असेल ते दुसऱ्याला देत सुटण्याचा भयंकर सोस आहे पोराला.

**शाहूराव :** असू दे. काही बिघडत नाही. किती झालं तरी राजरक्त आहे ते. छोटे सरकार, ही नोटांची चवडच इथं ठेवतो मी. ताईसाहेब, आठ दिवसांनी गाडी घेऊन येतो मी. बरंय छोटे सरकार... मुजरा ! [ तशी रतन मुजरा करण्यासाठी वाकणार तेवढ्यात शाहूराव हसून 'ऊंहूंऽ' म्हणतात. मग रतन ऐटीत मान झुकवून मुजरा घेतो. शाहूराव 'शाब्बास' म्हणून त्याला पोटाशी घेतात तोच––अंधार ].

**प्रवेश पहिला संपला**

# अंक पहिला

## प्रवेश दुसरा

[ नीलकमल राजवाड्यातील एक महाल. जुन्या राजशाही संस्थानी वैभवाला साजेल शोभेलशी सजावट. समोरच्या भिंतीत दोन अथवा तीन प्रचंड खिडक्या. खिडक्यांच्या बाहेर कमानी असलेला व्हरांडा. त्यातून राजप्रासादाचे डावे-उजवे विभाग तर दिसतातच, पण तळमजल्यावरील समोरचे विस्तीर्ण पटांगण, बागबगीचा, हौद, कारंजी आणि दूर क्षितिजावर डोंगरावर असलेला 'गगनभेदी' किल्ला सहज दृष्टीला पडतात. डाव्या आणि उजव्या भिंतीवर पूर्वीच्या राजांच्या तसबिरी आहेतच. त्यातच एक तसबीर इंग्लंडचे राजे सम्राट सहावे जॉर्ज आणि महाराणी मेरी यांचीही आहे. मध्यभागी महाराजांचे उच्चासन आहे. रंगमंच प्रकाशाने उजळतो त्या वेळी महाल रिकामा आहे. वेळ सकाळी दहा वाजण्याची.

क्षणार्धाने कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज ऐकू येतो. पाठोपाठ महाराजांच्या धीर-गंभीर स्वरात जरब ऐकू येते– "रुद्राजी, टायगर अजून मोकळा काय म्हणून? छोटे सरकारांना घेऊन दिवाणसाहेब एवढ्यात येतील हे ठाऊक नाही? पोर नवखा आहे. मुंबईत वाढलेला. टायगर नुसता वास घेण्यासाठी जवळ झेपावला तरी पोरगा भीतीने गारठून बेशुद्ध होईल. टायगर काय दंगल उडवील याचा अंदाज करता येत नाही का तुम्हा लोकांना? जा, टायगरला त्याच्या महालात खबरदारीनं बांधून ठेव!"

त्यावर रुद्राजी म्हणतो– "जी सरकार बंदोबस्त एकदम पक्का!"

नंतर काठी टेकत सटवाजीचा– एका चपराश्याचा आधार घेत सुमारे पाऊणशे वर्षांचे नववे हिंमत बहाद्दर जिवाजी मल्हारराव महाराज प्रवेशतात. उग्र मुद्रा, कल्लेदार मिश्यांच्या आकड्यामुळे अधिकच धाक निर्माण करणारी. पावलाला

बांधलेल्या बँडेजवरून श्रीमंत सरकार जखमी आहेत हे सहज लक्षात यावे. येता येता श्रीमंत सरकार म्हणतात– ]

•

**जिवाजी मल्हारराव :** हूंऽऽऽ ! अस्संऽऽऽ ! तर सटवाजी मूल गोड आहे म्हणतोस ?

**सटवाजी :** ( अदबीनं ) जी सरकार.

**जिवाजी म. :** ( आसनाजवळ थबकून ) गोड म्हणजे हुशार ? चमकदार ?

**सटवाजी :** जी सरकार.

**जिवाजी म. :** तेजस्वी ? तडफदार ? एकदम तरतरीत ?

**सटवाजी :** जी सरकार.

**जिवाजी :** नखशिखान्त राजबिंडा ?

**सटवाजी :** जी सरकार.

**जिवाजी :** अरे असणारच ! त्यात नवल काय सटवाजी ? लहानपणी आम्ही देखील असेच होतो– गोड, हुशार, चमकदार, तेजस्वी, तडफदार, तरतरीत, एकदम नखशिखान्त राजबिंडे !

**सटवाजी :** जी सरकार.

**जिवाजी :** सटवाजी, शिलाहार घराण्यात जन्माला आलेली मुलं अशीच असतात. आमचा रणजित असा होता. या पोराचा बाप जितेंद्रही असाच होता. हा आमचा नातू असाच असणार. काय ?

**सटवाजी :** जी सरकार.

**जिवाजी :** आमच्या राणीसाहेब मूर्ख, भोळसट, डोक्याने जरा ढिल्याच होत्या. त्यांच्या माहेरची सगळीच मंडळी अमळ अर्धवट खुळसटच. म्हणजे काय– धोरण नाही. पुरता पोच नाही. त्यामुळं राणीसाहेबांनी मुलांचे फाजील लाड केले. कारटी बेछूट निघाली. त्याने तिकडे तसे गुण उधळले. रणजितने सिनेम्यात रे. याने इकडे हे दिवे लावले. जितेंद्र युद्धावर गेला. मरायचा तो मेला पण हा घोळ करून ठेवला. अजून निस्तरतो आहोत आम्ही तो. त्या कारटीचं तर नावच काढायला नको. शाण्णव कुळीत जन्म घेऊन भटाशी लग्न केले. अरे मोठा बॅरिस्टर झाला तरी पटवर्धन म्हणजे भटच ना ? मोठा नामांकित वकील असेल. पैसाही मिळवीत असेल. पण घराण्याचं काय ?

**सटवाजी :** जी सरकार.

**जिवाजी :** तरी पण त्यातल्या त्यात अक्काच शहाणी म्हणायची. संसार तरी तिने बरा केला. आम्ही तिचे तोंड पाहिले नाही पण आपले दिवाणसाहेब सांगत असतात

मुलीचे एकेक कौतुक. अरे राजतेज ते राजतेजच. काय ?

**सटवाजी :** जी सरकार.

**जिवाजी :** काय रे सटवाजी, मुलगा दिसतो कसा ? बाकी विचारायचे कशाला ? तो त्याच्या बापासारखाच दिसत असणार.

**सटवाजी :** जी हां सरकार. तरी पण जास्त करून आईच्या वळणावर...

**जिवाजी :** ( उसळून ) महामूर्ख आहेस तू सटवाजी. तुला काडीची अक्कल नाही. बुद्धीने तू मद्दड आहेस. तुला नीट दिसत नाही. म्हातारपणामुळं तुझी दृष्टी अधू झालीय. तुला माणसांचा चेहरामोहरा नीट पाहता येत नाही.

**सटवाजी :** जी सरकार.

**जीवाजी :** अरे मठ्ठ माणसा, या मुलाची आई कोण आहे म्हणून तू समजलास ? तुला ती काय राजकन्या वाटली, की शाण्णव कुळातली सरदारकन्या ? अरे यःकश्चित एका अनाथाश्रमात वाढलेली ही गरिबाघरची पोर. मी सांगतो तुला सटवाजी, या पोरीनं जाळं टाकलं आणि हा पाघळलेला गधडा त्यात अडकला. अरे एकेक वेळी नुसती याद आली तरी आमच्या सर्वांगाचा भडका उडतो. आमच्या तळपायाची आग– ( थबकतो. सुस्कारतो ) पण असो ! असो ! असो ! ते आता उकरीत बसायचं नाही. आमच्या तब्येतीसाठी. काय ?

**सटवाजी :** बरोबर सरकार.

**जिवाजी :** तरी पण तुला बजावून ठेवतो सटवाजी, मूल अगदी सही सही आमच्याच घराण्याची चेहरेपट्टी उचलणार. अरे कलमी आंब्याच्या झाडाला कधी भिकार गावरान फळं लागली आहेत का सटवाजी ?

**सटवाजी :** छे छे, भलतंच काय सरकार ?

**जिवाजी :** अरे माती कशीही असली तरी बीज आपला धर्म सोडीत नाही. मला सांग सटवाजी, आमचा रणजित म्हणा किंवा जितेंद्र म्हणा, लहानपणी कोणासारखे दिसायचे ?

**सटवाजी :** आपल्यासारखेच सरकार.

**जिवाजी :** शाब्बास ! त्यांची बुद्धी, त्यांची हुशारी, त्यांचं तेज, त्यांचा राजबिंडेपणा कोणासारखा होता ?

**सटवाजी :** थेट आपल्यासारखाच सरकार.

**जिवाजी :** शाब्बास पठ्ठे. मग आता सांग तू सटवाजी, जितेंद्राचा हा मुलगा कोणासारखा दिसणार ? कोणासारखा असणार ?

**सटवाजी :** छोट्या सरकारांच्या सारखाच सरकार.

**जिवाजी :** भले भले गडी भले...म्हणजे कोणासारखा रे सटव्या ? जरा डोकं चालव

...डोकं चालव....

**सटवाजी** : हा काय प्रश्न आहे ? सरकार बिलकुल आपल्यासारखाच की.

**जिवाजी** : भले बहाद्दर सटवाजीराव, तुम्ही नेमकी गोष्ट हेरलीत. तुम्हाला नक्त रुपये दोन इनाम. खाजगीतून घेऊन चला.

**सटवाजी** : या आठवड्यातील दंड आणि बक्षिसी यांचा पक्का हिशेब अजून व्हायचाय सरकार.

**जिवाजी** : तो होऊन जाईल. हे दोन रुपये पगारवाढीचे आहेत. समजलास सटवाजी ?

**सटवाजी** : जी सरकार. आपण बसावं आता. पाय दुखणाईत आहे. फार कष्ट होतील.

[ "हां...हूं...अगई गंऽऽ" करीत जिवाजी मल्हारराव स्थानापन्न होतात. तेवढ्यात दिवाणसाहेब शाहूराव येतात व मुजरा करतात तशी–]

**जिवाजी** : या दिवाणसाहेब. काय खबरबात !

**शाहूराव** : छोट्या सरकारांना घेऊन योगितादेवी वाड्यावर आल्या आहेत सरकार.

**जिवाजी** : ( उसळून ) तिला तुम्ही आमच्या पुढ्यात तरी देवीबिवी म्हणू नका. चार बायकांसारखी ती एक क्षुद्र सामान्य आश्रयार्थी बाई. तिला आपली पायरी दाखवायलाच हवी.

**शाहूराव** : सरकार, या विषयावर आपलं सविस्तर बोलणं झालंय. छोट्या सरकारांच्या मातुःश्रींना आपण सन्मानानं वागवलं पाहिजे.

**जिवाजी** : केवळ एक धोरण म्हणून वागवू. पण एरवी आम्हाला तिचं तोंडसुद्धा पाहायचं नाही.

**शाहूराव** : ठरल्याप्रमाणं करार झाल्यावर त्या पुन्हा या वाड्यात पाऊलसुद्धा घालणार नाहीत. पण छोट्या सरकारांच्यापुढं त्यांच्या मातुःश्रीबद्दल आपल्या तोंडून एकसुद्धा वावगा शब्द निघणार नाही—

**जिवाजी** : ( ओरडून ) नाही, नाही, नाही ! एकदा आम्ही शब्द दिला तो दिला. पण त्या बेमुर्वतखोर, उद्धट आणि गर्विष्ठ पोरीला तुम्ही अटी घालू दिल्यात, इथं तुमची शिष्टाई फसली दिवाणसाहेब.

**शाहूराव** : ते कालांतरानंच ठरेल सरकार.

**जिवाजी** : पण ही अट घालण्यात तिचा काहीतरी कावा आहे हे तुमच्या नाही लक्षात आलं दिवाणसाहेब ?

**शाहूराव** : कावा म्हणाल तर तो एकच आहे. तोही उघड आणि स्पष्ट आहे. छोट्या सरकारांना आपल्याबद्दल गाढ मायाममताच निर्माण झाली पाहिजे.

**जिवाजी** : तिला आमच्यावर छाप ठेवायची आहे. आपला चांगूलपणा तिला आमच्यासमोर मिरवायचा आहे आणि—

**शाहूराव** : सरकार आपली आणि त्यांची ही पहिली आणि शेवटची भेट आज होणार आहे, हे त्या पक्के जाणून आहेत. मग छाप ठेवायचा आणि चांगुलपणा मिरवायचा प्रश्न येतोच कुठे ?

**जिवाजी** : हूंऽऽ ! तरीपण दरबारच्या रीतिरिवाजाप्रमाणं तुम्ही तिच्या बंगल्यावर धान्यधुन्य, दूध, भाजीपाला—

**शाहूराव** : सरकार, आपण त्या गोष्टी माझ्यावर सोपवाव्यात. कालमान पाहून सगळं काही ठीक होईल.

**जिवाजी** : हूं... तुमच्या मनाप्रमाणं होऊ द्या. छोटे सरकार वाड्यावर आलेत म्हणता मग मूल आहे कुठे ? ती जगदंबा कुठाय ?

**शाहूराव** : ठरल्याप्रमाणं छोट्या सरकारांची काय काय व्यवस्था केली आहे त्याची तपशीलवार माहिती त्या जातीनं घेताहेत.

**जिवाजी** : आणि मूल ?

**शाहूराव** : छोटे सरकार बाहेर व्हरांड्यात टायगरशी खेळताहेत.

**जिवाजी** : ( थक्क होत ) खेळताहेत ? टायगरशी ? सटवाजी धाव...छोट्या सरकारना घेऊन ये आधी. ( सटवाजी धावत जातो. )

दिवाणसाहेब, टायगरने मुलाला निमूटपणे अंगाला हात लावू दिला म्हणता ? अरे तो परक्या माणसाला जवळपास फिरकू देत नाही कधी.

**शाहूराव** : छोट्या सरकारांच्या स्पर्शात आणि शब्दांत काय जादू आहे कोण जाणे. बोल बोल म्हणता टायगर त्यांना बिलगला.

**जिवाजी** : आश्चर्य आहे. बाकी त्यात आश्चर्य कसले ? हा राजरक्ताचा प्रभाव.

**शाहूराव** : मी इशारा दिला तशी छोटे सरकार म्हणतात—

'दिवाणसाहेब, मी या टायगरला भीत नाही. मला सगळ्यांनी धाक घातला आहे त्या 'तिकडच्या टायगरचा !'

[ जिवाजी मल्हारराव गालातल्या गालात हसतात. बहुधा कित्येक वर्षांनी. तेवढ्यात रतन धावत येतो आणि दोन हात अंतरावर थबकतो. दक्षचा पवित्रा घेत मुजरा करतो. आणि त्याच वेळी तोंडाने पुकारा करतो– 'मुजरा सरकार !' मग लागलीच जवळ जातो आणि काय होतंय ते कळण्यापूर्वीच जिवाजी मल्हाररावांच्या गळ्याला मिठी मारीत त्यांच्या गालाचा तो मुका घेतो. तशी—]

**जिवाजी** : ( अमळ गडबडून ) अरे हे काय ? हा काय प्रकार आहे छोटे सरकार ? प्रथम मुजरा काय केलात, मग गालाचा पापा काय घेतलात ?

**रतन** : मुजरा केला आपण राजे आहात म्हणून. पापा घेतला तो तुम्ही माझे आजोबा आहात म्हणून.

**जिवाजी :** हे धडे कोणी शिकवले तुम्हाला बाळराजे ?

**रतन :** तुम्हाला मुजरा करायचा असतो असं सटवाजीराव म्हणाले.

**जिवाजी :** ऊंऽऽ ? सटवाजी, जरा जपून. छोट्या सरकारना रीतभात शिकवायची नोकराचाकरावर पाळी आली नाहीये अजून वाड्यावर.

**सटवाजी :** चूक घडली सरकार. माफी असावी.

**जिवाजी :** आणि पापा घ्यायला कोणी सांगितलं ? तुमच्या मासाहेबांनी ?

**रतन :** छे छे, ते मीच मला शिकवलं. अगंला वेळ कुठं होतो मला काही शिकवायला ? दिवसभर टर्रर्रऽऽऽ खट्! टर्रर्रऽऽ खट्ट! म्हणजे शिवणकामाचं मशीन.

**जिवाजी :** 'अगं' म्हणजे कोण ?

**शाहूराव :** मातु:श्री. वडिलांचं ऐकून ऐकून छोटे सरकार देखील त्यांना 'अगं' म्हणायला लागले.

**जिवाजी :** होय बाळराजे ?

**रतन :** मग ? पपा कसे म्हणायचे..." अगं ते आपलं हे दे...अगं ते आपलं ते दे" की अगं त्यांना हे द्यायची आणि ते द्यायची.

**जिवाजी :** 'हे दे' आणि 'ते दे' म्हणजे काय ?

**रतन :** ते फक्त अगंलाच कळायचं. मी सुद्धा आता तसंच म्हणतो आणि अगंला नेमकं कळतं. कसं कळत असेल हो आजोबा ?

**जिवाजी :** ते तुमच्या 'अगं'लाच कधी विचारलं नाहीत का तुम्ही बाळराजे ?

**रतन :** एकदा विचारलं होतं तर अगं माझ्यावरच गुरकावली. म्हणाली "उद्या तुझं लग्न झालं आणि तुझी 'अगं' या घरात आली म्हणजे तिलाच विचार असले पांचट सवाल !"

**जिवाजी :** (हसत) भले भले बाळराजे.... बहार झाली !

**रतन :** आजोबा, तुम्ही मला मघापासून सारखे 'बाळराजे' नाहीतर 'छोटे सरकार' म्हणून का म्हणताय ? मला नावानं का नाही हाक मारीत ?

**जिवाजी :** तुझं नाव काय आहे ते तू कुठं आम्हाला सांगितलं आहेस ?

**रतन :** आजोबा, मी तुमचा एकुलता एक नातू... आणि तुम्हाला माझं नावसुद्धा माहीत नाही ? असं कसं होईल ?

**जिवाजी :** तुला तरी आमचं नाव ठाऊक आहे का ?

**रतन :** हात् तेरी ! तुमचंच काय, पण तुमच्या वडिलांचं, आजोबांचं, पणजोबांचं, खापरपण जोबांचं, खापर खापर पणजोबांचं... सगळ्या हिंमतबहाद्दरांची नावं पाठ आहेत मला.

**जिवाजी :** सांग पाहू कोण हिंमतबहाद्दर होऊन गेले ?

**रतन :** सांगू? पहिले हिंमत बहाद्दर विक्रमादित्य, दुसरे भीमाशंकर, तिसरे बच्चाजी बाळा, चौथे रामदेवराय, पाचवे शंभूनाथ, सहावे राजेंद्रसिंह, सातवे मालोजी, आठवे भोलेशंकर आणि नववे तुम्ही, जिवाजी मल्हारराव शिलाहार हिज हायनेस के सी. आय. ई. राजा ऑफ शारंगधर... (पाढे म्हणावे तशी यादी म्हणून टाकतो.)

**जिवाजी :** शाब्बास पठ्ठे!

**रतन :** पण यातले पहिले हिंमतबहाद्दर विक्रमादित्य काय ते खरे बहाद्दर होते आजोबा. त्यांनी शारंगधरचं राज्य स्थापन केलं. बाकी सगळे आपले रामा शिवा गोविंदा! म्हणजे नावाचेच हिंमत बहाद्दर. तुम्ही वगळून बरं का.

**जिवाजी :** का? आम्हाला कशासाठी वगळलंस? आम्ही काय पराक्रम केलाय असा?

**रतन :** सांगू? तुम्ही खूपदा चौरंगी सामन्यात सेंचऱ्या काढल्या आहेत... खरं आहे की नाही बोला?

**जिवाजी :** हे हे सगळं तुला कोणी सांगितलं, शिकवलं रे बेटा?

**रतन :** 'अगं' शिवाय मला दुसरं कोण सांगणार आणि शिकवणार? आजोबा, अगंला सगळं सगळं माहीत आहे. तिला सगळं येतं.

**जिवाजी :** असंऽ?

**रतन :** तर काय? अहो स्पिन बोलिंग कशी टाकायची तेसुद्धा अगंनंच मला शिकवलं की!

**जिवाजी :** स्पिन बोलिंग? आणि ते शिकवायला कोणत्या ग्राऊंडवर घेऊन जात होत्या बाईसाहेब तुला?

**रतन :** ग्राऊंडबिऊंड काही नाही. आमच्या चाळीच्या गच्चीवरच आमचं पीच होतं. असा मजा यायचा म्हणता! आजोबा, तुम्ही मॅचमध्ये चिक्कार सिक्सर्स मारीत होता नाही का? मला ठाऊक आहे, तुम्ही अगदी तडा तडा फोडून काढीत होता वाट्टेल तसले बॉल. बोलर अगदी रडकुंडीला यायचे... खरंय ना?

**जिवाजी :** फार जुना काळ झाला तो आता. आता या म्हातारपणात फक्त आठवणीच उगाळायच्या.

**रतन :** काहीतरीच. तुम्ही काही इतके म्हातारे झाला नाहीत आजोबा.

**जिवाजी :** इतके म्हणजे किती?

**रतन :** तुम्ही मनावर घेतलंत तर स्ट्रोक कसे मारायचे ते अजून मला शिकवू शकाल. अगदी बसल्या बसल्यासुद्धा!

**जिवाजी :** भले भलेऽऽ आणि या जखमी पायाचं काय करू?

**रतन :** (पायावरून हलकेच मायेनं हात फिरवीत) घोड्यावरून तुम्ही पडलात

आजोबा ?

**जिवाजी :** पडलो नाही, त्या नाठाळ जनावरानं पाडलं आम्हाला. पण त्याचा माज पुरता उतरवल्यावाचून सोडला नाही हरामजाद्याला. पाय कधी बरा व्हायचाय देव जाणे.

**शाहूराव :** सरकार, खरं म्हणजे जखम अशी आता उरली नाही. पण दरबार सर्जन म्हणत होते की सकाळ संध्याकाळ आपण रपेट मारल्याखेरीज—

**जिवाजी :** पाय पुरता दुरुस्त होणार नाही— असंच ना ? ते ठाऊक आहे आम्हाला. पण या सटवाजीला वेळ कुठाय ? तो एकदा तरी सूर्योदयापूर्वी उगवलाय काय ते विचारा त्याला. गव्हर्नरापेक्षा त्याला कामं जास्त झालीत आताशा. कोणाचा तरी आधार असल्याशिवाय आम्ही एकटे नुसते काठी घेऊन बाहेर पडणार आहोत का शाहूराव ?

**सटवाजी :** तसं नाही सरकार. आपण जरा समजून घ्यावं.

**जिवाजी :** सगळं काही समजून चुकलोय मी सटवाजी.

**रतन :** आजोबा, आता मी आलोय ना ? आता मीच तुमची काठी. तुम्ही म्हणाल तेव्हा, म्हणाल तिथं मी तुम्हाला घेऊन जाईन.

**जिवाजी :** ( खुलून ) भले भलेऽऽ... यंव रे यंव... शाहूराव आमच्या उभ्या हयातीत शिलाहार घराण्यात हा एक नग तेवढा बावनकशी निघाला. काठीराव, आधार देण्याची तुम्ही बात बोललात, यात आम्ही सगळे सगळे भरून पावलो. याबद्दल एक छानसा पापा द्याल का ?

[ हे ऐकताच रतन जिवाजी मल्हाररावांना चटकन् बिलगत गाल पुढे करतो. जिवाजी मल्हारराव त्याचा प्रेमाने पापा घेतात. तेवढ्यात आतमध्ये दूरवर पाहात शाहूराव म्हणतात– ]

**शाहूराव :** सरकार, ताईसाहेब... छोट्या सरकारांच्या मातुःश्री, भेटीसाठी वाट पाहताहेत. तेव्हाऽऽ...

**जिवाजी :** हुंऽऽ ! मग काय सोनाजीराव –

**रतन :** सोनाजीराव ! अप्पू मला सोनचाफा म्हणतो हे तुम्हाला हो कसं कळलं आजोबा ?

**जिवाजी :** अप्पू कोण ते आम्हाला ठाऊक नाही. पण तुला तो सोनचाफा म्हणत असला तर ते रास्तच आहे. आम्हाला तू सोन्यासारखा आहेस म्हणून सोनाजीराव. दहावे हिंमतबहाद्दर सोनाजीराव... काय दिवाणसाहेब ?

**शाहूराव :** नाव निवडण्यातसुद्धा सरकारांची कधी चूक व्हायची नाही.

**जिवाजी :** तर सोनाजीराव घोड्यावर बसणार का ?

**रतन :** लाकडी ?

**जिवाजी :** छे छे लाकडी काय म्हणून ? अस्सल अबलख तट्टू.

**रतन :** घरातीतले की सर्कशीतले ?

[ जिवाजी खळखळून हसतात. )

**शाहूराव :** छोटे सरकार, श्रीमंतांनी खास तुमच्यासाठी एक सुरेख तट्टू पागेत वाढवले आहे.

**जिवाजी :** बोला, घोड्यावरून फेरफटका मारणार ?

**रतन :** ( हुरळून ) खरंच म्हणता ? आज ? आत्ता ? चला चला आधी चला. (धावू लागतो. थबकतो. वळून ) आजोबा, तुम्ही मला फार आवडलात. मुजरा करू की पापा घेऊ ?

[ जिवाजी मल्हारराव खुलून गाल पुढे करतात. रतन त्यांचा पापा घेतो व धावत जातो. मग— ]

**जिवाजी :** ( हाकारून ) रुद्राजी, छोट्या सरकारांना पागेकडं घेऊन जा. सुलतानला सांग मूल नवखा असला तरी फाजील धाडसी आहे. नीट संभाळून न्या. [ आतून रुद्राजी 'जी सरकार' म्हणतो. मग ] सटवाजी, तू या वाड्यावरला सर्वांत जुना नेकीचा चाकर. इमानाला स्मरून सांग, तू असले मूल या वाड्यावर यापूर्वी कधी पाहिले आहेस ?

**सटवाजी :** नाही सरकार. माझ्या उभ्या हयातीत असले धाडस कोणी केलेले मी पाहिले नाही. हांऽ, आता आपण पोरवयाचे होता त्या वेळी थोरल्या आईसाहेबांनीच आपली काही पापी घेतली असली तर—

**जिवाजी :** ( उसळून ) क...काय काय म्हणालास ?

**सटवाजी :** आता आई म्हटली की मुलाचा पापा घेणारच की. पण आपल्या मुलांपैकी हे हे धाडस —

**जिवाजी :** गाढवा, आम्ही काय पापा घेण्याबद्दल विचारतोय ? सटवाजी, तुझ्या खांद्यावर डोकं आहे का देवानं मडकं ठेवलंय ?

**सटवाजी :** नाही का ? मला वाटलं सरकार की आपण—

**जिवाजी :** तुला काय वाटलं ते कळलं. आधी धाव आणि छोट्या सरकाराच्या पाठीशी राहा. पोराला काही इजा झाली तर आम्ही तुला जबाबदार धरू, बजावून ठेवतोय. जा पळ... !

[ मुजरा करून सटवाजी धावत जातो. मग— ]

**जिवाजी :** हूंऽऽ दिवाणसाहेब, बोलवा त्या जगदंबेला. पण सगळा मामला झटपट उरकून टाका आणि तिला पिटाळा.

**शाहूराव :** जी सरकार. ( एक फाईल पुढे ठेवीत ) या फाइलीत कराराच्या दोन प्रती ठेवल्या आहेत. आपण नजरेखाली घालव्यात एकदा.

[ जिवाजी मल्हारराव फाईल उघडून कराराचा कागद काढतात. आणि चष्मा लावून वाचू लागतात. शाहूराव जातात. क्षणभराने पुन्हा ते येतात. पाठोपाठ योगिताही येते. जिवाजी मल्हारराव वाचण्यात गढल्याचं नाटक करतात. ती साधा नमस्कार करते. ते न बघता किंचित मान हलवून नमस्कार घेतल्यासारखं करतात व त्याच वेळी खुर्चीकडे हातानं सहज निर्देश करतात. शाहूराव तत्परतेनं खुर्ची पुढं करीत. "या ताईसाहेब... बसा." असं अगत्यानं म्हणतात. क्षणार्ध बोचक शांतता. योगिता तेवढ्यात चौफेर नजर टाकून महाल न्याहाळून घेते. ]

**जिवाजी :** ( मान वर न करताच ) काय नाव आहे म्हणालात बाईंचं ? विचारा दिवाणसाहेब.

**योगिता :** श्रीमंत सरकारांना विसर पडला असेल तर दिवाणसाहेब त्यांना सांगा माझं नाव श्रीमती योगिता जितेंद्र.

**जिवाजी :** ( ताडकन् फाईल आपटत वर पाहतात. पण दुसरीकडे आणि ) अनाथाश्रमातल्या मुलींना स्वतःच्या नावापुढं आडनाव लावायला कदाचित मिळत नसेल. पण जितेंद्रानं बाईंशी लग्न केलं होतं आणि जितेंद्र शेवटपर्यंत 'शिलाहार' हे घराण्याचं नाव अभिमानानं लावत होता, असा आमचा समज आहे. दिवाणसाहेब बाईंना विचारा 'शिलाहार' या नावाची त्यांना एवढी लाज वाटते आहे का ?

**योगिता :** 'लाज' मला वाटत नाहीये दिवाणसाहेब, शिलाहार घराण्याला माझी लाज वाटते आहे. ज्यांनी माझा पत्नी म्हणून स्वीकार केला त्यांचं नाव मी लावतेच आहे. मात्र ज्या घराण्यानं मला स्वीकारलं नाही त्याच्या नावाचा सुद्धा गैरफायदा घ्यायची माझी इच्छा नाही.

**जिवाजी :** ( आसनावरच रागानं तिच्याकडे तिरकी पाठ करून बसत ) दिवाणसाहेब, बाईंना सांगा, जुन्या गोष्टी उकरून काढण्याची आमची इच्छा नाही.

**योगिता :** दिवाणसाहेब, श्रीमंतांना सांगा की जुन्याच गोष्टी उगळायच्या असत्या, तर मी इथं यायची तसदीच घेतली नसती.

**शाहूराव :** ( खाकरत ) मला वाटतं सरकार, आपण इतर गोष्टी सोडून मुद्द्याच्या विषयाकडं वळू या. ताईसाहेब, छोट्या सरकारांच्या राहण्याची, जेवणाखाण्याची, अभ्यासाची, खेळाची, कपड्यालत्त्याची आणि इतर लहानसहान बाबींची व्यवस्था श्रीमंत सरकारांनी खुद्द आपल्या देखरेखीखाली केली आहे. खाजगी कारभाऱ्यांनी आपल्याला ती तपशीलवार दाखवली असेलच ?

**योगिता :** होय दिवाणसाहेब, दाखवली.

**शाहूराव :** छोट्या सरकारांच्यासाठी पोहोण्याचा तलाव आहे, मैदानी आणि मर्दानी खेळासाठी जिमखाना आहे, नेमबाजीसाठी रेन्ज आहे, रायडिंगसाठी घोडे आहेत, स्वतःची अभ्यासिका आहे, तरतऱ्हेचे देशीविदेशी खेळाची सिद्धता आहे, निरनिराळी वाद्ये संगीतालयात ठेवली आहेत, दिमतीला नोकर–चाकर आहेत शिवाय गव्हर्नेस म्हणून—

**जिवाजी :** दिवाणसाहेब, आम्हाला तुमचं आश्चर्य वाटतं. ज्यांचा जन्म एका मुंबईतल्या चाळीत गेला, त्यांना राजवाड्यात सगळी रेलचेल आहे, कशाचीही कमतरता नाही हे काय पाहिल्यावर उमगलं नसेल ? सगळी तरतूद उलगडून सांगायला हवी काय ?

**योगिता :** दिवाणसाहेब, श्रीमंतांचा गैरसमज झालेला दिसतो. मुलगा राजवाड्यात राहायला जाणार म्हटल्याक्षणीच इथं केवढी रेलचेल आणि सेवाचाकरी त्याच्या दिमतीला असेल याची मला कल्पना पूर्णपणे होती. ती श्रीमंती पाहायला मी इथं मुळीच आले नव्हते.

**शाहूराव :** मग ताईसाहेब आपण काय पाहायला इथं आलात ?

**योगिता :** घर म्हणजे शोभिवन्त संगमरवरी इमारत नव्हे; गाद्या–गिरद्या, पडदे, गालिचे आणि फर्निचर नव्हे, पंचपक्वानं नव्हेत की नोकराचाकरांची सेवा नव्हे, गाडीघोडे–मोटारी नव्हेत की सोने, मोती, हिरे नव्हेत. हे असायला हरकत नाही. पण ही सगळी रेलचेल असूनही घरात घरपण असेलच असं नाही. घर म्हणजे माणसं. प्रेमळ, मायाममता करणारी माणसं.

**जिवाजी :** दिवाणसाहेब, बाईंना सांगा अशी माणसंसुद्धा या राजगृहात भरपूर आहेत. एकेक माणूस आम्ही पारखून निवडलेला आहे. आम्ही राजगृहात म्हणजे घरातच राहतो; ऐश आरामी हॉटेलमध्ये नव्हे.

**शाहूराव :** ताईसाहेब, वाड्यावरल्या माणसांच्याबद्दल तुमची काही तक्रार आहे का ?

**योगिता :** मुळीच नाही. माणसं सगळी चांगलीच आहेत. पण का कोण जाणे ती भयग्रस्त आहेत. कसल्या तरी धाकामुळं, कोणाच्यातरी भीतीपायी ती गारठली आहेत, गुदमरली आहेत. ती खळखळून हसत नाहीत की झडझडून मोकळ्या मनानं बोलत नाहीत. जणू चालतेबोलते पुतळे इथं वावरतात असं मला वाटलं.

**जिवाजी :** दिवाणसाहेब, बाईंना सांगा, त्यांचं निरीक्षण अगदी अचूक आहे. घरादाराला शिस्त लागायची म्हणजे कोणाचा तरी जबरदस्त धाक आणि भीती असायलाच हवी.

**योगिता :** दिवाणसाहेब, असल्या अघोरी धाकामुळं आणि भीतीच्यापायी राजकुमारांची काय अवस्था झाली ते मी श्रीमंतांना—

**जिवाजी :** ( कडाडत ) दिवाणसाहेब, बाईंना सांगा, त्या आपल्या पायरी सोडून

वाजवीपेक्षा जास्त बोलताहेत.

**योगिता :** दिवाणसाहेब, माझ्या मुलाच्या भवितव्याचा सवाल आहे म्हणून मला जे वाटतं ते मी बोलणारच.

**जिवाजी :** तसं असेल तर दिवाणसाहेब बाईंना आणि त्यांच्या मुलाला—

**शाहूराव :** ( किंचित जरबेनं ) सरकार, मामला बिघडतो आहे. अगदी विनाकारण. आपली परवानगी असेल तर आपल्या वतीनं बोलणं मी करतो.

**जिवाजी :** ( नरमाईनं ) ठीक आहे. दिवाणसाहेब तुम्ही बोला.

**शाहूराव :** ताईसाहेब, तुमच्या म्हणण्यात तथ्य आहे, हे मी मान्य करतो. पण घर चालवणं आणि राजप्रासादातला कारभार चालवणं यात फार मोठा फरक आहे. इथल्या नोकरचाकरांना जरा ढिले सोडले तर ते लोक डोक्यावर बसतील आणि एक कामसुद्धा धडपणे पार पाडणार नाहीत. इच्छा असो नसो, श्रीमंत सरकारांना आपला धाक ठेवणं भाग आहे. पण मुख्य मुद्दा निराळा आहे. छोटया सरकारांची आणि श्रीमंतांची जी आताच इथं छोटी आणि पहिली मुलाखत झाली ती तुम्ही पाहिली असतीत तर तुमच मत एकदम बदललं असतं.

**योगिता :** ( उत्सुकतेन ) काय काय घडलं या भेटीत ? काही विपरीत तर—

**शाहूराव :** छे छे तसं काहीसुद्धा नाही ताईसाहेब. उलट घोड्यावर रपेट मारायला जाताना छोटया सरकारांनी श्रीमंतांचा पापा घेतला आणि आपणहून ते म्हणाले... अगदी उत्स्फूर्तपणे म्हणाले की 'आजोबा तुम्ही मला आवडलात.'

**योगिता :** छान झालं. दिवाणसाहेब माझी एक काळजी मिटली. पोर बोलताना कोणाचीही भीडभाड ठेवत नाही, म्हणून मला जरा—

**जिवाजी :** त्याचाही अनुभव आम्ही घेतलाच. पण हा गुण आम्हाला आवडतो. आमच्या घराण्याच्या रक्ताचाच तो धर्म आहे.

**योगिता :** राजेरजवाड्यांनाच तो परवडण्यासारखा आहे.

**जिवाजी :** बाईंना सांगा दिवाणसाहेब, मुलाची हयात आता या राजमहालातच जायची आहे. पुन्हा काही तो गिरगावात जाणार नाहीये.

**योगिता :** त्याबद्दल मला अजून खात्री नाहीये; पण दिवाणसाहेब श्रीमंतांना सांगा की इथल्या शिस्तीच्या चौकटीत रतन बसेनासा झाला, तर माझ्या मुलाला मी केव्हाही परत न्यायला तयार आहे.

**शाहूराव :** तशी वेळ येणार नाही ताईसाहेब, याची मी हमी देतो.

**जिवाजी :** बाईसाहेबांच्या नेमणुकीबद्दल त्यांना सांगून टाका दिवाणसाहेब.

**शाहूराव :** होय सरकार. ताईसाहेब, तुम्ही मुंबईला चाळीत राहात होता, तेव्हा निर्वाहासाठी शिवणकामासारखा व्यवसाय करीत होता, हे ठीक आहे. पण शारंगधर

म्हणजे मुंबई नव्हे. या लहान गावात तुम्ही असला काही व्यवसाय आरंभलात, तर लोक श्रीमंतांना दूषण देतील. श्रीमंत सरकारांच्या प्रतिष्ठेच्या दृष्टीनं—

**योगिता :** श्रीमंतांच्या प्रतिष्ठेला एवढासुद्धा धक्का बसणार नाही याची मी हमी देते. या गावात मी व्यवसाय करणारच नाहीये. मी मुंबईहून मुलींच्या शाळांतून ऑर्डर्स घेऊन आले आहे आणि प्रत्यक्ष शिवणकाम मी घरात बसूनच करणार आहे. महिन्यातून एकदोन वेळा मला मुंबईला जाऊन यावं लागेल इतकंच.

**शाहूराव :** पण त्याची काही गरजच आहे का ताईसाहेब ?

**योगिता :** निश्चितपणे आहे आणि त्याबद्दल मला वाटाघाटीसुद्धा करायच्या नाहीत. त्याची कारणं तुम्हाला ठाऊक आहेत. मी माझ्या तोंडानं त्यांचा श्रीमंतांच्यापुढं पुन्हा उच्चार करायची गरज नाही.

[ क्षणार्ध तंग स्तब्धता. जिवाजी मल्हारराव न बोलता कराराच्या दोन्ही प्रतींवर स्वाक्षरी करतात आणि मग त्या दिवाणसाहेबांच्या हाती देत—]

**जिवाजी :** कराराच्या दोन्ही प्रतींवर बाईंच्या सह्या घ्या आणि एक प्रत त्यांना द्या. नीट वाचून सही करा म्हणून सांगा. बाईंच्याकडून कराराचा भंग झाला तर आम्ही प्रीव्ही कॉन्सिलपर्यंत दाद मागितल्यावाचून राहणार नाही, याची पक्की याद ठेवा म्हणून सांगा.

[ दरम्यान शाहूराव कराराच्या दोन्ही प्रती योगिताला देतात. ती त्यावरून झरझरा नजर फिरवते व सह्या करून प्रती परत शाहूरावांच्या हाती देता देता—]

**योगिता :** कराराचा श्रीमंतांच्याकडून भंग झाला तर मी कोर्टाची पायरी चढावी अशी अपेक्षा आहे का दिवाणसाहेब तुमची ?

**जिवाजी :** त्यांना सांगा आमची हरकत नाही.

**योगिता :** श्रीमंतांना सांगा, हरकत त्यांची नसली तरी माझी आहे.

**शाहूराव :** तशी वेळ येणार नाही ताईसाहेब. ताईसाहेब, ही कराराची तुमची प्रत. ( करारपत्र पुढे करतात )

**योगिता :** ( उठत ) ती तुमच्याच दप्तरात ठेवून द्या दिवाणसाहेब.

**जिवाजी :** याचा अर्थ काय दिवाणसाहेब ?

**शाहूराव :** ताईसाहेब, मला वाटतं—

**योगिता :** तुम्हाला त्यात काहीही गैर वाटायचं कारण नाही दिवाणसाहेब. मी जे करते आहे आणि बोलते आहे त्याचा अर्थ अगदी साधा, सरळ आणि स्पष्ट आहे. श्रीमंत सरकारांना वडील होऊन मुलांचं मन कधी जाणता आलं नाही; सासरे होऊन सुनेला एकदा सुद्धा पाहण्याची वा भेटण्याबोलण्याची कधी इच्छा झाली नाही; मग ते आपल्या नातवाशी कसे वागतील, याची शंका माझ्या मनात आली

तर त्यात काही नवल आहे का ? म्हणून मी इथं प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहून खात्री करून घेण्यासाठी आले. माझ्या सगळ्या शंका दूर झाल्या. आता करार करायचा तो केवळ श्रीमंतांच्या इच्छेसाठी. मला त्याची काडीमात्र जरुरी नाही. श्रीमंतांना सांगा, माझा कागदावर विश्वास नाही; माणसांच्यावर आहे. नमस्ते. येते मी.

[ पाठ वळवून योगिता ताडकन् निघून जाते. पाठ करून बसलेले जिवाजी मल्हारराव थक्क होऊन, अर्धवट ताडकन् उठून वळून ती गेलेल्या दिशेकडे आ वासून बघू लागतात. शाहूराव गालात स्मित करीत श्रीमंतांच्या मुद्रेवरील हा फेरबदल न्याहाळू लागतात आणि त्याच वेळी—पडदा. ]

**अंक पहिला संपला**

---

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. 29599 नों. दि. 26/8/66
वि. नाटक क्र. ..........

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

[ मागील अंकातील घडामोडीनंतर दीड दोन महिन्यांचा काळ उलटला आहे. नीलकमल राजप्रासादातील तोच महाल. वेळ सकाळी नऊ वाजण्याची. रंगमंच प्रकाशाने उजळल्यावर क्षणभरातच शाहूराव सामंताच्या आवाजात— "यावं यावं सुस्वागतम्, आक्कासाहेबमहाराज फार वर्षांनी या नीलकमल राजवाड्यात तुमचं पाऊल पडतंय आणि मला वाटतं बॅरिस्टर शासाहेबांचं तर पहिल्यांदाच आगमन होतंय शारंगधरला, होय ना शासाहेब ?" असे बोलतच शाहूराव येतात. पाठोपाठ बिचकत सभोवार पाहात आक्कासाहेब महाराज आणि त्यांचे पती बॅरिस्टर शासाहेब पटवर्धन महालात येतात. शासाहेब पन्नाशीचे तर आक्कासाहेब महाराज पंचेचाळिशीच्या. श्रीमंत सरकारांच्या आक्कासाहेब महाराज या ज्येष्ठ कन्या. तरुणपणी त्यांनी वडिलांचा विरोध मोडून, राजवाड्यातून पळून जाऊन बॅरिस्टर शासाहेब पटवर्धनांशी प्रेमविवाह केला होता. तेव्हापासून सरकारांनी त्यांचं नाव टाकलं ते टाकलंच. आज सुमारे बावीस वर्षांनी त्या घरी येत आहेत. तेही ज्यांच्यावर सरकारांचा भयंकर राग होता त्या आपल्या पतिराजांना बरोबर घेऊन. आक्कासाहेब महाराज देखण्या आहेत, बोलण्यात लाघवी, मृदू आणि अंमळ भाबड्या आहेत. त्यांची वेषभूषा पांढरपेशा गृहिणीसारखीच आहे. शासाहेबांचे केस शुभ्र झाले असले तरी मुद्रेवर वकिली खट्याळपणा आणि वृत्तीत रगेल आणि रंगेलपणा पुरेपूर भरला आहे. खोडकर आणि खोचदार बोलण्यात त्यांचा कोणी हात धरू शकणार नाही. "... बॅरिस्टर शासाहेबांचं तर पहिल्यांदाच आगमन होतंय शारंगधरला; होय ना शासाहेब ?" असं विचारत शाहूराव त्यांच्या समवेत प्रवेशतात. तशी— [

**शासाहेब :** होऽऽ तसं म्हणायला हरकत नाही. बायकोच्या पदराला बावीस वर्षांपूर्वी गाठ तर पक्की बसलीय. त्यामुळं आक्कासाहेब महाराजांच्या पावलावर पाऊल ठेवून इथं आलोय तर खरा. पण श्रीमंत सरकार जिवाजी मल्हारराव महाराज ऊर्फ सासरेबुवा कसं काय स्वागत करतील त्याच्या फिकिरीत आहे मी.

**आक्का :** होय का ? आणि वर ही मखलाशी वाटतं ? कोण कोणाच्या पावलावर पाऊल ठेवून इथं आलं ? तुम्ही का मी ? तरी बरंय मी कालपर्यंत ' नको नकोच ' म्हणत होते. श्रीमंतांचं आमंत्रण आल्यावर जावईबापू हुरळले आणि ' जायचंच ' म्हणाले तेव्हा मी तयार झाले. आता बरीक काही वेडंवाकडं घडलं तर माझ्यावर ठपका ठेवू द्यायची नाही मी.

**शासाहेब :** आक्कासाहेब महाराज, तुमचा नवरा मुंबई इलाख्यात भले नामांकित वकील असला तरी या शारंगधर संस्थानात त्याला काय किंमत आहे ? असलीच तर ती तुमचा नवरा म्हणून थोडीफार असेल. तेव्हा मी तुमच्यावर ठपका कसा ठेवीन ? काय हिंमत लागून गेलीय माझी ?

**शाहूराव :** आक्कासाहेब महाराज तुमच्या स्वागतात काही उणेपणा तर घडला नाही ? काही चुकलंमाकलं असेल तर मी आपली माफी—

**शासाहेब :** छे छे दिवाणसाहेब, तुम्ही आमच्या स्वागताचा थाट तर स्टेशनवर उतरल्यापासून मोठा बहारदार उठवून दिलात. श्रीमंत सकलसौभाग्यसंपन्न आक्कासाहेब महाराज तर एकदम खूष झाल्या आहेत याची मी तुम्हाला—

**आक्का :** काय हो... आल्या आल्या हा काय चावटपणा चालवला आहेत तुम्ही ? मला नेहमी ' सरोज ' म्हणून हाक मारता आणि एकाएकी डोस्कं फिरल्यागत तुम्हाला मी ' श्रीमंत सकलसौभाग्यसंपन्न आक्कासाहेब महाराज ' कधीपासून झाले ?

**शासाहेब :** आक्कासाहेब महाराज, खालसाची हद्द संपून आपली गाडी शारंगधर संस्थानच्या हद्दीत शिरली, त्या क्षणीच मला हा साक्षात्कार झाला.

**आक्का :** हा पांचटपणा पुरे झाला आता. बाबासाहेबांच्या समोर तरी जरा डोकं ताळ्यावर ठेवून वागा. काऽय ?

**शासाहेब :** होय सरकार.

**आक्का :** तुम्ही त्यांच्याकडं लक्ष देऊ नका शाहूराव. मला आधी सांगा, बाबासाहेब कुठं आहेत ? कसे आहेत ?

**शाहूराव :** अगदी उत्तम आहेत. आता त्यांचा पायसुद्धा खडखडीत बरा झालाय. युवराजांच्या संगे ते ग्राऊंडवर फुटबॉल खेळताहेत.

**शासाहेब :** ( मटकन् आसनावर बसत ) खेळताहेत ? श्रीमंत सरकार जिवाजी मल्हारराव महाराज या वयात फुटबॉल खेळताहेत ? युवराजांसंगे ? आक्कासाहेब

महाराज काहीतरी गफलत आहे.

**आक्का :** ( डोळे वटारीत ) असू दे! तुम्ही गप्प बसा. शाहूराव, युवराज म्हणजे जितेंद्रचा मुलगा सोनचाफाच ना?

**शाहूराव :** होय अक्कासाहेब महाराज. सध्या श्रीमंत सरकारांचं युवराजांच्याशिवाय पान हालत नाही. तुम्हाला सांगायला काही हरकत नाही पण युवराजांनी हट्ट धरला म्हणूनच श्रीमंतांनी आपल्याला यायचं निमंत्रण धाडलं. म्हणजे तसे श्रीमंत मनातून खंतावले होते, कष्टी झाले होते... तुमची वारंवार आठवण काढायचे... राणीसाहेब गेल्यापासून तर फारच. पण सुंभ जळलं तरी पीळ जात नाही, तशी स्थिती होती. युवराजांनी तो पीळही मोडून काढला. हाच नव्हे, इतर पुष्कळसे पीळ जायला लागलेत.

**शासाहेब :** हॅटस ऑफ टू दहावे हिंमत बहाद्दर.

**आक्का :** ( डोळे वटारीत ) कळलंऽ ! पुरेऽऽ ! आता आमची व्यवस्था कोणत्या गेस्ट हाऊसमधे केलीय तेवढं सांगितलं तर–

**शासाहेब :** त्या आधी सांगा दिवाणसाहेब, आम्ही स्टेट गेस्ट कोणत्या क्लासचे? फर्स्ट क्लास, सेकंड क्लास की—

**आक्का :** ( डोळे वटारीत ) तुम्ही काय स्वतःला चिमणराव समजलात?

**शाहूराव :** चिमणराव स्टेट गेस्टचा काळ संपला शासाहेब महाराज. तुमचा पाहुणचार कसा होईल ते तुम्ही पाहातच राहा. आक्कासाहेब महाराज तुमच्या आवडत्या चंद्रमहालातच उभयतांची सगळी व्यवस्था केलीय. तुमचं सामानही तिकडं गेलंय.

**शासाहेब :** चंद्रमहालात? म्हणजे कुठंशी?

**आक्का :** याच राजप्रासादात. पूर्वी जिथं तुम्ही मला चोरून भेटायला येत होतात त्याच महालात. कळलं?

**शासाहेब :** ( शिट्टी घालीत ) फॅंटास्टिक!

**आक्का :** आता तोंड मिटा. ही शिट्टी किंवा शीळ घालणं शोभत नाही तुम्हाला. शाहूराव, मग आपण इथं थांबलोत कशासाठी?

**शाहूराव :** श्रीमंत सरकार युवराजांच्यासंगे इतक्यात येतीलच. त्यांच्यासमवेत आपलं चहापान आटोपलं की आपण महालात जाऊन आराम करायला मोकळे आहात. ( घड्याळात पाहात ) सरकार पाच मिनिटांत येतील. महाराज आपण बसावं.

**शासाहेब :** ( उठत ) होय महाराज, आपण आधी बसावं.

**आक्का :** ही मी बसले. आता तुम्हीही बसा पण गप्प बसा. [ शासाहेब पुन्हा बसतात. ] शाहूराव, तुम्ही मला 'आक्कासाहेब महाराज' म्हणू नका हे मला जन्मभर छळतील. मी तुम्हाला मुलीसारखी. तुम्ही मला सरोजताई म्हणा किंवा आक्काताई

म्हणा. कृपा करून इथले चार दिवस माझे सुखासमाधानात जायचे असतील तर मला ‘ सरकार ’ किंवा ‘ महाराज ’ म्हणू नका.

**शाहूराव :** ठीक आहे आक्कातोई.

**शासाहेब :** श्रीमंत सरकार काय तुमची वाट लावतील त्याची तयारी ठेवा.

**शाहूराव :** श्रीमंत सरकारांच्याबद्दल आपला फार गैरसमज आहे शासाहेब.

**शासाहेब :** तरी सुद्धा मी त्यांना आक्कासाहेब महाराजच म्हणणार.

**आक्का :** म्हणा म्हणा.... आक्कासाहेब महाराजच म्हणा. चुकून जरी कधी मला ‘ सरोज ’ म्हणून हाक मारलीत तर—

**शासाहेब :** शंभर सूर्यनमस्कार घालायला लावाल ?

**आक्का :** बाबासाहेबांना तसलं फ्यॅड नाहीये. तुम्ही ‘ सरोज म्हणून हाक मारलीत तर तर मी ‘ ओ ’ सुद्धा देणार नाही, याद राखा.

**शासाहेब :** बघा बघा दिवाणसाहेब– ही नवऱ्याला ‘ याद राखा ’ म्हणून धमकी देतेय. हा संस्थानी वातावरणाचा परिणाम, बरं का ! म्हणजे काय गंमत आहे–
[ तेवढ्यात टायगरच्या भुंकण्याचा आवाज ऐकू येतो. तशी– ]

**शाहूराव :** आक्काताई, श्रीमंत सरकार येताहेत ( लगबगीने जातात )

**शासाहेब :** श्रीमंत सरकारांना मुजरा कसा करायचा म्हणून मला शिकवलंत आक्का-साहेब महाराज ?

**आक्का :** मी तुम्हाला काही एक शिकवलं नाही. तुम्ही काहीही शिकण्यापलीकडं पोच-लेले आहात.

**शासाहेब :** शिकवलं नसेल पण सांगितलं तर होतंत ?

**आक्का :** तुम्हाला येईल तसा मुजरा करा. नमस्कार केलात तरी चालेल. पण कृपा करा आणि तोंड आवरा. मला अडचणीत टाकू नका. सरळ साधं बोला. गप्प बसलात तरी चालेल.

**शासाहेब :** शिकस्तीचा प्रयत्न करून बघतो. म्हणजे काय आहे, प्रश्न तोंडाचा आहे. फार वेळ मिटून धरलं तर आतली वाफ फटकन तोंड फोडून केव्हातरी बाहेर पडायची. पण तुम्हाला एक गोष्ट करता येण्यासारखी आहे आक्कामहाराज.

**आक्का :** काय करू म्हणता ?

**शासाहेब :** जरा जीभ सैल सुटलीसं वाटलं तर हळूच चिमटा काढा मला.

**आक्का :** बाबासाहेबांच्या समोर ? ते माझा कान उपटून हातात देतील माझ्या, ठाऊक आहे ? त्यांची नजर तीक्ष्ण आहे.

**शासाहेब :** तर मग बोलण्यातला माझा ताळतंत्र अमळ सुटतोय असं वाटलं रे वाटलं की तुम्ही फक्त एवढंच म्हणा– “ काय हो डॉ. गुपचुप भेटले होते का

तुम्हाला ? " किंवा " डॉ. गुपचुपना एकदा प्रकृती दाखवायला हवी तुमची." असं काहीतरी तुम्ही म्हणालात की मी एकदम खाडकन गुपचूप.

[ तेवढ्यात सोनचाफा ऊर्फ रतन धावत येतो. अंगात पांढरा जर्कीन, पांढरी हाफ पॅंट, पांढरे बूट, पायमोजे असा खेळाडूचा वेश. आल्या आल्या रतन थाटात उभयतांना मुजरा करीत –

" मी रतन... मुजरा आक्का आत्त्यामहाराज... मुजरा शासाहेब काकामहाराज म्हणतो. तशी, त्याला आक्कासाहेब प्रेमानं जवळ घेतात आणि – ]

**आक्का :** अग्गोबाईऽऽ ! जितेंद्राचा मुलगा तो तूच का ?

**रतन :** होय आक्का आत्त्यामहाराज.

**आक्का :** ऊं हुं. मला नुसतं ' अक्का आत्त्या ' म्हणायचं आणि यांना ' काका '.

**शासाहेब :** हा... हं... हा रतन... सोनचाफा कोण ?

**रतन :** ते नाव मला आजोबांनी दिलंय. दरबारात पुकारण्यासाठी आणि छापण्यासाठी एरवी ते मला बाळराजेच म्हणतात. माझी आई मला रतन म्हणते. तुम्ही मल रतनच म्हणा.

**शासाहेब :** छे छे असं कुठं झालंय ? आम्हीसुद्धा तुला, आय मीन तुम्हाला, बाळराजेच म्हणणार. श्रीमंत सरकारांची तेवढ्यासाठी मर्जी खप्पा व्हायला नको.

**आक्का :** ( त्याला पाहात ) गोड आहे... तेजस्वी आहे... अगदी थेट जितेन्द्रासारखा दिसतो नाही हा मुलगा ?

**शासाहेब :** श्रीमंत सरकारांचं याबद्दल मत काय आहे ते पाहावं लागेल. असं ऐकतो की श्रीमंतांचा आपल्या दोन्ही पुत्रांवर—

**आक्का :** ( दटावीत ) पुरे. बेटा, तुझी आई कुठाय ? आमच्या स्वागतासाठी महाद्वारात प्रथम ती पुढं येईलसं वाटलं होतं आम्हाला.

**रतन :** पण माझी आई मुळी इथं राहातच नाही, तर ती कशी येणार तुमचं स्वागत करायला ?

**आक्का :** इथं राहात नाही ? म्हणजे ? मग ती कुठं राहते ?

**रतन :** पाहायचं आहे का आक्काआत्त्या तुम्हाला ? ( खिडकीपाशी जात ) इकडं या. [ अक्कासाहेब आणि शासाहेब जवळ जातात तशी खिडकीतून बोटानं दाखवीत ] ती नारळीची झाडं दिसताहेत ना... त्याच्या खाली एक पर्णकुटी उभी आहे.... दिसली का ?

**आक्का :** ती तीऽऽ... लाल मंगलोरी कौलांचं छप्पर असलेली ? [ रतन मानेनं हो म्हणतो, तशी –] पण तुझी आई तिथं का म्हणून ?

**रतन :** तिला या राजवाड्यात राहायचं नाहीये म्हणून.

**आक्का :** का ? बाबासाहेब तिला नको म्हणाले ?

**रतन :** छे छे. ते कसे नको म्हणतील ? त्यांना उलट वाईट वाटलं आई वेगळी राहणार म्हणून. थोडासा ग्रुस्सा देखील झालाय त्यांचा तिच्यावर. पण माझ्या आईचं असं आहे; एकदा तिनं ठरवलं की ठरलं.

**आक्का :** पण तिनं असं कशासाठी ठरवलं ?

**रतन :** ( नक्कल करीत ) " ते तू मला कधीही विचारता कामा नयेस. मी तुला सांगणार नाही. तू मोठा झालास आणि इथं राहून सुद्धा शहाणा झालास, तर तुझं तुलाच ते कळेल ! "— असं ती म्हणाली मला.

**शासाहेब :** आय हाय हाय ! बाळराजांच्या मासाहेब तर सवाई चीफसाहेब दिसतात. [ तेवढ्यात हे ऐकत, खाकरत, जिवाजी मल्हारराव आणि पाठोपाठ शाहूराव येतात. तशी लगबगीनं आक्कासाहेब उचंबळून " बाबासाहेब...बाबाऽऽ..." अशी भावनोत्कट हाक मारतात. धावत जाऊन त्यांच्या पायाला हात लावून धूळ मस्तकी लावतात. शासाहेब प्रथम 'नमस्ते महाराज' म्हणत नमस्कार करतात आणि लागलीच 'माफ करा... चुकलो... मुजरा सरकार' म्हणत गडबडीनं कुर्निसात करतात. श्रीमंत सरकार गलबलून भारावून जात – "कशी... कशी आहेस गं मुली ?" असं मायेनं पुसत आक्कासाहेबांचे खांदे धरून त्यांना उठवतात. नजरेला नजर मिळताच आक्कासाहेबांच्या गालांवरून घळघळा अश्रू ओघळू लागतात, तसे श्रीमंतांचे डोळेही पाणावतात... भरून येतात. तिला एकदम पोटाशी घेत—]

**जिवाजी :** हे काय ?...हे काय बरं आक्का ?

**आक्का :** ( हुंदका दाबीत ) बाबा, तुम्ही माझ्यावर रागावलात....फार फार रागावलात. विनाकारण रागावलात.

**जिवाजी :** ( तिचं मस्तक थोपटत ) विनाकारण नाही आक्का...राग सकारण होता. पण तुला तोडून टाकावं इतकं काही ते कारण मोठं नव्हतं. पण हे आता कळतं. त्या काळी मस्तकातला संताप कसा आवरावा हे आम्हाला कोणी शिकवलं नाही.

**आक्का :** आई गेल्यानंतरसुद्धा मला बोलावून घ्यावं, असं कधी वाटलं नाही तुम्हाला ?

**जिवाजी :** वाटलं. खूप खूप वेळा वाटलं. पण आमचा हट्टीपणा, जिद्द आणि अभिमान प्रत्येक वेळी आडवा आला. माघार कशी घ्यायची हे कळत नव्हतं.

**आक्का :** मग आत्ताच तो चमत्कार कसा घडला बाबा ?

**जिवाजी :** आत्याला बोलवा म्हणून आमच्या बाळराजांनी हट्ट धरला. आमचे सगळे व्यवहार अलीकडे बाळराजेच पाहतात. त्यांना नाही कोण म्हणणार ?

**आक्का :** जितूचा मुलगा फार लाघवी आणि हुशार आहे बाबा.

**जिवाजी :** त्यामुळंच आमची अडचण झालीय. त्याचे सगळे लाड पुरवावे लागतात

आणि रागावता मात्र येत नाही.

**रतन :** हे खरं नाहीये आजोबा तुम्ही बोलून दाखवीत नसला तरी खूप वेळा तुम्हाला माझा राग येतो.

**जिवाजी :** कशावरून ?

**रतन :** तुम्हाला राग आला की मला बरोब्बर कळतं. तुम्ही ओठ घट्ट दाबून धरता आणि मान अशी तिरकी वर करून आकाशाकडं पाहात राहता. खरंय की नाही दिवाणसाहेब ?

**जिवाजी :** बघ बघ कसा लबाड आहे मूल. आपल्याबरोबर दिवाणसाहेबांनाही गुंतवून टाकतोय. काय शाहूराव ?

**शाहूराव :** तरीसुद्धा श्रीमंत, हे सगळं निरीक्षण छोट्या सरकारांचंच आहे. माझा त्यात काही म्हटल्या काही हातभार नाहीये.

**जिवाजी :** ( हसू दाबीत ) असो, असो, असो ! बाळराजे, आज मात्र आम्ही तुमच्यावर खरोखरीच रागावणार आहोत आणि सगळा राग बोलून दाखवणार आहोत.

**रतन :** कशाबद्दल आजोबा ?

**जिवाजी :** त्याचा विचार नंतर करू. आक्का बेटी झालं गेलं ते आम्ही सगळं विसरलो आहोत. तुम्ही विसरून जा. पण बेटी इतक्या लवकर तुझे केससुद्धा पिकायला लागले, तोंडावर सुरकुत्या उठायला लागल्या... सासरी काही हालकष्टात तर नाहीस ना ?

**शासाहेब :** ( सावरून ) महाराज साहेब, मला वाटतं या आपल्या सवालाचं उत्तर मी देणं योग्य होईल.

**जिवाजी :** जावईबापू तुमच्याकडं आम्ही वळतोच आहोत. पण सवाल ज्यांना पुसला त्यांनीच त्याचं उत्तर द्यावं अशी इथं रीत आहे.

**शासाहेब :** ब्रिटिश हिंदुस्थानातही तशीच रीत आहे सरकार, पण ती कोर्टात, घरी नव्हे.

**आक्का :** बाबासाहेब, संसारात मी अगदी सुखी आनंदी आहे. त्यांनी आजवर मला अगदी फुलात ठेवलीय. पण मी सुद्धा आता पंचेचाळीस वर्षांची झाले. वयोमान कधीतरी दिसायला लागणारच की.

**शासाहेब :** सरकार, मी श्रीमंत आक्कासाहेब महाराजांना फुलाबिलात काही ठेवली नाही. पण—

**आक्का :** हे बघा, मी खरं सांगते की नाही ते डॉक्टर गुपचुपांना विचारा.

**शासाहेब :** ठीक आहे सरकार. गुपचुप म्हणतील ते प्रमाण आहे.

**जिवाजी :** डॉक्टर गुपचुप कोण ?

**शासाहेब :** आहेत आमचे एक शेजारी आणि फॅमिली डॉक्टर.

**जिवाजी :** बॅरिस्टर साहेब, तुमची प्रकृती कशी आहे ? बाकी विचारायचं कशाला ? भली भक्कम आणि ठणठणीत तर दिसतेच आहे. कामधंदा कसा काय चाललाय ? बाकी तेही विचारायची गरज नाही. दिवसेंदिवस गुन्ह्यांचं प्रमाण वाढतंय; माणसंही नेकीची राहिली नाहीत; तेव्हाऽऽऽ वकील मंडळींची चंगळ असणार हे उघडच आहे. पण काही समाजकारण, राजकारण वगैरे वगैरे करता की नाही ?

**आक्का :** मधून मधून जमेल, झेपेल तेवढं करतात हे.

**जिवाजी :** सवाल बॅरिस्टरसाहेबांना विचारलाय मी आक्कासाहेब.

**शासाहेब :** समाजकारण म्हणाल, तर मिश्रविवाह करूनच मी केवळ बोलघेवडा सुधारक नाहीये हे सिद्ध केलंच आहे. आता सेवानिवृत्तीनंतर संस्थानी प्रजेला —

**आक्का :** डॉ. गुपचुपनी परवानगी दिली तर ना !

**शासाहेब :** हो हो, त्यांना विचारूनच पुढली पावलं टाकणार आहे.

**जिवाजी :** पण म्हणजे काय करायचं ठरवलंय तुम्ही ?

**शासाहेब :** आक्कासाहेब, महाराज, मी काय करायचं ठरवलंय हो ?

**आक्कासाहेब :** काही विशेष नाही बाबासाहेब, संस्थानातल्या प्रजाजनांना कायदेविषयक मोफत सल्ला द्यायचं ठरवलंय यांनी.

**जिवाजी :** उत्तम. अगदी लाख मोलाचा निर्णय घेतला आहेत तुम्ही बॅरिस्टर साहेब. तुमचं लग्न होऊन इतकी वर्षं झाली तरी तुम्ही आमच्या कन्येला ‘ आक्कासाहेब महाराज ’ असं संबोधिता, हे बघून आम्ही संतुष्ट झालो आहोत. ( तीनदा टाळी वाजवीत ) शाहूराव.

**शाहूराव :** चहा तयार आहे सरकार.

[ तेवढ्यात सटवाजी एक ट्रॉली, त्यावर चहाची सर्व सिद्धता, घेऊन प्रवेशतो. ]

**रतन :** आजोबा, मी कपडे बदलून येऊ ? तुमच्या पायाचा मसाज व्हायचाय अजून.

**जिवाजी :** हूं. जा, पण लवकर या बाळराजे. आपल्याला पुष्कळ बोलायचंय आज.

[ रतन जातो. दरम्यान सटवाजीच्या मदतीनं आक्कासाहेब चहा तयार करतात. त्या स्वतः एक कप श्रीमंतांच्या हाती देतात. दरम्यान उरलेले कप सटवाजी बाकीच्यांना देतो. स्तब्धपणे चहापान चालू असतानाच — ]

**आक्का :** बाबासाहेब, बाळराजांच्या मा इथंच राहतात असं कळलं.

**जिवाजी :** इथं म्हणजे या नीलकमल राजप्रासादात नाही. राजवाड्याच्या परिसरात एका स्वतंत्र पर्णकुटीत त्यांची राहण्याची व्यवस्था केलीय त्यांच्या इच्छेप्रमाणं.

**आक्का :** तेही समजलं मला. पण तिथं तर राजवाड्यातले सगळे सेवक आणि आंबराई-

तले शेतकरी राहतात. म...मला वाटतं.... बाळराजांच्या मासाहेबांची यापेक्षा अधिक चांगली व्यवस्था व्हायला हवी होती.

**जिवाजी :** मुंबईत गिरगावातल्या एका चाळीतल्या खोलीत राहात होती ती इथं येण्यापूर्वी. त्या मानानं पर्णकुटी खूपच ऐसपैस आणि चांगली आहे.

**आक्का :** पण बाबासाहेब —

**जिवाजी :** शिवाय त्या बाईंनी दरबारचा तनखा नाकारला आहे, तेव्हा त्यांच्या तुटपुंज्या मिळकतीला परवडेल अशीच भाडयाची जागा—

**आक्का :** तनखा नाकारला ? ते काय म्हणून ? मग त्यांचा निर्वाह चालतो कसा ?

**जिवाजी :** त्या मामुली तपशिलात आम्ही लक्ष घालीत नाही.

**आक्का :** बाबासाहेब, उद्यापरवा आम्ही त्यांना भेटायचं म्हणतो आहोत.

**जिवाजी :** तो तुमच्या उभयतांच्या मर्जीचा प्रश्न आहे. पण भेटायचं तर पर्णकुटी-पर्यंत तुम्हाला जायला हवं. ती इथं येणार नाही.

**शासाहेब :** त्या इथं येणार नाहीत की त्या इथं आलेल्या श्रीमंत सरकारांना चाल-णार नाही ?

**आक्का :** त्याच्याशी आपल्याला काय कर्तव्य आहे ? आपण त्यांना भेटायला त्यांच्या घरी जाऊ म्हणजे झालं.

**जिवाजी :** तर मग आता तुम्ही उभयता तुमच्या महालात आराम करा. प्रवासात तुम्ही थकून भागून आला असाल.

**शाहूराव :** सटवाजी, [ सटवाजी येतो ] खाशा स्वाऱ्यांना त्यांच्या महालात घेऊन जा आणि त्यांच्या तैनातीला—

**सटवाजी :** रुद्राजीला आणि शेवंताबाईंना ठेवलंय सरकार.

**शासाहेब :** बराय... मुजरा सरकार. (मुजरा करतात)

**जिवाजी :** बॅरिस्टरसाहेब, मघा आम्ही येत होतो, तेव्हा तुमच्या तोंडी 'चीफसाहेब' असा आमचा उल्लेख ऐकला. पुन्हा अशी गलती करू नका. दहा वर्षांपूर्वी राज्या-रोहणासमयी सम्राट पाचव्या जॉर्ज बादशहांनी आम्हाला 'राजा ऑफ शारंगधर' ही पदवी बहाल केलीय.

**शासाहेब :** उशिरा का होईना, पण ब्रिटिश सरकारच्या संस्थानी खात्याच्या एका मामुली चिटणिसानं चुकीची दुरुस्ती केली याचा आम्हाला आनंद वाटतो. लॉंग लीव्ह राजासाहेब ऑफ शारंगधर ! [ आक्कासाहेब त्यांना हाताला धरून घेऊन जातात "यावं यावं सरकार, असं इकडून यावं" म्हणत सटवाजी आधीच पुढे गेला आहे. शाहूराव हातात फाईल घेऊन उभे आहेत. पाठीवर हात घेऊन जिवाजी मल्हारराव येरझारा घालतात. मुद्रा सचिंत आणि किंचित संतप्त देखील.

क्षणभराने —]

**शाहूराव :** सरकार आजचं टपाल आपण पाहणार ?

**जिवाजी :** आम्ही जातीनं पाहण्यासारखं काही नवलविशेष आहे का ?

**शाहूराव :** एजंट टु द गव्हर्नर जनरलच्या ऑफिसकडून पुन्हा खलिता आला आहे. बाळराजांच्या संदर्भात.

**जिवाजी :** ( थबकून ) आम्ही केलेला खुलासा ए. जी. जी. ला पटला नाही म्हणता ? ( शाहूराव थबकलेले पाहून) एवढी हिंदुस्थानभर चळवळ चाललीय. गांधी-नेहरू-पटेलसारखे मातब्बर पुढारी तुरुंगात गेले तरी सरकारला चळवळे आवरत नाहीत. आमच्या संस्थानात एकही स्टेशन जळालं नाही की एकाही पोस्ट ऑफिसला आग लागली नाही. कुठं चार दोन सभा झाल्या. काही स्थानिक पोरंसोरं बोलली. एखादा दुसरा मोर्चा निघाला, एवढ्यावरून संस्थानात अशांतता माजलीय आणि तीसुद्धा बाळराजांसारख्या एका नऊ दहा वर्षांच्या मुलानं शाळेत केलेल्या एका भाषणा-मुळं या म्हणण्यावर सरकारचा तरी विश्वास बसतोय का ?

**शाहूराव :** ते खरं आहे श्रीमंत. पण बाळराजांच्या मागं त्याच्या वडिलांचा काही इतिहास आहे... काही संशयास्पद घटना घडल्या आहेत.

**जिवाजी :** ( आवेशानं ) खोटं आहे...साफ खोटं आहे. सरकारला आणि लष्करी अधिकाऱ्यांना जितेंद्रच्या संबंधात काहीही सिद्ध करता आलेलं नाहीये.

**शाहूराव :** मान्य आहे. पण म्हणूनच बाळराजांच्या संबंधात आपण अधिक जागरूक राहायला हवं. शाळेतल्या मुलांत बाळराजे फार लोकप्रिय झालेत. त्यात तसं काही वावगं नाही. पण लोकप्रियता म्हटली की जरा जादाच मिसळण होते. साध्या बोलण्यातही धोरण राहात नाही. वरपर्यंत त्याचे रिपोर्टस जातात.

**जिवाजी :** बाळराजांची शाळा बंद करून टाकावी आणि राजवाड्यावरच त्यांच्या एकट्यासाठी नामवंत शिक्षकांना शिकवायला बोलवावं—

**शाहूराव :** छे छे सरकार, असं काही सुचवण्याचा माझा मुळीच इरादा नाही. मुलाचं शिक्षण मुलांत मिळूनमिसळूनच व्हायला हवं. तरी पण आपण छोट्या सरकारना थोऽडी समज द्यायला हवी.

**जिवाजी :** ' थोऽडी ' नाही. पुष्कळच समज द्यायला हवी.

**शाहूराव :** तसं म्हणत नाही मी. पण राजघराण्यातल्या वातावरणाला ते नवे आहेत. पुष्कळ गोष्टी त्यांना आत्मसात करायच्या आहेत. पुष्कळ जुन्या सवयी, रीतीभाती सोडायच्या आहेत.

**जिवाजी :** हूंऽऽ. ते लक्षात आलंय आमच्या. इथं आल्यापासून त्याचे फार लाड झालेत. आज बऱ्याच गोष्टींबद्दल सुनावणार आहोत आम्ही बाळराजांना. आजवर

आमचं एकच प्रेमळ रूप पाहिलंय त्यांनी... जे रूप आमच्या पोटच्या मुलांना कधीच दिसलं नाही. आता आमचा दुसरा रुद्रावतार बाळराजांना दाखवायलाच हवा... जो आमच्या मुलांनी जन्मभर चळचळा कापत पाहिला.

**शाहूराव :** परवा ताईसाहेबांनीसुद्धा मला एकदा इशारा दिलाय.

**जिवाजी :** काय म्हणून ?

**शाहूराव :** मुलाचे लाड जरा जास्तच होताहेत.

**जिवाजी :** त्या मूर्ख, मस्तवाल, भिकारड्या चाळकरी जगदंबेबद्दल तुम्ही आम्हाला काही एक सांगू नका दिवाणसाहेब. तिला कवडीची अक्कल नाही की काडीचं शहाणपण नाही. ही, हीच महामाया म्हणाली होती नाही का, वाड्यावरले सगळे सेवक भीतीनं गुदमरलेत म्हणून ? आणि आता तीच—

**शाहूराव :** तसं नाही श्रीमंत—

**जिवाजी :** ( जरबेनं ) दिवाणसाहेब, तुम्ही आमच्यासमोर तिची बाजू घेत जाऊ नका.

**शाहूराव :** ठीक आहे. राहिलं सरकार. विसरून जा.

**जिवाजी :** ( प्रक्षोभान येरझारा घालीत ) या गोऱ्या साहेबांची मिजास फक्त आम्हा संस्थानिकांच्यासमोर. कॅाँग्रेसवाल्यापुढे यांच्या शेपट्या एकदम खाली. काहीही उत्तर घालू नका. हा ए. जी. जी. काय करतोय ते आम्हालाही पाहायचं आहे. आणिक काही ?

**शाहूराव :** आणिक म्हणजे मिस मंजुळा नावाच्या एका बाईचं पत्र आहे.

**जिवाजी :** (थबकून ) पुन्हा रणजितचं आणखी एक प्रकरण ?

**शाहूराव :** असं दिसतंय खरं. या मंजुळाबाई सिनेमात काम करतात. त्यांना एक मुलगा आहे. आणि तो राजपुत्र रणजित यांच्यापासून—

**जिवाजी :** ते पत्र आधी फाडून टाका. या पोरानं जिवंतपणी व्यसनं केली, सिनेमात पैसे उधळले आणि आम्हाला त्रास दिला. आता मेल्यावरसुद्धा त्याच्या भानगडी आम्हीच निस्तरायच्या काय ?

**शाहूराव :** या बाईचं म्हणणं आहे की —

**जिवाजी :** तिचं काहीही म्हणणं आम्हाला ऐकायचं नाही. पत्र फाडून टाका आणि तिला उत्तर घालू नका.

[ तेवढ्यात सुरवार आणि सिल्कचा झब्बा घालून रतन येतो. हातात तेलाची तामली. आल्या आल्या थबकत—]

**रतन :** हे हो काय आजोबा. फूटबॉलसारखा खेळ खेळून तुम्ही एवढे दमला होतात तरी पुन्हा येरझारा घालताय ? पाय बरा झाला असला म्हणून त्याला किती राबवणार आहात ? आधी बसा पाहू. ( हातानं ओढत ढकलत नेऊन बसवतो. मग

गुडघे टेकून बसत श्रीमंतांच्या पायातले तो बूट–पायमोजे काढतो. हे करीत असताना—) आजोबा, आमच्या अप्पूला आपला हा राजवाडा पाहायचाय.

**जिवाजी :** आम्ही वाड्यावर नसताना त्याला वाडा दाखवायला सटवाजीला सांगा.

**रतन :** नाही नाही. त्याला नुसता वाडाच नाही. तुम्हालाही पाहायचंय आणि भेटायचंय.

**जिवाजी :** ते कठीण दिसतं.

**रतन :** नाही नाही, कठीण नाही आजोबा. त्याचा नाष्टा झाला की मी त्याला घेऊन येईन तुम्ही फक्त त्याच्याशी दोन शब्द बोला म्हणजे झालं.

**जिवाजी :** त्याचा नाष्टा झाल्यावर तुम्ही त्याला आणायला स्वतः जातीनं आऊट-हाऊसमध्ये जाणार आहात ?

**रतन :** छे छे, नाष्टा झाल्यावर नाही. त्याच्यासंगे नाष्टा करायलाच मी जाणार आहे. आणि आऊटहाऊसमध्ये नाही. अगंच्या घरीच उतरलाय अप्पू आणि सुभानमामा.

**जिवाजी :** (संतापाश्चर्यानं) काऽय ? तुझ्या आईच्या घरी राहिलेत ते ? दिवाणसाहेब, याचा अर्थ काय ?

**शाहूराव :** ताईसाहेब म्हणाल्या की ही आमची घरोब्याची माणसं आहेत; ती इथं माझ्या घरीच राहतील.

**जिवाजी :** राजवाड्याच्या परिसरात कोणी कुठं राहायचं त्याबद्दल आम्ही हुकूम फर्मावितो. खरंय ना दिवाणसाहेब ?

**शाहूराव :** होय सरकार खरं आहे.

**जिवाजी :** ( संतापानं ) मग आमचा हुकूम कोणी फिरवला ? कोणी धाडस केलं हे ?

**रतन :** ( तामलीतलं तेल हातावर घेत ) मी आजोबा.

**जिवाजी :** (रागानं पाय मागं घेत) बाळराजे, आम्हाला तुमचा संताप आलाय. तुम्ही आमच्या पायाला मसाज करू नका.

**रतन :** असं चालणार नाही आजोबा. ज्याचा राग त्याच्यावर काढावा. पायावर काय म्हणून ? ( पाय ओढत ) मी पायाला मसाज करतो आणि तुमच्या रागावण्यालाही तोंड देतो. ( मसाज करू लागतो. )

**जिवाजी :** तुमचं तोंडसुद्धा बघू नये इतका महाभयंकर राग आलाय आम्हाला या घडीला तुमचा.

**रतन :** हात्तिच्या ! तर मग आजोबा, मी ही अशी मान खाली घालून तुमच्या पायाला मसाज करीत बसतो. मग काही तुम्हाला माझं तोंड दिसायचं नाही. दिसेल फक्त डोकं नि केस. चालेल ना ? ( तसे करीत मसाज करू लागत ) हूंऽ ! बोला आता ! ( वाट पाहून ) बोला नाऽ ? [ जिवाजी मल्हारराव धुसफुसत मान तिरकी वर करून

पाहात ओठ दातांनी घट्ट आवळून धरतात. ते पाहून—] झाऽऽलंऽ! रागावले आजोबा. आता ते कसचे बोलणार? दिवाणसाहेब, तुम्ही आजोबांचं मन जाणता. त्यांच्या वतीनं तुम्ही बोला. अंमळ रागावून बोललात तरी चालेल. मी काही उलट उत्तर करणार नाही. फक्त मुद्द्याचं तेवढंच सांगेन. बोलाऽ! बोला ना!

**जिवाजी :** (कडाडत) आमच्या तोंडाकडं बघताय काय दिवाणसाहेब. बोलाऽऽ चांगल्या झणझणीत शब्दांत कानपिचक्या द्या या मुलाला तुम्ही. मुळीच गय करू नका त्याची की पत्राजही बाळगू नका कोणाची.

**शाहूराव :** म्हणजे (खाकरत, खोकत) म्हणणे त्याचं असं आहे छोटे सरकार... म्हणजे मला असं म्हणायचं होतं...

**जिवाजी :** (कडाडत मूठ आपटीत) हा अप्पू असा कोण लागून गेलाय? एक यःकश्चित मुंबईच्या टपरीतला पानवाला. हा सुभानमामा कोण कुठला उपटलाय? बोलून चालून सैन्यातला एक हवालदार. असल्या हलक्या, क्षुद्र, दरिद्री आणि अडाणी इसमांशी बाळराजांची घनिष्ठ मैत्री? शोभत नाही हे उद्याच्या हिंमत बहाद्दरांना. राजप्रासादात आम्ही हे खपवून घेणार नाही म्हणून बजावून सांगा दिवाणसाहेब त्यांना आता.

**रतन :** (मसाज करता करता वर न पाहता, थंडपणे) आजोबा, अप्पू आणि सुभानमामा ही माणसं गरीब आहेत हे खरं आहे. पण तरीसुद्धा ती फार प्रेमळ, चांगली आणि नेहमी मदतीला धावून येणारी माणसं आहेत. पपा गेल्यावर, अगला आणि मला त्यांचीच मदत झाली. आता मी राजवाड्यात आलो म्हणून त्यांना तुच्छ लेखून त्यांच्याकडं पाठ फिरवायची का? तुम्ही मला कृष्णाच्या नि कौरव-पांडवांच्या गोष्टी रोज सांगता. श्रीकृष्णानं सुदाम्याला हाकलून दिलं असतं तर ते तुम्हाला आवडलं असतं का आजोबा?

**जिवाजी :** घ्याऽऽ! ऐका दिवाणसाहेब! हे राजेश्री तर आता आमचेच दात आमच्य घशात घालायला लागलेत.

**शाहूराव :** छोटे सरकार, तुमच्या विरुद्ध अशी तक्रार आलीय की शाळेतसुद्धा तुम्ही दरबारातल्या मानकऱ्यांच्या मुलांपेक्षा सामान्य पेशाच्या गरीबगुरीब घरांतल्या मुलांच्यातच जास्त मिसळता.

**जिवाजी :** शेवटी पाणी, आपली पातळी सोडून वर किती जाणार शाहूराव? शेवटी माणूस काय लायकीचा आहे, ते त्याच्या सवंगड्यांवरूनच कळून येतं. इंग्लिशमधे म्हणीच आहेत तशा.

**रतन :** इतिहासाचे आमचे सर सांगत होते की शिवाजी राजे जहागीरदारपुत्र असूनही मावळे वगैरे हलक्या जातीच्या मुलांच्यातच रमतात', अशी त्यांच्या

बालपणी विजापूरच्या दरबारात पहिली तक्रार दाखल झाली होती. मग ? शिवाजीराजांची लायकी आणि पातळी या म्हणीवरूनच ठरवायची का ?

**शाहूराव** : तसं नव्हे छोटे सरकार— पण—

**रतन** : दरबारातल्या मानकऱ्यांच्या मुलाशी मी वाईट तर वागत नाही ? आमच्या वर्गात पाटीलसाहेब, चव्हाणसाहेब, देशपांडेसाहेब, देसाईसाहेब यांची मुलं आहेत. ती कशी आहेत नि काय काय करतात हे तुम्हाला ठाऊक आहे ?

**शाहूराव** : कशी वागतात ? काय करतात ?

**रतन** : मी त्यांच्याबद्दल चहाड्या सांगणार नाही. अगं मला ठोकून काढील. तुम्हीच जाऊन चौकशी करा. मी त्यांच्या बाकावरसुद्धा बसत नाही.

**जिवाजी** : का ? बाकावर बसायला काय हरकत आहे एकत्र ?

**रतन** : मग आमचे सरच मला म्हणतील, 'मॅन इज नोन बाय द कंपनी ही कीप्स' आणि 'वॉटर फाईंड्स इट्स ओन लेव्हल.'

**शाहूराव** : यावरून आठवलं छोटे सरकार, आपण इथल्या शाळेत जायला सुरुवात केलीत, त्या वेळी वर्गातली बाकं जुनी, मोडकी आहेत म्हणून खाजगी कारभाऱ्यांनी तुमच्यासाठी एक सुंदर गादीचं अलिशान डेस्क वर्गात ठेवायला पाठवलं होतं श्रीमतांच्या आज्ञेवरून. ते डेस्क तुम्ही परत न्यायला सांगितलंत.

**रतन** : डेस्क परत न्यायला मी नाही सांगितलं दिवाणसाहेब; उलट आमच्या वर्गातील सगळीच डगमगणारी मोडकी बाकं परत न्या आणि ही असली सुंदर छानदार डेस्क्स पाठवा, असा निरोप मी खाजगी कारभाऱ्यांना धाडला होता.

**शाहूराव** : एका छोट्या शाळेला ते कसं परवडण्यासारखं आहे बाळराजे ?

**रतन** : आणि मी एकटाच त्या डेस्कवर बसलो तर माझं अभ्यासात कसं लक्ष लागणं शक्य आहे दिवाणसाहेब ? भुका लागलेल्या माणसाच्या पुढ्यात बसून तुमच्या एकट्यापुढं श्रीखंड-पुरीचं ताट ठेवलं तर तुम्हाला जेवण जाईल ?

**जिवाजी** : दिवाणसाहेब, तुम्ही बाळराजांना भलत्याच खिंडीत गाठता आहात. ते तुम्हाला अडचणीत आणतील. बाळराजांच्या आईसाठी जे घर आपण राहायला दिलंय त्याच्या दुरुस्तीसाठी आम्ही माणसं पाठवली होती. त्या घराबरोबरच इतर कर्मचाऱ्यांच्या घराची दुरुस्ती करायचा हुकूम त्या माणसांना कोणी दिला ?

**रतन** : मी दिला. तुमच्या वतीनं आजोबा.

**जिवाजी** : हा अधिकार तुम्हाला कोणी दिला होता ?

**रतन** : कोणी नाही. पण नंतर मी तुम्हाला सांगितलं होतं आजोबा.

**जिवाजी** : नंतर सांगणं निराळं. आधी परवानगी घेतली होतीत ?

**रतन** : नाही, ते चुकलं. पण ती घरं किती मोडकळीला आली होती, घरात किती ओल

आली होती ते तुम्ही पाहिलं असतं तर—

**जिवाजी :** तरी सुद्धा ते चुकलं.

**रतन :** ती सगळी माणसं किती सुखी झाली, तुम्हाला किती दुवा देतात ते—

**जिवाजी :** तरीसुद्धा ते चुकलं. तुमचं चुकलं.

**रतन :** कोणाचं भलं होत असेल तर एखादी चांगली गोष्ट आधी करावी. मग वडील-माणसांना सांगितली तरी बिघडत नाही, असं अगंनं मला शिकवलंय.

**जिवाजी :** ते चूक आहे. दुरुस्तीची सगळी रक्कम तुमच्या खाजगी नेमणुकीतून कापून घ्यायचा आम्ही हुकूम दिला आहे. तुमचं काय म्हणणं आहे त्याबद्दल ?

**रतन :** माझं काय म्हणणं असणार आजोबा ? तुम्ही जे कराल ते चांगलंच असणार, असं अगंनं सांगितलंय मला.

**जिवाजी :** पुन्हा ' अगं अगं अगं !' या वर्षात तुम्हाला आता नवी खेळणी, कपडालत्ता की नाटक, सिनेमा, सर्कस यासाठी एक पैसा सुद्धा मिळणार नाही.

**रतन :** चालेल. फक्त आपल्या वॉचमन लिंबाजीच्या मुलाला, धोंडूला, एक कुबडी घेऊन द्या तुमच्या खाजगीतून दिलीत तरी चालेल.

**जिवाजी :** देणार नाही.

**रतन :** मर्जी तुमची.

**जिवाजी :** ही सगळी सत्ता आणि हा सगळा अधिकार आम्ही मेल्यावर तुम्ही गादीवर याल तेव्हा—

**रतन :** ( ताडकन उठत, व्यथित होत, त्यांचा हात धरीत ) असं बोलू नका आजोबा, तुम्ही मला फार फार आवडता. तुम्ही मरता कामा नये. पपा मला सोडून गेले आणि आता तुम्ही सुद्धा... [ गहिवरतो. डोळे टिपतो. जिवाजी मल्हारराव न कळत त्याला जवळ घेत, थोपटत... ]

**जिवाजी :** ठीक आहे... ठीक आहे... आम्ही नाही मरणार... मग तर झालं ? दिवाणसाहेब, लिंबाजीच्या मुलाला एक कुबडी घेऊन द्या.

**शाहूराव :** जी सरकार.

**जिवाजी :** आमच्या खाजगीतून.

**रतन :** ( खुलून आजोबांच्या गालाचा पापा घेत ) आजोबा तुम्ही चांगलेच आहात. माझ्यावरला राग गेला ?

**जिवाजी :** (आतून खुलत पण उसने अवसान राखीत ) ते ते अप्पूचं आणि सुभानमामांच काय, ते सांगा अगोदर.

**रतन :** मी त्यांना भेटायला जाऊ नये अशी तुमची इच्छा आहे ना आजोबा ? मग मी नाही जाणार.

**जिवाजी :** ( खूष होत ) यंव रे हिमतबहाद्दर !

**रतन :** पण मी अगंला भेटायला जाणार आहे. तिथं अप्पू आणि सुभानमामा मला भेटले तर ?

**जिवाजी :** ( हसू दावीत ) ऐकलंत दिवाणसाहेब ? हा पोरगा जितेंद्राच्या ऐवजी आमच्या बॅरिस्टर जावईबापूच्या पोटी जन्माला यायला हवा होता. पोर बोलण्यात कोणाला हार जाणार नाही. मुद्द्याला पक्का बळकट आहे.

**रतन :** मग आजोबा ? जाऊ ना मी ?

**जिवाजी :** जा. तुम्हाला कोण आडवणार ? तुम्ही तर राजांचे राजे होऊन बसला आहात.

**रतन :** ( पळत जाताना थबकून वळून ) आजोबा, अप्पू आणि सुभानमामा यांना घेऊन येऊ ना मी ?

**जिवाजी :** या. त्यांच्यासाठी पालखी पाठवायला हवी काय आम्ही ?

[ रतन हसतो आणि पळत जातो. त्याच्याकडे पाहात—]

दिवाणसाहेब, हा पोर राजा होईल तेव्हा पुढील कित्येक पिढ्यांत त्याच्या कर्तबगारीचे आणि गुणांचे पवाडे प्रजाजन गात राहतील. आमची भविष्यवाणी ऐकून ठेवा.

**शाहूराव :** राजा होईल तेव्हा ना ?...दॅटस् द प्राब्लेम.

**जिवाजी :** प्रॉब्लेम ? कसला आलाय प्रॉब्लेम ?

[ तेवढ्यात सटवाजी एक सीलबंद लखोटा घेऊन येतो आणि— ]

**सटवाजी :** सरकार खाजगी कारभारी देसाईसाहेबांनी सरकारातून आलेला ह्यो शीलबंद लखोटा आपनाकडं द्याया सांगितलं हाय. कोनी बाई कचेरीमंदी आपली वाट बघत्यात म्हनाले.

**शाहूराव :** बघू बघू [ म्हणत ते लखोटा घेतात आणि गडबडीने फोडून आतले टंकलिखित पत्र व त्याला जोडलेले इतर कागद झरझरा पाहू लागतात. त्यांची मुद्रा चिंताक्रांत होत जाते ते पाहून—]

**जिवाजी :** काय भानगड आहे दिवाणजी ?

**शाहूराव :** आय एक्स्पेक्टेड इट ! सांगतो सरकार. ( सटवाजीस ) देसाईसाहेबांना सांग की मी येईपर्यंत त्या बाईंना कचेरीतच बसवून ठेवा. कोणत्याही कारणासाठी त्यांना सरकारांच्या भेटीला पाठवायचं नाही.

**सटवाजी :** जी सरकार. [ सटवाजी मुजरा करून जातो ]

**जिवाजी :** कोण बाई आल्या आहेत शाहूराव ?

**शाहूराव :** मंजुळाबाई.

**जिवाजी :** म्हणजेऽऽ...रणजीतची बायको ?

**शाहूराव :** होय सरकार. ( कागदपत्र पाहात ) होय, बायकोच. असं दिसतंय खरं.

**जिवाजी :** आणि तो खलिता ?

**शाहूराव :** हिंदुस्थान सरकारच्या संस्थानी खात्यातर्फे आलाय. ए. जी. जी. साहेबांचा असा निष्कर्ष आहे, की शारंगधरच्या गादीवर दहावे हिंमतबहाद्दर म्हणून मंजुळाबाईंच्या मुलाचा पहिला हक्क पोचतो.

**जिवाजी :** ( आवेशाने ) नाही नाही... कधीही नाही. हा हक्क मी मुळीच मान्य करणार नाही.

**शाहूराव :** जरा सबुरीनं घ्यायला हवं सरकार. हा कायदेशीर दावा आहे आणि तो कायद्याच्याच मार्गानं सोडवायला हवा.

**जिवाजी :** पण दिवाणसाहेब, तुम्हाला असं वाटतं का, कीऽऽऽ ( थबकतात )

**शाहूराव :** सरकार, प्रथमदर्शनी तर असं दिसतंय कीऽऽऽ ( तेही थबकतात )

**जिवाजी :** ( येरझारा घालीत आवेगानं ) नाही नाही... शाहूराव... हे हे असं घडता कामा नये... असं मुळीच घडता कामा नये...

[ थबकून जिवाजी मल्हारराव शाहूरावांच्या विचारमग्न मुद्रेत रोखून बघतात. बघता बघता त्यांचे डोळे भरून येतात आणि त्याच वेळी—अंधार.]

**प्रवेश पहिला संपला**

# अंक दुसरा

## प्रवेश दुसरा

[ मागील प्रवेशानंतर काही दिवस उलटले आहेत. राजप्रासादातील तोच महाल. वेळ सायंकाळची. जिवाजी मल्हारराव महाराज प्रक्षोभित आणि चिंताग्रस्त मुद्रेनं पाठीवर हात घेऊन महालात येरझारा घालीत आहेत. समोर शाहूराव सचिंत मुद्रेनं उभे आहेत. क्षणभराने—]

**जिवाजी :** (येरझारा घालीत, तळहातावर मूठ आपटीत) हा– हा सगळा ठार वेडेपणा आहे...बेहद्द मूर्खपणा आहे आम्ही त्या वेळी युवराज रणजीतबद्दल मुख्यतः बोलत होतो एक दोन शब्द सहज वेडेवाकडे जितेंद्रबद्दल आम्ही बोलून गेलो असू. पण त्यासाठी बाळराजांनी राजवाड्यातून रात्री–अपरात्री पळून जायचं ? तेही थेट मुंबईला ?

**शाहूराव :** पित्याबद्दल छोटे सरकार फार हळवे झाले आहेत हे योगितादेवींनी बजावून सांगितलं होतं आपल्याला सरकार.

**जिवाजी :** ठीक आहे. चुकलं आमचं. मग आता काय लोटांगणं का घालायची आम्ही बाळराजांच्यापुढं ?

**शाहूराव :** तसं कोणी म्हणत नाहीये सरकार. मला खात्री आहे, श्रीमती योगितादेवी यातून बरोब्बर मार्ग काढतील.

**जिवाजी :** तिच्या शहाणपणाचे गोडवे माझ्यापुढे तुम्ही गात जाऊ नका शाहूराव. तिच्या लाडामुळंच बाळराजे शेफारलेत असा आमचा पक्का ग्रह झालेला आहे.

**शाहूराव :** ठीक आहे. मग तुम्ही येऊ नका, असा पुन्हा निरोप धाडू का योगितादेवींना ?

**जिवाजी :** ( गडबडीनं ) नको नको. तिनं यायलाच हवं. एरवी हे प्रकरण निस्तरायचं

कोणी ? आम्ही ? छे छे... ते आम्हाला मुळीच जमायचं नाही. ( पुन्हा येरझारा ) पण दिवाणसाहेब, बाळराजे कोणालाही न सांगता सवरता, रात्री अपरात्री, वाड्यावरून सहीसलामत निघून जातात; सकाळपर्यंत वाड्यावर कोणालाही त्याचा पत्ता लागत नाही, याचा अर्थ, इथले सगळे पहारेकरी आणि नोकरचाकर गाफिल, आळशी, कामचुकार आणि भ्रष्ट झाले आहेत, असा होतो की नाही ?

**शाहूराव :** तसा एकदम निष्कर्ष काढता येणार नाही सरकार. छोटे सरकार श्रीमती योगितादेवींना भेटायला म्हणून संध्याकाळचे गेले होते. अनेकदा अशा वेळी ते रात्री जेवायला आणि मुक्कामाला आईच्याकडंच राहतात. आपणही त्याला हरकत घेऊ नये, अशाच आज्ञा दिल्या होत्यात. त्यामुळे परवासुद्धा असाच प्रकार घडला असेल असा सर्व सेवकांचा अंदाज होता. सायंकाळी बाळराजे सरळ इथून उठून स्टेशनवर जातील आणि गाडीत बसून मुंबईकडं रवाना होतील याची कोणाला कल्पना येणार ?

**जिवाजी :** त्यांना तिकिटाचे पैसे तरी कोणी दिले ? त्यांच्या आईनं ?

**शाहूराव :** नाही सरकार, माणूस चौकशीला जाईतो योगितादेवींना यातलं काहीही ठाऊक नव्हतं. फोनवरून मुंबईला सुभानमामाशी जी वातचीत झाली, त्यावरून छोटे सरकार तिकिटाशिवायच प्रवास करून गेले हे कळलं. मुंबईलासुद्धा ते पिशवी घेऊन चालतच आपल्या चाळीकडं गेले.

**जिवाजी :** हूंऽ ! शाहूराव हा प्रकार षट्कर्णी होता कामा नये. वर्तमानपत्रातसुद्धा त्याला थोडीही प्रसिद्धी मिळता कामा नये. नाहीतर—

**शाहूराव :** आपण याची चिंता करू नये सरकार. ही बातमी कुठेही बाहेर जाणार नाही याची मी सगळी नाकेबंदी केलीय. सगळ्यांना सक्त आज्ञा दिल्या गेल्या आहेत—

**जिवाजी :** ( पुन्हा येरझारा घालत ) पण मला एक सांगा, मुलानं एवढी डोक्यात राख घालून पळून जाण्याएवढं कारण तरी काय घडलं, ते बाळराजांनी सुभानमामांना सांगितलं असेल की ?

**शाहूराव :** सुभानमामा छोट्या सरकारांना घेऊन एवढ्यात येऊन पोचतीलच वाड्यावर. ते आल्यावरच सगळा खुलासा होईल.

**जिवाजी :** बाळराजाच्या आईचं काय म्हणणं आहे ?

**शाहूराव :** सरकार, त्यांच्या आणि आपल्या भावना एकच आहेत. योगितादेवीदेखील बाळराजांवर फार रागवल्या आहेत.

**जिवाजी :** फोनवरून बाळराजांशी ती काही बोलली का ?

**शाहूराव :** त्या फोनवरून बाळराजांना एवढंच म्हणाल्या की तू आधी वाड्यावर

वाचनालय ...
क्र. 29599 नों. दि. 28/8/66
वि. नाटक क्र. ................

परत ये. त्याशिवाय मी तुझं काही एक ऐकणार नाही.

**जिवाजी :** ( सुस्कारत ) हूं ऽ ! या मुलाच्या मनाचा आम्हाला थांगपत्ताच लागत नाही शाहूराव. त्याच्याशी कसं वागावं हेच आम्हाला समजत नाही.

**शाहूराव :** आपण कष्टी होऊ नये सरकार. योगितादेवी छोट्या सरकारांना कसं हाताळावं ते पुरेपूर जाणतात. आपण सगळे एवढे घाबरून, गलबलून गेलो, पण सगळ्या प्रसंगात त्या मात्र अगदी शांत आणि निश्चल होत्या.

[ तेवढ्यात सटवाजी येतो आणि मुजरा करीत ]

**सटवाजी :** सरकार, बाळराजांच्या मासाहेब आल्यात.

**जिवाजी :** दिवाणसाहेब, आम्ही आमच्या खास महालात जाऊन जरा आराम करतो. जरूर लागली तर आम्हाला बोलवा.

**शाहूराव :** आपण चलावं सरकार; योग्य वेळी आपल्याला निरोप धाडतो. ( जिवाजी मल्हारराव जातात. ) सटवाजी, योगितादेवींना घेऊन ये. ( सटवाजी जातो. क्षणभराने योगिता येते आणि थबकते ) यावं योगितादेवी. बसावं.

**योगिता :** ( येत, बसत ) या वाड्यावर पुन्हा पाऊल घालायचं नाही, असा मी पक्का निश्चय केला होता शाहूराव; पण या मुलाच्या पायात देवानं माझी सत्त्वपरीक्षाच पाहायची ठरवलेलं दिसतंय.

**शाहूराव :** फार मोठ्या गोष्टी पणाला लागतात तेव्हा छोटे निश्चय सोडून देण्यातच शहाणपणा असतो ताई ! छोटे सरकार आले का ?

**योगिता :** शंभू महादेवाच्या टेकडीवरून आपली लाल गाडी घाट उतरताना दिसली मला. एवढ्यात येतीलच ते.

**शाहूराव :** आपण रात्रभर दारात उभ्या राहून त्यांची वाट पाहात होता ?

**योगिता :** त्याशिवाय, एका बाळाची असहाय आई, दुसरं काय करू शकते शाहूराव ?

**शाहूराव :** योगितातार्ई, तुम्ही स्वतःला असहाय समजू नये. आम्ही सगळे तुमच्या पाठीशी आहोत. श्रीमंत सरकारसुद्धा. सरकार रागावले नाहीयेत ताई, ते दुःखी-कष्टी झालेत.

**योगिता :** त्याची मला कल्पना आहे शाहूराव. पण मी स्वतःला असहाय म्हटलं त्याचा अर्थ वेगळा होता. पतीच्या माघारी एकुलता एक मुलगा, वेड्यासारखा वागायला लागला, तर आई भयभीत होते; पोरकी, पांगळी होते. त्या वेळी तिला कोण्णी कोण्णी साहाय्य करू शकत नाही. तिचं तिलाच भोगत, सोसत, धीरानं आपला मार्ग आपणच काढावा लागतो.

**शाहूराव :** ते बरोबरच आहे योगितातार्ई. पण आपण इतक्या निर्वाणीची भाषा

बोलावी, असं काही घडलंय असं आम्हाला वाटत नाही. अखेर बाळराजे एक लहान मूल आहेत, हे आपण कोणीच विसरता कामा नये.

**योगिता :** रतन वाड्यावरून, अपरात्री एवढा संतापून निघून जाण्यासारखा प्रकार काय घडला असावा, असा तुमचा कयास आहे ?

**शाहूराव :** ( विचारात पडत ) प्रकार असा म्हणाल तर मला .एकच असावा असं वाटतं. कदाचित मी चुकतही असेन. पण बाळराजे निघून गेले त्या दिवशी दुपारी जेवायच्या टेबलावर, शासाहेब आणि आक्कासाहेब महाराज यांच्याशी सरकार बोलत होते. जुन्या आठवणी निघाल्या. पंगतीला छोटे सरकार आहेत याचं भान न राहता श्रीमंत सरकार उद्वेगानं बोलून गेले— माझी दोन्ही मुलं मूर्ख, गाढव, बेजबाबदार निघाली. थोरल्यानं सिनेमात जाऊन दिवे लावले आणि धाकट्यानं सैन्यात जाऊन नाश करून घेतला. श्रीमंतांनी एवढे उद्‌गार काढताच बाळराजांची मुद्रा खर्रकन उतरली. ते पानावरून उठले आणि आंचवून वर झोपायला महालात गेले. ते गेल्यावर श्रीमंत म्हणाले— "सैन्यात जाऊन कमिशन घ्यायची जितेंद्रला काय गरज होती ? हा उत्तम क्रिकेटियर होता, उत्तम ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर होण्याइतका बुद्धिमान, विद्वान आणि कर्तबगार होता. . .पण शेवटी काय झालं ? बाकी हिशेब शून्य !" योगितातार्इ, श्रीमंतांचे हे उद्‌गार छोट्या सरकारनी ऐकले नाहीत. अर्थात माझ्याशिवाय हा प्रकार त्या वेळी कोणाच्याही लक्षात आला नाही. आणि त्या वेळी मलाही, त्यातून असा काही भयंकर परिणाम घडेल याची कल्पना आली नव्हती.

**योगिता :** आता मला शंकाच उरली नाही. रतन त्यामुळंच दुखावला.

**शाहूराव :** श्रीमंत सरकारनाही आपली चूक उमगलीय. ते त्याबद्दल फार खंतावलेत. पण योगितातार्इ, तुम्ही जाणता, बाण सुटलेला आहे. त्याची भरपाई कशी करायची ? श्रीमंतांनी विचारलं की आम्ही बाळराजांच्यापुढं लोटांगण घालून माफी मागायची का त्यांची ?

**योगिता :** ( कडाडत ) शीऽऽ ! काय बोलता तुम्ही हे शाहूराव ? या मुलाची तेवढी योग्यता नाही आणि असती तरी 'वयोवृद्धांचा मान' म्हणून काही भावना आहे की नाही ? रतनची समजूत कशी घालायची ते तुम्ही आता निःशंकपणे माझ्यावर सोपवा.

**शाहूराव :** ( आनंदून ) योगितातार्इ, मी श्रीमंतांना नेमकी हीच सूचना केली होती.

**योगिता :** तशीच आणखी एक सूचना तुम्ही श्रीमंतांना करून ठेवा. रतन येईल तेव्हा मी फार कडकपणा धारण करणार आहे. तो श्रीमत सरकारांची माफी मागायला येईल, तेव्हा त्यांनी रतनला अत्यंत प्रेमानं, मायेनं वागवावं आणि

ममतेनं बोलावं. हे करीत असतानाच रतनच्या वडिलांच्याबद्दल दोन चांगल्या गोष्टी, आठवणी, सहजपणे सांगाव्यात आणि शेवटी त्याला इथं घेऊनं यावं आणि झाला गेला प्रकार मी विसरून जायला हवा; रतनला मी त्याबद्दल मुळीसुद्धा रागावता कामा नये, अशी श्रीमंतांनीच त्याच्यासमोर मला अंमळ जरबेनं आज्ञा करावी.

**शाहूराव :** ( भारावून ) मुजरा मासाहेब... तुमच्यातल्या थोर आईचं खरंखुरं आज दर्शन घडलं मला.

**योगिता :** शाहूराव, जगातली प्रत्येक ‘ आई ’ अशीच होती आणि अशीच असते... अशीच असणार आहे देखील.

[ तेवढ्यात सुभानमामा येतात आणि मुजरा करीत ‘ मुजरा सरकार ’ म्हणत उभे राहतात तशी—]

**शाहूराव :** कोण, सुभानमामा ? तुम्ही ? आणि छोटे सरकार कुठं आहेत ? त्यांना बरोबर घेऊनच आलात ना तुम्ही ?

**सुभान :** जी हां सरकार. माझ्यासंगंच आल्याती बाळराजे. पर त्ये असं म्हनत्यात सरकार—

**योगिता :** ( कडकपणे ) थांबा सुभानमामा ! ( सौम्य स्वरात ) दिवाणसाहेब, तुम्ही श्रीमंत सरकारना माझा निरोप सांगणार आहात ना ? [ शाहूराव मानेनं ‘ होय ’ म्हणत मुजरा करून जातात.] सुभानमामा, रतनला तोंड आहे ना ? त्याला काय म्हणायचंय ते त्याला स्वतःला सांगता येत नाही ? तेवढ्यासाठी त्याला तुमच्या मध्यस्थीची गरज कधीपासून लागायला लागली ?

**सुभान :** ताईसाब, छोट्या सरकारांना लई लई दुख जालंया. श्रीमंत सरकार त्यानला काय काय बोलले—

**योगिता :** काय वाट्टेल ते बोलले असतील. म्हणून काय वाड्यावरून भित्र्याभागूबाई-सारखं रात्री अपरात्री पळून जायचं ?

**सुभान :** तसं न्हाय ताईसाब—

**योगिता :** तसंच आहे. वाड्यावरून पळून जाताना, वाटेवरच रतनच्या आईचं घर होतं ना ?

**सुभान :** ( गांगरून ) त्येचं मंजी काय जालं ताईसाब—

**योगिता :** मला तुमच्या गप्पा ऐकायच्या नाहीयेत सुभानमामा. प्रश्नाचं सरळ उत्तर द्या. रतन जेव्हा वाड्यावरून पळून गेला, तेव्हा त्याच्या आईचं घर कुठं होतं ? किती लांब होतं ?

**सुभान :** ह्ये काय.. हतंच... वाटंवर तर होतं.

**योगिता :** मग त्या आईचा काय विचार केला तुमच्या छोट्या सरकारनी? काही नाही. गरज काय? हे झालेत आता छोटे सरकार. ती कुठची कोण? तिला काय महत्त्व द्यायचंय? फार फार तर रडेल रडेल आणि बसेल घरात गप्प. खरंय ना?

**सुभान :** ( डोळे पाणावत ) तसं न्हाय...तसं न्हाय, माज्या गुनाच्या वये...

**योगिता :** ( कडकपणे ) मग कसं आहे? सुभानमामा, भलत्या वेळी, चुकलेल्या माणसाच्या चुकीची तरफदारी करायला तुम्ही पुढे आलात. दोन दिवसांत रतनचं जेवणखाण तरी नीटपणे झालंय का?

**सुभान :** म्या समदं केलंया ताईसाब, पोर बिलकूल उपाशी नाहीये.

**योगिता :** अस्सं! रतन घरातून पळून गेल्याचं कळल्यापासून मी मात्र अन्नाच्या कणालासुद्धा शिवले नाहीये, सुभानमामा.

**सुभान :** आंऽ ! ताईसाब ? दोन दिवस तुमी उपाशी ?

[ ते ऐकून आत जवळच कुठं तरी उभा असलेला रतन— बहुधा योगिताला ते माहित असावं,—कळवळून गलबलून रडत "अगंऽऽ... अगं तू उपाशी आहेस? दोन दिवस उपाशी आहेस?" असं ओरडत धावत येऊन योगिताला बिलगतो. तशी निग्रहानं त्याला दूर सारीत ]

**योगिता :** दूर व्हा छोटे सरकार. मी तुमच्यासाठी आजवर खूप खस्ता खाल्लेल्या आहेत; खूप उपास काढले आहेत. या दोन दिवसांतल्या माझ्या उपासाचा तुम्हाला एवढा कळवळा यायची गरज नाही.

**रतन :** ( रडत किंचाळत ) मला तू छोटे सरकार म्हणू नकोस ना!

**योगिता :** का नको म्हणू? सगळे लोक तर तुम्हाला छोटे सरकारच म्हणतात.

**रतन :** तू काय ' लोकं ' आहेस?

**योगिता :** परवापर्यंत नव्हते. पण माझा मुलगा माझ्या घरावरून मला न भेटता, न विचारता निघून गेला, तेव्हाच मी लोकात गेले.

**रतन :** ( तिला बिलगत ) माझं चुकलं अगं. मला क्षमा कर. मी पुन्हा कधी नाही असं करणार.

**योगिता :** तुझं काय चुकलं ते नाही सांगितलंस?

**रतन :** कोणाला न सांगता, न विचारता मी मुंबईला निघून गेलो.

**योगिता :** का गेलास? ( थबकून ) सांग ना... कशासाठी गेलास?

**रतन :** म...मला अप्पू आणि सुभानमामा यांना भेटावंसं वाटलं.

**योगिता :** साफ खोटं आहे. ते दोघेही इथं येऊन गेले होते.

**रतन :** म...मला गिरगावातल्या आपल्या घराची आठवण झाली फार.

**योगिता :** हे नंतर सुचलेलं कारण आहे. खरं खरं काय ते सांग.

**रतन :** मला आजोबा बोलले त्याचा राग आला होता.

**योगिता :** आजोबा काय बोलले ?

**रतन :** म्हणाले माझी दोन्ही मुलं मूर्ख, गाढव, बेजबाबदार निघाली. थोरल्यानं सिनेमात जाऊन दिवे लावले; धाकट्यानं सैन्यात जाऊन नाश करून घेतला. माझे पपा काय मूर्ख, गाढव, बेजबाबदार होते काय ?

**योगिता :** तुला मी मूर्ख, गाढव म्हणत नाही कधी ? आत्ताही म्हणते. राग आला की घरातून पळून जाणं हे बेजबाबदारपणाचं आहे. मला काय म्हणशील ?

**रतन :** तू माझी आई आहेस. तू म्हणालीस तर मला ऐकायलाच हवं.

**योगिता :** तसे आजोबा तुझ्या पपांचे पपा नाहीत ? वडील म्हणून आपल्या मुलावर रागवायचा त्यांना हक्क नाही ?

**रतन :** आहे. हे माझ्या लक्षात आलं नाही.

**योगिता :** जो माणूस प्रेम करतो, तोच रागावतो. तुझे आजोबा पुढं काय काय म्हणाले तुझ्या पपांच्याबद्दल, ते ऐकायला तू थांबला होतास ? नाही ! तिरीमिरीत तू उठून निघून गेलास. 'माझ्या पपांच्याबद्दल तुम्ही असं बोलू नका;' असं तू आजोबांना ताडकन् म्हणाला असतास तरी ते मला चाललं असतं. तेवढं धैर्य कुठाय तुझ्यात ? तुला फक्त चोरट्यासारखं पळून जायचं तेवढं सुचलं.

**रतन :** आजोबा पपांच्याबद्दल आणखी काय काय म्हणाले अगं ?

**योगिता :** आजोबा म्हणाले— हा मुलगा उत्तम क्रिकेटियर होता, उत्तम ऑफिसर होण्याइतका हा बुद्धिमान, विद्वान आणि कर्तबगार होता. सैन्यात जाऊन यानं काय साधलं ? काही नाही. तुझ्या आजोबांना जर असं वाटलं असेल तर त्यात त्यांची चूक होती का काही ?

**रतन** नाही. माझंच चुकलं त्या वेळी.

**योगिता :** तू रागानं उठलास आणि खिशात दिडकी नसताना चालता झालास. कल्पना कर, लहान मुलं पळवून नेणाऱ्या एखाद्या टोळीच्या तावडीत तू सापडला असतास, तर काय झालं असतं ? नुसत्या कल्पनेनंसुद्धा माझ्या तोंडचं पाणी पळालं होतं, ठाऊक आहे ? माझी गोष्ट सोडून दे. तुझ्या आजोबांचा विचार कर. या वयात त्यांची काय अवस्था झाली असेल ? तुझी खुशाली कळेपर्यंत ते किती तडफडत, तळमळत होते, ते ठाऊक आहे तुला ?

**रतन :** माझं चुकलं अगं, मला क्षमा कर.

**योगिता :** हे माझ्यापुढं नाही म्हणायचं. वर आजोबांच्या महालात जा आणि त्यांना सांग. त्यांची क्षमा माग. त्यांनी तुला क्षमा केली तरच पुन्हा माझ्याशी बोलायला ये. नाहीतर हवं तिकडं जा.

**रतन :** ( हळूच ) प....पण अगं, माझ्यावर फार फार रागावलेत का आजोबा ?

**योगिता :** ते मला काय ठाऊक ? मी त्यांच्या जागी असते तर खासच रागावले असते.

**रतन :** ( हबकून ) खरंच, फार फार रागावली असतीस ?

**योगिता :** नक्कीच. मी तर तुझ्याशी भाषणसुद्धा करायचं टाकलं असतं.

**रतन :** सुभानमामा, तुम्ही येता माझ्याबरोबर वर आजोबांच्याकडं ? मला फार भीती वाटते.

**योगिता :** नाही. तुझ्याबरोबर कोण्णी येणार नाही. वाड्यावरून एकट्यानं पळून जाताना भीती वाटली नव्हती ना तुला ? मग आताही एकटाच वर जा आणि धीटपणे आजोबांच्यासमोर जाऊन उभा राहा. माझ्यासमोर उभा राहू नकोस.

**रतन :** ( घुटमळत ) अगं मी जातो आजोबांच्याकडं. पण जरा वेळानं गेलं तर चालेल ? म्हणजे संध्याकाळचं हनुमान स्तोत्र म्हटल्यावर—

**योगिता :** नाही. मुळीच नाही चालणार. आधी आत्ताच्या आत्ताच जायला हवं. रतन, हा तुझा भित्रेपणा मी मुळीच खपवून घेणार नाही. तू जाणार आहेस की नाही ?

**रतन :** जातो.

[ जायला लागतो. तेवढ्यात इतका वेळ आडून ऐकत उभे असलेले जिवाजी मल्हारराव आणि शाहूराव येतात. जिवाजी मल्हारराव येतात तेच मुळी—" छे छे छे हे फार फार म्हणजे अतीच झालं. ऐकून, सोसून घेण्यापलीकडे गेलं ! " अशी गर्जना करीत. रतन धावत जाऊन त्यांची पायधूळ मस्तकी लावीत " आजोबा, माझं चुकलं. मला क्षमा करा ! " असं म्हणतो. योगिता नमस्कार करून अमळ दूर बाजूला किंचित पाठ करून उभी राहते. सुभानमामा मुजरा करून जातात. ]

**जिवाजी :** ( रतनला पोटाशी घेत ) केली. बाळराजे आम्ही तुम्हाला एकदम संपूर्ण क्षमा केली. आमच्यामुळं, तुम्हाला तुमच्या मासाहेबांचे फार कडक शब्द ऐकून घ्यावे लागले, याबद्दल आम्ही दिलगीर आहोत. दिवाणसाहेब, बाळराजांच्या मातोश्रींना सांगा, हा अमळ फारच कडक डोस झाला. बाळराजे हाडाचेच प्रेमळ आणि सोशिक म्हणून ते निमूटपणे त्या बोलतील ते ऐकून घेत राहिले.

**योगिता :** ऐकून घेतील नाहीतर काय ? चूक त्यांच्याकडंच होती ना ?

**जिवाजी :** शाहूराव लक्षात घ्या, मूल लहान आहे, तेव्हा कधीमधी अंमळ चुकणारच की ! अहो इवल्याशा मस्तकात संताप मावेनासा झाला तर ती बिचारी काय करतील ?

**योगिता :** शाहूराव, संताप आला तर मुलं आरडाओरडा करतील, फार फार तर

रुसतील, रडतील. पण हे काय मेलं ? राग आला म्हणून घर सोडून कोणी पळून जातं का कधी ?

**जिवाजी :** शाहूराव, तुम्ही हट्टी आहातच, पण अडाणीदेखील आहात. शिलाहार घराण्याचा इतिहास वाचा एकदा, म्हणजे कळेल तुम्हाला की आमचे पूर्वज, प्रत्येक हिंमत बहाद्दर, कधी ना कधी एकदा तरी घरातून पळून गेलाच होता. आक्कासाहेब पळाल्या नाहीत ? रणजीत पळाला नव्हता ? जितेंद्र पळाला नाही ? आणिक तसंच सांगायचं म्हणजे... "क्रिकेटच्या मॅचमध्ये खेळायचं नाही. तो विदेशी खेळ आहे. त्याऐवजी मल्लखांब, कुस्ती खेळ" म्हणून आमचे वडील तटून बसले तेव्हा आम्हीसुद्धा पहिली मॅच खेळण्यासाठी घरातून पळूनच गेलो होतो मुंबईला.

**शाहूराव :** पण सरकार—

**जिवाजी :** आमचं सोडून द्या एक. पण शिलाहार घराण्याचे मूळ पुरुष विक्रमादित्य महाराज— त्यांनी तर नांगर टाकला, तरवार घेतली आणि घरातून पळून जाऊनच ही शारंगधरची गादी स्थापन केली. आता बोला! यावर तुम्ही काय म्हणणार आहात ?

**योगिता :** शाहूराव, हा सगळा घराण्याचा 'पलायन पराक्रम' आत्ताच या अजाण कोवळ्या मुलासमोर सांगायला हवा होता का ? रतननं हेच आदर्श गिरवावेत अशी तुमची इच्छा आहे का ?

**जिवाजी :** शाहूराव, आम्ही बाळराजांचे आजोबा आहोत आजोबा! मुलाला काय सांगावं आणि काय सांगू नये, याचे धडे आम्हाला तुमच्याकडून घ्यायची गरज नाही.

**योगिता :** तसंच मीही सांगते शाहूराव, मी मुलाची आई आहे आई. माझ्या मुलावर कोणते संस्कार करावेत आणि कोणते करू नयेत हे फक्त मीच जाणते. ही कोणा राजेमहाराजांची कामं नव्हत.

**जिवाजी :** ( संतापानं ) शाहूराव, तुम्ही बेहद्द उर्मट आहात.

**योगिता :** शाहूराव, तोंडावर स्पष्टपणे बोलणं हा उर्मटपणा असेल तर त्याचा मक्ता काही शिलाहार घरण्यातल्या पुरुषांनाच मिळालेला आहे, असं समजू नका.

**जिवाजी :** शाहूराव, मला तुमच्याशी एक शब्दसुद्धा बोलायची इच्छा नाहीये.

**योगिता :** शब्द काय, मी तर एक अक्षरसुद्धा बोलायला तयार नाहीये. येते मी.

[ उभ्या उभ्या नमस्कार करून पाठ वळवून चालती होते. हा सगळा संवाद चालू असताना शाहूराव– "पण सरकार... माझं जरा ऐकून घ्या सरकार" इ. शब्दांनी आणि रतन– "अगं मी असं सांगतो...माझं जरा थोडंसं ऐक. अगं...' इ. शब्दांनी जिवाजी आणि योगिता यांना थांबवू पाहतात. पण ते दोघंही कोणा-

चंच ऐकण्याच्या मनःस्थितीत नाहीत. अखेर योगिता निघून गेल्यावर— ]

**रतन :** दिवाणसाहेब !... आताऽ ?

[ शाहूराव रतनला खुणेनंच सांगतात की तू आईकडं जा. मी श्रीमंतांची समजूत घालतो. रतन लगबगीनं जातो. मग पाठ करून उभ्या राहिलेल्या जिवाजी मल्हार-रावांच्या जवळ जात— ]

**शाहूराव :** श्रीमंत सरकार....

**जिवाजी :** ( अमळ घुश्श्यातच ) ती जगदंबा गेली ?

**शाहूराव :** होय सरकार. छोट्या सरकारना मी त्यांची समजूत घालण्यासाठी पाठवलंय.

**जिवाजी :** पण मला सांगा शाहूराव, तिला दटावण्याचं आम्ही नाटक करायचं ठरवलं होतं ना ? तिनंच तुम्हाला तसं सुचवलं होतं ना ?

**शाहूराव :** होय सरकार. पण नाटक हे शेवटी नाटक राहिलं नाही. ते खरोखरीचं भांडण व्हायला लागलं.

**जिवाजी :** ते ते सगळं तिच्या बाजूनं.

**शाहूराव :** माफ करा सरकार, तुमच्या बाजूनं देखील.

**जिवाजी :** तरी सुद्धा आम्ही काही तिला ' जा ' म्हटलं नव्हतं.

**शाहूराव :** त्या आधी 'या' असंसुद्धा कधी म्हटलं नव्हतंत आपण सरकार. योगिता-देवी इथं आल्या त्या केवळ मी त्यांना बोलावलं म्हणून.

**जिवाजी :** नाहीतरी ती जरा जादाच अभिमानी आहे.

**शाहूराव :** अभिमान कोणाला नसतो सरकार ?

**जिवाजी :** तुम्हाला काय सुचवायचंय दिवाणसाहेब ?

**शाहूराव :** एक छोटीशी गोष्ट सरकार.

**जिवाजी :** ती कोणती ?

**शाहूराव :** सरकार छोट्यातल्या छोट्या माणसांनादेखील स्वाभिमान असतो आणि सगळ्यांत वडीलधारे आणि सत्ताधारी राजे म्हणून तो आपणच जपायला हवा.

**जिवाजी :** ( कडाडत ) दिवाणसाहेब [ एक येरझारा घालून त्यांच्याजवळ जात गालात हसत सौम्य स्वरात ] दिवाणसाहेब, तुम्ही फार पोक्त आहात, समंजस, शहाणे आहात. आमच्यापेक्षाही !

[ गांगरलेले शाहूराव सुटकेचा निःश्वास टाकतात. जिवाजी मल्हारराव सस्मित मुद्रेनं त्यांच्या खांद्यावर थोपटतात आणि त्याच वेळी — अंधार]

## प्रवेश दुसरा संपला

# अंक दुसरा

## प्रवेश तिसरा

[ काही दिवसांनंतर एका सकाळी, वेळ सकाळी दहा वाजण्याची. नीलकमल राजप्रासादातील तोच महाल. रंगमंच प्रकाशाने उजळल्यावर आतून आक्कासाहेब, शासाहेब आणि रतन येतात. येता येता— ]

**शासाहेब :** वा वा वा वा... फारच बहार झाली.

**आक्कासाहेब :** कसली बहार झाली ?

**शासाहेब :** ते तुम्हाला कळण्यासारखं नाहीये आक्कासाहेब महाराज. पण छोटे सरकार—

**रतन :** आता तुम्ही मला 'छोटे सरकार' नाही म्हणालात तरी चालेल काका. मला रतनच म्हणा.

**शासाहेब :** त्याचा एकदा फायनल निर्णय झाला म्हणजे तुम्हाला काय म्हणायचं ते ठरवू. जिभेला या वयात वळण पाडणं महामुष्किल असतं. आता हेच पाहा, यांना 'आक्कासाहेब महाराज' म्हणून म्हणायचं हे मी स्वतःला शंभर वेळा चिमटे घेऊन शिकवलं तरीसुद्धा मधेच केव्हातरी—

**आक्कासाहेब :** पुरे. आता आज आपण मुंबईला परत जायला निघालो आहोत. आता 'साहेब, सरकार आणि महाराज' विसरा.

**शासाहेब :** छे छे विसरून कसं चालेल ? उलट घरी परतल्यावर मुलांना, मित्रांना, सगेसोयऱ्यांना आणि गडीमाणसांना खडसावून बजावून, त्यांच्याकडून वरचेवर ही संथा पाठच करून घेणार आहे मी.

**आक्कासाहेब :** कशी घेताय ते बघतेच मी. तिथं मी आहे आणि तुम्ही आहात. बाबासाहेब नाहीयेत तिथं.

**शासाहेब :** त्याची मला चिंता नाहीये, आठ-पंधरा दिवसांत आपण पुन्हा परत इथं येणार आहोत. म्हणजे यावंच लागणार आहे.

**आक्कासाहेब :** पुन्हा परत ? इथं शारंगधरला ? ते कशासाठी ? झाला एवढा आराम पुरे नाही का झाला ? तुम्हाला काही कामधंदा आहे की नाही ?

**शासाहेब :** फॉर युवर इन्फर्मेशन आक्कासाहेब महाराज, श्रीमती मंजुळादेवी या माझ्या जुन्या पक्षकार आहेत. सुमारे बारा वर्षांपूर्वी पहिल्या नवऱ्यापासून त्यांना घटस्फोट मी मिळवून दिला. नंतर आपले बंधू कै. रणजीत यांच्याशी त्यांचा विवाह माझ्याच साक्षीनं पार पडला, आणि पुढं त्यांची भांडणं विकोपाला गेली त्या वेळी ती दोघं माझाच सल्ला मानून विभक्त झाली. मग तुम्हीच सांगा गादीचा वारस कोण, या महत्त्वाच्या दाव्यात मी कसा काय गप्प बसणार ?

**आक्कासाहेब :** बरोबर आहे. तुम्ही वकील म्हणजे भटजी. तुम्हाला बारावं काय आणि बारसं काय, दक्षणा मिळाल्याशी कारण. तुम्ही काय मंजुळेच्या बाजूनं हा दावा लढवणार आहात ?

**शासाहेब :** आक्कासाहेब महाराज, मी फक्त न्यायदानाला मदत करणार आहे. तेवढ्यासाठी मुंबईला तातडीनं जाऊन जुने कागदपत्र पाहणं मला जरूर झालंय.

**आक्कासाहेब :** काय वाट्टेल ते करा. इतके दिवस बाबासाहेब तुमच्याशी मनात अढी ठेवून वागले; त्याचा तुम्ही आता सूड उगवणार आहात, हे मला पक्कं ठाऊक आहे.

**रतन :** बहार कसली झाली म्हणालात काका ?

**शासाहेब :** अरे म्हणजे हा काय प्रश्न आहे बाळराजे ? अहो गिरगावचा अप्पू पानवाला म्हणजे काय असामी आहे महाराजा ! अरे ' पान जमवावं ' तर अप्पूनंच ! केवळ त्याच्या पानासाठी दादरच्या आमच्या घरून आणि फोर्टमधल्या कोर्टातून रोज आमच्या चार चार चकरा होतात गिरगावात. अर्धा अर्धा तास रांगेत उभे राहतो आम्ही अप्पूच्या पानाच्या ठेल्यापुढं.

**रतन :** ( विस्मयानं ) खरंच सांगता काय ?

**शासाहेब :** छोटे सरकार, तुम्हाला चमत्कार सांगतो. अगदी परवा परवा एक खुनाची केस चालवीत होतो मी हायकोर्टात. पुडी सोडून अप्पूनं दिलेलं पान तोंडात ठेवलं मात्र...आय हाय हाय...बघता बघता पान विरघळलं आणि मस्तकात थेट अमृतधारा उसळल्या. तस्सा अर्ग्यूमेंटसाठी उभा राहिलो. तडा तडा केस ठेचून पार निचरा करून टाकला प्रतिपक्षाचा. अशील निर्दोष सुटला माझा, बघता काय ? तो माझे पाय धरायला लागला तशी मी म्हटल त्याला— 'माझे पाय धरू नकोस. अप्पूचे जाऊन पाय धर. ही सगळी त्याची किमया आहे.' असा हा थोर अप्पू, तुमचा जिगर दोस्त निघावा आणि इथं त्याची आमची जवळीक साधावी, ही

केवढी बहार आहे!

**रतन :** अप्पू एवढा जबरदस्त पानवाला असेल असं वाटलं नव्हतं मला.

**शासाहेब :** मुद्द्याची गोष्ट एवढीच छोटे सरकार, की आता अप्पूच्या पानाच्या ठेल्यापुढं रांगेत उभं राहायची गरज नाही आम्हाला. अप्पूनं शेजारच्या हॉटेलचा फोन नंबर दिलाय. पान घरपोच होईल असं आश्वासन दिलंय त्यानं मला.

**रतन :** मग तो नक्कीच करणार काका...मस्तकात अमृतधारा उसळल्या म्हणालात ...हे पान कसं काय लागतं हो चवीला?

**शासाहेब :** सरकार, त्याचा स्वाद तुम्हाला कळायला अजून अवकाश आहे जरा. पण—

**आक्कासाहेब :** नकोच कळायला. बाळराजे, सिगरेट, पानतंबाखूला हातसुद्धा कधी लावायचा नाही. माझी शपथ आहे तुम्हाला.

**रतन :** शपथ कशाला आक्काआत्त्या—अप्पूच मला झोडपून काढील मी पानतंबाखू, सिगरेटला हात लावला तर.

**शासाहेब :** इतका सोवळेपणा करायची गरज नाही सरकार. तूर्त बनारसी मीठा मसाला पानापासून प्रारंभ करायला—

**आक्कासाहेब :** पानपुराण पुरे झालं. बाबासाहेब येताहेत.

[ जिवाजी मल्हारराव आणि शाहूराव बोलत येतात. सरकार स्वारी म्हणताहेत की..."ठीक आहे ठीक आहे. तुम्ही तुमच्या बाजूनं सगळा शोध करा, पण आम्ही काही त्यावर आशा ठेवून नाही." ]

**शासाहेब :** ( मुजरा करीत ) सरकार, आम्ही निघतो आहोत आता.

**आक्का :** ( वाकून नमस्कार करीत ) बाबा मी येते आता. आमचे दिवस फार आनंदात गेले इथं. यांनाही खूप विश्रांती मिळाली.

**जिवाजी :** बॅरिस्टरसाहेबांनी खूप हसवलं आम्हाला. दिवाणसाहेब, या आठ–पंधरा दिवसांत आम्ही जेवढं हसलो तेवढं उभ्या हयातीत हसलो नसू. काय?

**शाहूराव :** खरं आहे सरकार.

**आक्का :** फक्त तुमच्या मनाला काळजी निर्माण करणारं हे वारसाचं प्रकरण निर्माण झालं नसतं तर—

**जिवाजी :** राज्यव्यवहार म्हणजे हे असं चालायचंच. खरं म्हणजे आक्कासाहेब, तुम्हाला आणखी काही दिवस इथं राहायला हरकत नव्हती. बॅरिस्टरसाहेब पुन्हा येणारच होते, तेव्हा—

**आक्का :** तुम्ही पाहिलंच आहे बाबासाहेब, यांना हरघडीला मदतीला मी लागते. माझ्याशिवाय यांना काही सापडत नाही, मिळत नाही, आणि सुचत नाही. त्यातून

हे पुन्हा इथं येणार असले तर मी येतेच आहे की. काय हो ?

**जिवाजी :** बॅरिस्टरसाहेब, तुम्ही याच पुन्हा. तुमचा वकिली शोध आणि कागदपत्र दाव्यात कोणत्याही बाजूची असली, तरी तुम्ही आपल्या मनाला लावून घेऊ नका.

**शासाहेब :** छे छे श्रीमंत सरकार, मनाला लावून घेऊन वकिलाचं कसं निभेल ? आक्कासाहेब महाराज आत्ताच मला म्हणाल्या, की तुम्ही वकील म्हणजे भटजी; तुम्हाला बारसं काय आणि बारावं काय, सारखंच ! तुमची दृष्टी फक्त दक्षणेवर.

**जिवाजी :** ( डोळे मोठ्ठे करून पाहात ) आक्कासाहेब तुम्ही ? तुम्ही असं म्हणालात बॅरिस्टरसाहेबांना ?

**आक्का :** नाही हो बाबासाहेब, मी आपली गंमतीनं म्हणाले. निव्वळ थट्टेत !

**जिवाजी :** प्रेमविवाह केला तरी साक्षात पतिदेवाशी इतक्या गंमतीनं थट्टामस्करी करून बोलणं, राजघराण्यातील स्त्रियांना शोभत नाही आक्कासाहेब. बॅरिस्टरसाहेब, आक्काचं बोलणं तुम्ही मनावर घेऊ नका. या आक्काला पूर्वीपासूनच कोणाशी केव्हा, काय, कसं बोलावं, याचा पोच, अमळ बेताचाच आहे. या बाबतीत ती अगदी मातोश्रीं-च्याच वळणावर गेलीय.

**शासाहेब :** आपण बिलकुल चिंता करू नये सरकार. आक्कासाहेब महाराजांनी लग्नाच्या वेळी मला जो एकदम होकार दिला, त्याच वेळी ती गोष्ट माझ्याही लक्षात आली होती. तत्राप प्रत्येक प्रसंगी, मी त्यांना नेहमीच संभाळून घेत असतो. होय ना आक्कासाहेब महाराज ?

**आक्का :** ( आन्तर्यामी जळफळत ) चला आता, ते गाडीत सांगते तुम्हाला. मुंबईला गेल्यावर डॉ. गुपचुपना तावडतोब तुमची प्रकृती दाखवलीच पाहिजे.

**रतन :** ( हसत ) काका, तुमचा गाडीतला प्रवास सुखाचा होवो.

**शासाहेब :** थँक्यू, बाळराजे थँक्यू...अप्पूनं दिलेली ही पुडी खिशात आहे तोपर्यंत मी कोणाला डरत नाही. चला.

**जिवाजी :** दिवाणसाहेब, पाहुण्यांना स्टेशनवर पोचवायला—

**शाहूराव :** ती सगळी व्यवस्था झालीय सरकार. देसाईसाहेब स्वतः जातीनं त्यांच्या बरोबर जाताहेत. चलावं आक्काताई...

[ आक्कासाहेब रतनला चटकन जवळ घेऊन त्याचा पापा घेऊन शाहूरावांच्या पाठोपाठ जातात. मागोमाग शासाहेब 'टाटा' करीत जातात. रतनही जाऊ लागतो ]

**जिवाजी :** बाळराजे, तुम्ही थांबा. राजांनी पाहुण्यांना दारापर्यंत जाऊन निरोप देण्याचा रीतिरिवाज नाही ते काम दिवाणसाहेबांच्यावर सोपवायचं.

**रतन :** पण आता काही मी राजा होणार नाहीये आजोबा.

**जिवाजी :** ते अजून ठरायचंय. तुमचे पानवाले मित्र अप्पूराव आणि सुभानमामा परत गेले ?

**रतन :** काल रात्रीच परत गेले. अगदी खूष होऊन गेले आजोबा.

**जिवाजी :** त्यांची सगळी सरबराई तुमच्या मनाप्रमाणं झाली ना ?

**रतन :** अगंच्या घरात सरबराईचा प्रश्नच नव्हता आजोबा. पण माझ्याप्रमाणंच त्यांना देखील तुम्ही फार आवडलात आजोबा.

**जिवाजी :** खरंच म्हणता ?

**रतन :** अप्पू जाताना मला काय म्हणाला सांगू ?

**जिवाजी :** ( बसत ) या, इथं असे माझ्या जवळ बसून सांगा पाहू.
[ रतन त्यांच्या पायाशी खाली बसतो तशी — ] हे काय बाळराजे, असे इथं वर माझ्याजवळ बसा ना !

**रतन :** नको. असं इथं पायाशी बसून, तुमच्या मांडीवर हनुवटी ठेवून तुमच्याकडं पाहात बोलायला मला फार आवडतं आजोबा.

**जिवाजी :** ठीक. ठीक. तुमच्या मनाप्रमाणं होऊ द्या. हूं, सांगा अप्पू काय म्हणाला ?
[ तशी रतन ताडकन उठत ]

**रतन :** ( आवेशानं ) लोक किती दुष्ट आणि खोटारडे असतात हो आजोबा !

**जिवाजी :** का ? काय झालं ?

**रतन :** अप्पूला मी मुद्दामच तुमच्याकडं घेऊन येण्याचा हट्ट धरला होता. तो यायलाच तयार नव्हता. लोक त्याला म्हणाले म्हणे— ‘ श्रीमंत सरकार फार तुसडे आहेत, गर्विष्ठ आहेत, त्यांना माणुसकी नाही, हव्वं त्याला ते हव्वं तसं तोंड टाकून बोलतात आणि नोकराचाकरांना किंवा गोरगरिबांना तर ते हंटरनं फोडून काढतात.’

**जिवाजी :** मग ? आम्हाला भेटून गेल्यावर त्याचं काय मत झालं ?

**रतन :** मत ?· त्याचं काय मत होणार ? पार खडीसाखरेसारखा विरघळून गेला तो. मला म्हणतो—“ सोन्या, तुझा आजोबा अगदी नंबरी राजा आहे की रे ! गुळाच्या ढेपेसारखा गोड गोड आणि मायाळू. मला तर एकदम शिवाजी महाराजांची याद आली बघ.”

**जिवाजी :** ( हसू आवरीत ) शिवाजी महाराजांची याद ? त्यांची याद यायला अप्पूनं कधी कुठं शिवाजी महाराजांना पाहिलं होतं ?

**रतन :** अप्पू खूष झाला किनई आजोबा, की त्याला एकदम शिवाजी महाराजांची याद येते. मला म्हणाला — “ साला पुन्हा कोणी भामटा तुझ्या आजोबांबद्दल बोलू दे वाईटसाईट, त्याच्या जिभेला सुपारीएवढे फोडच काढतो.”

**जिवाजी :** सुपारीएवढे फोड ? जीभेला ? ते कसे काय बुवा अप्पू काढतो ?

**रतन :** ती अप्पूची खास ट्रिक आहे. कोणी मवालीगिरी केली की अप्पूनं त्याच्या पानात कडककजाळ तंबाखू आणि ढीगभर चुना घातलाच. भले भले दांडगे दादा, भर रस्त्यात शंख करीत जमिनीवर गडबडा लोळण घेतात, ठाऊक आहे ?

**जिवाजी :** ( मंद हसत ) एकूण, जपून भिऊनच राहायला हवं आम्हाला तुमच्या अप्पूपासून.

**रतन :** नाही नाही...आजोबा तुम्हाला तो फार मानतो. मला जाताना अप्पू म्हणाला, "सोन्या, तुझ्या आजोबांच्यासारखा राजा म्हणून तू नाव मिळवलं पाहिजेस. नाहीतर बेत्त्या याद राख, गाठ या अप्पूशी आहे."

**जिवाजी :** मग बाळराजे तुम्ही काय उत्तर दिलंत !

**रतन :** काहीतरी दिलं झालं. पण आता काय त्याचं ! आता मी काही कधी राजा होणार नाहीये.

**जिवाजी :** त्याबद्दल तुम्हाला वाईट वाटतं का बाळराजे !

**रतन :** ( क्षणमात्र विचारात पडत ) आजोबा, मंजुळादेवी त्यांच्या प्रतापला घेऊन इथं राहायला येतील नाही का आता !

**जिवाजी :** त्यांचा गादीवर हक्क मान्य झाला तर येतील सुद्धा.

**रतन :** मग ' अगं 'ला ते त्या घरातून जायला सांगतील !

**जिवाजी :** मुळीच नाही.

**रतन :** आणि मला !

**जिवाजी :** तुम्हाला सुद्धा नाही.

**रतन :** मी राजा होणार नसलो तरी तुम्ही माझे आजोबा असणारच आहात, होय ना?

**जिवाजी :** होय तर !

**रतन :** मग मला त्या गादीबिदीची मुळीच गरज नाहीये. खरं सांगू का आजोबा, मला तुम्ही आजोबा म्हणूनच हवे आहात. आजोबा म्हणूनच तुम्ही मला फार फार आवडता.

**जिवाजी :** ( भारावून त्याला जवळ घेत ) खरंच म्हणता बाळराजे ?

**रतन :** मी ' अगंला ' काय म्हटलं ते सांगू ? मी म्हणालो— अगं, त्यांना राज्य देऊन टाक. फक्त आजोबा तेवढे आम्हाला राहू देत म्हणून सांग त्यांना. आजोबांना घेऊन आपण गिरगावच्या घरी जाऊ. अगं म्हणाली, त्यांचा दुसरा नातू, तो प्रताप बरा ऐकेल ? तो म्हणेल की— आजोबासुद्धा आम्हालाच हवेत. आम्ही त्यांना इथंच ठेवून घेणार. मग ? मी म्हटलं त्यावर एक युक्ती आहे. रात्र झाली आणि सगळी माणसं झोपली की हळूच आपण आजोबांना घेऊन इथून पळून जाऊ या... ?

**जिवाजी :** ( मोठ्या कष्टानं गहिवरणे व हसणे आवरीत ) पळून ?

**रतन :** हूंऽऽ एकदम सूंबाल्या करायचा तो थेट गिरगावात ! छान आहे की नाही युक्ती ? तुम्ही याल ना आमच्याबरोबर पळून आजोबा ?

**जिवाजी :** ( डोळे टिपत त्याला पोटाशी घेत ) त्याची काही गरज नाही... काहीसुद्धा गरज नाही बाळराजे. तुमच्या प्रेमाचा हक्क आम्हाला मंजूर आहे.

[ तेवढ्यात शाहूराव येतात व बघतच राहतात. मग— ]

**शाहूराव :** सरकार—

**जिवाजी :** ( सावरीत ) दिवाणसाहेब पाहुणे गेले.

**शाहूराव :** होय सरकार, स्टेशनवर रवाना झाले. सरकार मंजुळादेवी आपल्याला भेटायसाठी आल्या आहेत.

**जिवाजी :** त्या बाईला आम्ही भेटून काय साध्य होणार आहे ? तुम्हीच तिची गाठ-भेट घ्या आणि—

**शाहूराव :** ते सगळं रीतसर मी केलं आहे आणि करतोच आहे सरकार. पण आपण एकदा तरी तिची भेट घेणं जरूर आहे. उद्या तिचा हक्क मान्य झाला, आणि तो मान्य होणार अशीच लक्षणं मला दिसताहेत, तर आपल्या तिच्या संबंधात विनाकारण कडवटपणा यायला नको.

**जिवाजी :** आमचे संबंध गोडीचे राहतील अशी शक्यता तरी वाटते का तुम्हाला दिवाणसाहेब ?

**शाहूराव :** श्रीमंतांच्या भावना काय आहेत ते मला ठाऊक नाही का सरकार ? तरी-सुद्धा गादीची प्रतिष्ठा राखायची, तर न्यायबुद्धीनं आपण मंजुळादेवींना एक तरी भेट द्यायलाच हवीच, असं मला वाटतं.

**जिवाजी :** ( विचारात पडत ) हूंऽऽ ! काय करायचं सोनचाफाराजे ?

**रतन :** त्यांचा आग्रह आहे तर भेटा की. त्या मागतील ते सगळं देऊन टाका. फक्त तुम्ही स्वतःला सोडून हंऽऽ !

**जिवाजी :** ( हसून ) काळजी करू नका बाळराजे, आमच्यासारख्या म्हाताऱ्यांवर तुमच्याशिवाय कोणी हक्क सांगायला उत्सुक नाहीये. ठीक आहे शाहूराव. घेऊन या बाईंना. मुलाखत फक्त पाच मिनिटं.

**शाहूराव :** ठीक आहे सरकार. तसंच होईल. ( जातात )

**रतन :** आजोबा, मी जाऊ आता ? शाळेची वेळ होत आली. अजून गृहपाठ पुरा करायचाय मला.

**जिवाजी :** असं ? मग चला चला लवकर. अभ्यास महत्त्वाचा. ही राजकारणातली घाणेरडी दलदल तुडवायला समर्थ आहोत आम्ही.

[ रतन गडबडीनं "सटवाजी, माझं दप्तर कुठाय?..." असं हाकारीत जातो. जिवाजी मल्हारराव एकदोन येरझारा पाठीवर हात घेऊन महालात घालतात. तोच शाहूराव येतात. पाठोपाठ अंमळ गोंधळलेली मंजुळा येते. चाळिशीची. खूपच नखरेल, भपकेबाज आणि सवंग पोशाख केलेली. रूपानं बरी पण मेक अप बटबटीत. हावभाव चालचर्या नाटकी. आल्या आल्याच ती "श्रीमंत महाराज मी आपली लाडक्या पुत्राची... रणजीतची धर्मपत्नी मंजुळा..." असे म्हणत धावून श्रीमंतांचे पाय धरते. श्रीमंत तिडिक आल्यासारखे दूर होत— ]

**जिवाजी :** दिवाणसाहेब, तिला सांगा की रणजीत आमचा लाडका पुत्र कधीही नव्हता. तो अभ्यासात मठ्ठ होता; व्यवहारात मूर्ख होता; वागणुकीत व्यसनी चैनी होता आणि वृत्तीनं दुष्ट, नादान, नालायक होता, आमची उभी हयात त्याच्या भानगडी निस्तरण्यात गेली.

**मंजुळा :** ( प्रेमळ लाघवीपणे ) त्याचा अनुभव मी कमी का घेतलाय महाराज ? लग्नानंतर मी त्यांना सावरण्याचा, सुधारण्याचा, माणसात आणायचा कमी का प्रयत्न केला होता ? महाराज, मी निष्ठेनं वागले, सावलीसारखी त्यांना साथ दिली पण माझे सगळे प्रयत्न वाया गेले. त्यांनी माझा अनन्वित छळ केला, मारहाण केली, भाजलं, डागलं, उपाशीतापाशी ठेवलं पण ते ते सगळं लाडक्या मुलाकडं पाहून मी सोसलं. पण पोटच्या मुलाच्या जीवावरच ते उठले तेव्हा मला लीगल सेपरेशन घ्यावं लागलं. मी चित्रपटात काम करायचंही सोडलं होतं. पण ते पोटगीसुद्धा नियमितपणे देईनात तेव्हा मला पुन्हा लहान लहान भूमिका घ्याव्या लागल्या. पण आपल्या पायाची शपथ घेऊन सांगते महाराज, मी चित्रपटातसुद्धा अत्यंत सोज्वळ आणि राजघराण्यातील कुलवतीला शोभेल, साजेलशाच भूमिका करीत होते. श्रीमंत सरकार, आपला नातू, माझा मुलगा प्रताप इतका गोड आहे, इतका बुद्धिवान, हुशार आणि स्मार्ट आहे की त्याला पाहिल्याबरोबरच आपण त्याच्या प्रेमात पडाल. आमच्या स्टुडियोतले ज्योतिषीसुद्धा त्याचा नुसता हात पाहून म्हणाले की, या मुलाच्या हातावर राजचिन्हं आहेत. हा आपल्या आजोबांच्या कीर्तीत भर घालणाराच राजा होणार. आपण त्याला एकदा तरी पाहावं सरकार.

[ इतका वेळ जिवाजी मल्हारराव तीक्ष्ण नजरेनं रोखून तिच्याकडं पाहात राहतात; अखेर शाहूराव मध्ये पडत म्हणतात— ]

**शाहूराव :** तशी वेळ येईल तेव्हा श्रीमंत सरकार तुमच्या मुलाला पाहतीलच. पण मंजुळादेवी, तुम्ही सगळे कागदपत्र घेऊन प्रथम भारत सरकारच्या संस्थानी खात्याच्या अधिकाऱ्यांना भेटलात, ही गोष्ट रीतीला सोडून झाली, असं नाही तुम्हाला वाटत ?

**मंजुळा :** मुळीच नाही. माझ्या अगोदर तुम्ही त्या दुसऱ्या बाईला... रणजीतच्या धाकट्या भावाच्या बायकोला इथं आणलीत. तिच्या मुलाचा युवराज म्हणून पुकारा केलात. त्या वेळी तुम्हा लोकांना माझी आणि माझ्या प्रतापची आठवण झाली होती ? तुमच्याकडून सरळपणे माझ्या मुलाला न्याय मिळेल असं मला वाटलं नाही, तेव्हाच मला सरकारच्या संस्थानी खात्याकडं दाद मागावी लागली.

**शाहूराव :** तिथं दाद लागून तुम्हाला न्याय मिळेल याची खात्री आहे ना तुम्हाला ?

**मंजुळा :** नक्कीच. तुम्हाला ठाऊक नसेल कदाचित, पण संस्थानी खात्याचे सेक्रेटरी पीटर्सनसाहेब माझे पर्सनल फ्रेंड आणि फॅन आहेत. ते नक्कीच मला न्याय मिळवून देतील. पण या बाबतीत कोर्टदरबार होऊ नये, आपसांतच काही कॉम्प्रोमाइज झालं तर पाहावं, म्हणून केवळ मी श्रीमंतांना भेटायला आले.

**जिवाजी :** झालंऽ ! संपलं ना तुमचं सगळं म्हणणं ? आता आम्ही सांगतो ते ऐका. रणजीतशी आम्ही पूर्वीच संबंध तोडले होते. त्यानं निवडलेली बायको तुमच्यापेक्षा वेगळी असेल, अशी आमची अपेक्षाही नव्हती. त्यामुळे अर्थातच तुम्ही वा तुमचा पुत्र यांच्याशी कसलाही संबंध ठेवण्याची आमची इच्छा नाही. या वारसा प्रकरणाचा अगदी कसून शोध आणि शहानिशा चालू आहे. त्यात तुमचा कायदेशीर वारसा शाबीत झाला, तर जे त्याच्या हक्काचं आहे, ते त्याला बिनबोभाट मिळेल. अशा प्रसंगी तुमची व तुमच्या मुलाची स्वतंत्रपणे सगळी व्यवस्था केली जाईल. पण माझ्या हयातीत तरी या राजवाड्यात तुम्हाला पाऊलसुद्धा ठेवता येणार नाही. यापुढं तुम्हाला जे काय सांगायचं असेल ते तुम्ही तुमच्या वकिलामार्फत सांगू शकाल. तुम्ही जाऊ शकता.

**मंजुळा :** ( जळफळत ) ठीक आहे ! ठीक आहे ! मलाही इथं थांबायची मुळीच इच्छा नाही. यापुढे माझे वकीलच तुम्हाला भेटतील. आणि माझे वकील कोण आहेत तेही तुम्ही कान खोलून नीट ऐकून ठेवा. माझे वकील आहेत— तुमचे जामात, बॅरिस्टर शासाहेब पटवर्धन.

[ ताडताड निघून जाते.]

**जिवाजी :** हा काय प्रकार आहे दिवाणसाहेब ?

**शाहूराव :** मी देखील बुचकळ्यात पडलोय सरकार.

( दोघे परस्परांकडे अवाक् होऊन पाहत असतानाच—अंधार )

## अंक दुसरा संपला

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[ त्याच दिवशी सायंकाळी. योगिताचं घर. या घरातील दर्शनी दालन. साधेच पण नीटनेटके सजवलेले. गिरगावातल्या चाळीतल्या खोलीपेक्षा किती तरी अंगाने योगिताच्या सौंदर्यदृष्टीचा स्पर्श जागजागी दिसतो आहे. रंगमंच प्रकाशाने उजळतो तेव्हा या दालनात कोणीही नाही. योगिता बहुधा मागील दारी भाजीपाल्याच्या वाफ्यात काम करीत असावी. तिकडूनच तिचा आवाज ऐकायला येतो. "...गंगाराम अरे तू खताची गाडी केव्हा आणून टाकणार आहेस ? पाऊस तोंडावर आलाय. एकदा कोसळायला लागला की पार फजिती करून टाकील हो..." आणि क्षणभराने— "आणि ही कोथिंबीर काढून सगळ्यांच्या घरी नेऊन दे की रे... फरसबीच्या शेंगासुद्धा काढायला झाल्यात, नाही का ?..." एवढ्यात दारावरची घंटा खणखणते तशी ती बाहेरूनच "आल्ये..." अशी ओ देते, मग पदराला ओले हात पुसत ती आतून येते आणि दार उघडायला जाते. जाता जाताही म्हणते, "हज्जारदा याला सांगितलं की संध्याकाळी मी मागीलदारी भाजीपाल्याच्या वाफ्यात काम करते. तू तिकडून येत जा. पण नाही. आईकडून पुरेपूर सेवा करून घ्यायला हवी ना.... रतन किती वेळा मी तुला सांगितलं की—" असं म्हणत ती दार उघडते आणि थक्क होऊन— "अगबाई...आपण ?" असे उद्गारत गोंधळून मागं येते. उघड्या दारातून येतात श्रीमंत सरकार जिवाजी मल्हारराव महाराज. त्यांची मुद्रा अत्यंत व्यथित आणि कष्टी. ]

**जिवाजी :** होय आम्हीच सूनबाई.

**योगिता :** आज प्रथमच आपण मला सूनबाई म्हणालात...सगळं भरून पावले.

**जिवाजी :** परवानगी असेल तर आत येऊ इच्छितो आम्ही सूनबाई.

**योगिता :** घर तुमचंच आहे महाराज, आत येण्यासाठी मला कसली परवानगी मागता ?

**जिवाजी :** ( आत येत ) इमारतीची मालकी आमची असली तरी आतलं घर तूच निर्माण केलं आहेस. त्यावर आमचा काय हक्क आहे ?

**योगिता :** मी 'इमारतीच्या' अर्थानं या घराचा उल्लेख केला नव्हता महाराज. आपण माझ्या पतींचे वडील आहात, माझे सासरे आहात आणि माझ्या मुलाचे आजोबा आहात. पतीच्या माघारी तुम्हीच आम्हाला वडिलांचे ठिकाणी आहात. तुम्हीच कुटुंबप्रमुख आहात. या अर्थानं मी म्हणाले की घर तुमचंच आहे. या, असें निचिंतीनं बसा इथं... तुमची मुद्रा फारच थकलेली आणि कष्टी दिसते. [ थरथरणाऱ्या श्रीमंतांना हाताला धरून ती आरामखुर्चीवर बसवते. आणि त्यांना न्याहाळत किंचित हसून ] मला वाटलं की रतनच आलाय वाटतं. म्हणून काय काय बडबडत मी दार उघडलं.

**जिवाजी :** ( कपाळावरील घाम टिपत ) बाळराजांना आम्हीच थांबवलं. आम्ही परतल्यावर मग तुम्ही मासाहेबांच्या भेटीला जा, असं सांगितलं आम्ही त्यांना. ( थबकून ) सूनबाई, थोडं बोलायचंय तुझ्याशी.

**योगिता :** बोलू या की. पण आधी तुम्ही शांत व्हा. परिस्थितीची सगळी जाणीव मला शाहूरावनी करून दिलीय. काही आकाश कोसळलं नाहीये आमच्यावर. ते एकदाच कोसळलं होतं. जितेंद्र ठार झाले तेव्हा. त्यातून तर मी घट्टमुट्ट होऊन सावरले. तेव्हा मी थोडीसुद्धा अस्वस्थ झाले नाहीये. मी काय विचारतेय महाराज, आपल्या बागेतल्या अमसुलाचं पन्हं केलंय मी. आपण घेतलंत तर थोडी हुशारी येईल. घ्याल ?

**जिवाजी :** ( भारावून जात ) का नाही घेणार ? आम्हाला हे असं, इतक्या प्रेमानं विचारणारं तरी कोण उरलंय या जगात ?

**योगिता :** हे मात्र खरं नाहीये हं महाराज. सरोजबन्संचा फार फार जीव आहे तुमच्यावर. तुम्हाला फार प्रेमळ आणि शहाणी मुलगी लाभलीय महाराज. आपण एकच करायला हवं असं मला वाटतं.

**जिवाजी :** काय ? आम्ही काय करायला हवं सूनबाई ?

**योगिता :** सांगते. पण आधी पन्हं घेऊन येऊ ना ? ( चटकन आत जाते आणि क्षणभरातच पन्ह्याचा पेला घेऊन येते. )

**जिवाजी :** पन्हं तयारच करून ठेवलं होतंस वाटतं ?

**योगिता :** ती आपल्या बाळराजांची फर्माईश आहे. नुसती फर्माईश नाही. ते यायच्या

वेळी पन्हं तयार ठेवायची सक्त आज्ञा आहे त्याची. गादी गमावली तरी हुकूम फर्मावण्याची आदत थोडीच सुटणार आहे?

**जिवाजी :** इतक्यात 'गादी गमावली' असं ठामपणे समजू नकोस. हा दावा सर्व शक्तीनिशी लढवायचा आमचा पक्का निर्धार झालाय. जरूर तर प्रीव्ही कौन्सिल-पर्यंतदेखील जाऊ आम्ही.

**योगिता :** कायदेशीर हिकमती लढवून कदाचित दावा जिंकता येईल, महाराज, पण जे न्याय्य असेल तेच रतनला मिळावं असं मला वाटतं.

**जिवाजी :** त्या बयेला आम्ही आज पाहिलीय आणि काय वाटेल त्या हिकमती लढवून तिच्या विरुद्ध हा दावा जिंकणं संस्थानच्याही हिताचं आहे, अशी आमची ठाम खात्री पटलीय.

**योगिता :** आपण मंजुळादेवींच्याबद्दल एकदम वाईट ग्रह करून घेणं बरोबर नाही महाराज. तीही एक स्त्री आहे. आपल्या थोरल्या चिरंजीवांची पत्नी आहे. आपल्या मुलाला गादी मिळावी असं जर तिला वाटलं तर—

**जिवाजी :** त्याचेही काही सभ्य आणि सौजन्यपूर्ण मार्ग आहेत सूनबाई. 'संस्थानी खात्याचे सेक्रेटरी पीटर्सन माझे पर्सनल फ्रेंड आणि फॅन आहेत,' असं आम्हाला ठणकावून बजावणारी ही बाई काय लायकीची असेल? शारंगधरची ही राज्यसत्ता योग्य माणसाच्या हातात जावी हा आमचा हट्ट चुकीचा आहे का सूनबाई?

**योगिता :** महाराज, तुम्हाला चूक किंवा बरोबर म्हणण्याचा मला काय अधिकार आहे? मी फक्त माझ्या मुलाबद्दल बोलते आहे. तो आपल्या वडिलांच्यासारखाच प्रेमळ, शूर, उदार मनाचा, परोपकारी, अन्यायाबद्दल चीड असणारा आणि सत्याची चाड बाळगणारा व्हावा असा माझा ध्यास आहे.

**जिवाजी :** हे सगळे गुणविशेष बाळराजांच्या वडिलांच्यामध्ये असतील कदाचित. पण त्यांच्या आजोबात आहेत की नाहीत कोण जाणे.

**योगिता :** आजोबांच्याबद्दल मी काय बोलू शकणार? उभ्या आयुष्यात आज प्रथमच मी त्यांच्याशी मोकळ्या मनानं बोलतेय. पण लहान मुलांचा विश्वास आणि प्रेम मिळवणं ही इतकी सोपी गोष्ट नाहीये सरकार, आणि रतन फार हुशार आहे; त्याच्या प्रेमाला, विश्वासाला पात्र होणं किती अवघड आहे ते मला पक्कं ठाऊक आहे.

**जिवाजी :** तुला काय म्हणायचंय सूनबाई?

**योगिता :** महाराज, मला ठाऊक आहे, रतनचं तुमच्यावर फार प्रेम आहे; तुमच्यावर त्याचा फार विश्वास आहे; तुमच्याबद्दल त्याला फार फार अभिमान वाटतो.

**जिवाजी :** ( गलबलतात. पण मनातली घालमेल दिसू नये म्हणून पन्ह्याचा पेला तोंडाला लावून गटागट पिऊन तो रिकामा करतात. तो दूर ठेवत, रुमालानं तोंड

पुसत ) ते खरंय. आम्ही त्याचा क्षणाक्षणाला अनुभव घेतो आहोत. पण सूनबाई एकच सवाल पुसतो. राजवाड्यात पाऊल ठेवायचीसुद्धा आम्हीच तुला बंदी केली होती, हे जर बाळराजांना समजतं, तर आम्ही त्यांच्या एवढ्या प्रेमाचे आणि विश्वासाचे धनी झालो असतो का ?

**योगिता :** ( क्षणभर थबकून ) नाही महाराज. रतनला ते मुळीच आवडलं नसतं. आजही ते त्याला कळेल तर त्याला धक्का बसेल. तो दुखावेल.

**जिवाजी :** त्याचीही जाण आहे आम्हाला. आम्ही तुझ्यावर एवढा अन्याय केला असताना तो विसरून, तू त्याला या वस्तुस्थितीचा सुगावा सुद्धा लागू दिला नाहीस. असा पोलादी संयम किती बायकांना पाळता आला असता ?

**योगिता :** माझ्या मुलाचं भलं व्हावं यासाठीच मी तो संयम पाळत होते ना ?

**जिवाजी :** युवराज म्हणून त्यांची नियुक्ती झाल्यावर, बाळराजांनी आमच्यावर प्रेम केलंच पाहिजे, अशी काही परिस्थितीची गरज नव्हती.

**योगिता :** या बाबतीत माझ्या भावना फार वेगळ्या आहेत महाराज. परिस्थितीची गरज म्हणून काही माणसं माणसांवर प्रेम करीत नाहीत. मी लग्न होईपर्यंत अनाथाश्रमात वाढले. ‘ कुटुंबवत्सलता ’ म्हणजे काय आहे ते मी अनाथाश्रमातल्या कोरड्या शुष्क वातावरणात अभावानंच अनुभवलं होतं. एक प्रकारे मी प्रेमाची भुकेली होते. पतीचं प्रेम मला अल्पकाळच मिळालं. पण अगदी भरभरून आकंठ तृप्त होईपर्यंत मिळालं. लहान मुलाच्या वाढत्या वयात सत्त्वपूर्ण अन्नाची जशी गरज असते त्याला, तशीच प्रेमाची देखील. नुसत्या आईच्या प्रेमाची नव्हे. वडिलांच्या प्रेमाची देखील. वडील अकाली गेले तर मात्र ती जागा आजोबांनाच भरून काढावी लागते. महाराज, तुमच्या सगळ्या अटी मान्य करून मी इथं आले ती काही मुलाला शारंगधर संस्थानची गादी मिळावी म्हणून नाही; तर त्याला आजोबांची हक्काची मायेची बसायला मांडी मिळावी म्हणून.

**जिवाजी :** ( भारावून उठत ) बास बास सूनबाई, या क्षणी आम्हाला पुरतं कळून चुकलंय की ‘ थोरपण ’ आणि ‘ शहाणपण ’ ही काही राजघराण्याचीच मिरास नाही...अनाथाश्रमातल्या एखाद्या पोरक्या मुलीला देखील या दैवी संपत्तीचा वारसा लाभतो. आमच्या विरोधात उभं राहून जितेंद्रानं तुझी बायको म्हणून निवड केली, याचा आम्हाला आज अभिमान वाटतो

**योगिता :** महाराज, आपण मला अकारणच थोरपणा चिकटवताहात. मी शहाणी असलेच तर त्याचं कारण मी आई आहे. प्रत्येक आईला आपल्या मुलाच्या कल्याणाची काळजी असते. तिच्या उदरातून त्रिभणा जीव प्रसूतिवेदना देत अवतरतो, तोच मुळी दैवी संपत्ती तिला अर्पण करीत.

**जिवाजी :** ( येरझारा घालीत ) आयुष्यात इतके सुंदर सुविचार आम्ही प्रथमच ऐकतो आहोत सूनबाई. कदाचित पहिल्यांदाच ते आम्हाला कळले असतील. पोटच्या पुत्रांचे आणि आमचे सूर कधीच जुळले नाहीत. हिंदुस्थानातल्या संस्थानांचे गादीचे वारस शक्य तर व्यसनी, चैनी, ख्यालीखुशाली व्हावेत, जुलमी दुष्ट, अत्याचारी आणि भ्रष्टाचारी, नादान निपजावेत, निदान टोणपे आणि अडाणी राहावेत, अशीच ब्रिटिश सरकारच्या संस्थानी खात्याची प्रथमपासून शासन धारणा आहे. तुझा नवरा शहाणा निघाला याचं कारण तो गादीचा वारस नव्हता आणि राजवाड्यातून तो वेळीच बाहेर पडला. बाहेरही त्याला तुझ्यासारखी बायको मिळाली. पण रणजीतची वाट लागली ती मुळात तो वाईट होता म्हणून नाही. गादीचा वारस म्हणून त्याला पद्धतशीर रीतीनं बिघडवण्याचे प्रयत्न झाले. प्रथम पीटर्सन-कडून आणि नंतर या मंजुळेकडून. सूनबाई, तुझा मुलगा गादीचा वारस ठरला तर तुला कशाकशाबद्दल दक्ष राहायला पाहिजे हे कळावं, यासाठी हा इतिहास सांगितला. या घडीला मात्र आम्ही फार शरमिंदे आहोत, अपार दुःखीकष्टी आहोत.

**योगिता :** कशासाठी महाराज ?

**जिवाजी :** तू आम्हाला क्षमा करायला हवीस सूनबाई.

**योगिता :** हे काय भलतंच बोलता आहात तुम्ही महाराज ? असा तुम्ही माझा काय अपराध केला आहे ?

**जिवाजी :** जितेंद्राच्या मृत्यूनंतर तुझी आणि मुलाची देखभाल करण्याची आमची जबाबदारी होती, ती आम्ही कधीही पार पाडली नाही.

**योगिता :** तुमच्या इच्छेविरुद्ध आम्ही लग्न केलं होतं. त्यामुळं माझी किंवा रतनची जबाबदारी तुम्ही घ्याल, अशी माझी अपेक्षाही नव्हती, महाराज.

**जिवाजी :** गादीचा वारस म्हणून बाळराजांना आणि त्यांच्याबरोबर तुला, इथं आणायचं ठरवल्यानंतरही आमचं वर्तन सौजन्यपूर्ण तर राहू देच पण न्यायीपणाचं सुद्धा झालं नाही. तुला आम्ही राजवाड्यात यायची बंदी केली. सेवकांसाठी बांध-लेल्या पर्णकुटीत तुला राहायला भाग पाडलं.

**योगिता :** पण त्याबद्दलही माझी तक्रार कधीच नव्हती महाराज.

**जिवाजी :** आमचा दुष्टपणा तेवढ्यानं संपला नाही सूनबाई. आज ही सगळी कबुली आम्हाला तुझ्यापाशी द्यायलाच हवी. तुम्ही इथे आलात त्या वेळी एक महालभरून तऱ्हेतऱ्हेची मौल्यवान खेळणी आम्ही घेऊन ठेवली होती. आठवतं का ?

**योगिता :** होय आठवतं महाराज. त्यामुळंच रतनला तुम्ही पहिल्या भेटीपासून आव-डला होतात.

**जिवाजी :** त्याच्यासाठी एक खास तट्टूसुद्धा तबेल्यात आणून ठेवलं होतं. तो म्हणेल

ते आणि मागेल ते तात्काळ त्याला मिळालंच पाहिजे, असे आम्ही सगळ्यांना हुकूम दिले होते.

**योगिता :** तेही रतननं सांगितलं होतं मला. तुमच्याबद्दल त्यामुळंच खूप खूप आदर आणि भक्तिभाव त्याच्या मनात भरून राहिलाय महाराज.

**जिवाजी :** हे सगळं आम्ही कशासाठी केलं, अशी तुझी कल्पना आहे सूनबाई ? जिवाजी मल्हारराव, उभ्या हयातीत एवढे प्रचंड उदार आणि प्रेमळ कशामुळे झाले ? बाळराजांनी तुला साफ विसरावं, तुझं नावसुद्धा काढू नये, तुझ्या भेटीला-देखील जाऊ नये, अशी आमची मनातली इच्छा होती. त्यासाठी क्षुद्रवृत्तीनं आम्ही तो एक डाव खेळून पाहिला. पण आम्ही डावपेचात फसलो, हरलो, पराजित झालो. बाळराजे तुझ्यापासून तर दुरावले नाहीतच पण त्यांनी पाऊणशे वर्षांच्या या म्हाताऱ्याच्या या खडकाळ हृदयात वात्सल्याचे झरे निर्माण केले. बाळराजांनी आमच्या नीरस शुष्क जगण्याला अर्थाचा सुगंध दिला. आता या गोड प्रेमळ लेकराला सोडायचा विचार जरी मनात आला तरी आमची कंबरच खचते. नातवाबद्दलची मायाममता हा चक्रव्यूह आहे सूनबाई. त्यात आत जाता येतं पण बाहेर पडता येत नाही. कधीही नाही.

**योगिता :** पण बाहेर पडायचंच कशाला ? गादीचा वारस मिळाला न मिळाला तरी रतनचे आजोबा म्हणून तुमचं या घरातलं आणि आमच्या दोघांच्या अंतःकरणातलं स्थान अढळच राहणार आहे. नाही का महाराज ?

**जिवाजी :** तेवढीच भिक्षा मागायला मी तुझ्या दारात आलोय सूनबाई.

**योगिता :** असं बोलून आपण मला लाजवू नये महाराज. ही भिक्षा नाहीये. आपला तो हक्क आहे. आपल्या आधाराविना मी आणि रतन खरोखरीच पोरके होऊ.

**जिवाजी :** तर मग सूनबाई, तू आपल्या हक्काच्या घरात... नीलकमल राजप्रासादात राहायला यावंस अशी आमची तुला विनंती आहे. झालं गेलं सगळं विसरून जा. आमच्यापायी तुला जो मनस्ताप घडला असेल त्याबद्दल—

**योगिता :** झालं गेलं मी कधीच विसरलेय महाराज. नीलकमल राजप्रासादात राहायला यायचं की नाही हा प्रश्न मी प्रतिष्ठेचा करीत नाही. पण रतनला आपल्या गादीचा वारसा निर्विवादपणे मिळाला तरच मला तिथं राह्यला येता येईल.

**जिवाजी :** तसं नाही झालं तर ? रतनला घेऊन तू कुठं जाणार ?

**योगिता :** परत मुंबईला. त्याशिवाय दुसरा मार्गच नाहीये मला.

**जिवाजी :** तसं करायची गरज पडणार नाही. पुण्यामुंबईकडेही संस्थानच्या मालकीचे काही बंगले आहेतच.

**योगिता :** जे रतनच्या हक्काचं नाही असं तो काही एक घेणार नाही.

**जिवाजी :** आजोबा तरी हक्काचे आहेत ना? मला तर पळवून घेऊन जाण्याची भाषा तो करीत होता आज सकाळी.

**योगिता :** गादीचा वारस कोणीही ठरला तरी आपलं इथलं वास्तव्य हे आवश्यकच राहणार हे मी जाणते. एरवी मीच आपल्याला आमच्यासंगे चला, असं म्हणाले असते.

**जिवाजी :** ठीक... ठीक... वेळ येईल तेव्हा पाहू. सूनबाई, बाळराजे तुझ्या पाककौशल्याची फार तारीफ करीत असतात. विशेषतः पिठलंभाकरी खावी तर ती 'अगं'च्याच हातची असं ते नेहमी म्हणतात.

**योगिता :** आपण आधी निरोप धाडून केव्हाही यावंत. माझ्या हातचे दोन घास खाल्लेत तुम्ही तर मला धन्यच वाटेल.

**जिवाजी :** आमंत्रण स्वीकारलं. कधी येणार ते बाळराजांच्याशी बोलून ठरवतो आणि कळवतो. बराय येतो आम्ही. ( जायला निघतात. )

**योगिता :** मुंबईला दादर भागात एक छोटा ब्लॉक बघून ठेवायला मी. अप्पूला कळवलंय.

**जिवाजी :** छोटा कशाला? अमंळ मोठाच ब्लॉक बघायला सांग.

**योगिता :** मोठ्या ब्लॉकची गरज नाहीये महाराज. आम्ही दोघंच तर तिथं राहणार

**जिवाजी :** नाही सूनबाई. पक्की ठरलेली गोष्ट एकच आहे. तू परत मुंबईला जायचं ठरवलंस तर जाणारी माणसं दोन असणार नाहीत. तीन असतील.

( जिवाजी मल्हारराव चटकन जातात. योगिता बघतच राहते. त्याच वेळी– अंधार)

**प्रवेश पहिला संपला**

## अंक तिसरा

## प्रवेश दुसरा

[ काही दिवसांनंतरची एक सायंकाळ. उन्हे कलली आहेत पण अजून अंधार पडायला अवकाश आहे. नीलकमल राजवाड्यातील तोच महाल. पण आज सबंध राजवाड्याबरोबरच या महालातही विशेष उत्सवी सजावट चालली आहे. सटवाजीरावांच्या देखरेखीखाली दोन पट्टेवाले पताका लावण्यात गुंतले आहेत. रंगमंच प्रकाशाने उजळतो तेव्हा सटवाजीराव दरडावून म्हणत असतो— ]

**सटवाजी :** चार पताका लावायला इतका येळ? सरकार यायची येळ झाली. त्यांनी तुमचा चेंगटपना पाह्यला तर लेको बाराच्या भावात जाल तुमी. पटापट आवरा. खाली हॉलमंदी पार्टीची तयारी करायची हाय. पार्टी पाह्यली हाय का न्हाय तुमी लोकांनी? आं? का वो दशरथबाबा? नसल नसल... म्या सुद्धा पगितली न्हाई कदी. या राजवाड्यावर सण नाय सुदी नाय... काय नाय की कायबी नाय. छोट्या सरकारांचा वाडदिवस हाय म्हणून ग्यो खुदबा चाललाय. नायतर समदं कसं मेल्या मड्यावानी थंडगार नि गपगार. आटोपा आटोपा, जलदी करा. खूप बडी बडी मानसं यायची हैत आजच्या रातीला. लई मजा बगायला मिळनार हाय राव. मऽस्त खानंपिनं आन समोरल्या मैदानात दारूकाम... भजनावाणी रातभर धुमाकूळ चालणार म्हणा की... आटोपा आटोपा राव... तोंडाकडं बगत न्हाऊ नका. काही काम करा. बूड हालवा जरा लगबग...

[ तेवढ्यात आतून शासाहेब आणि आक्कासाहेब येतात. ]

**शासाहेब :** बघा बघा आक्कासाहेब महाराज. इथं सुद्धा सजावट चालू आहे. आता वाढदिवसासाठी जमणारे पाहुणे खाली हॉलमधे येतील, बागबगिच्यात हिंडतील. इथं श्रीमंतांचा कुत्रासुद्धा फिरकणार नाही. तरी सुद्धा—

**सटवाजी :** सरकार आमी हुकमाचे ताबेदार. नको म्हणत असलात तर—

**आक्का :** छे छे सटवाजी, तो बाबासाहेबांचा हुकूम आहे. तो बदलणारे आम्ही कोण ? तुझं चालू दे. काय हो ?

**शासाहेब :** नाही चालू दे. पण निचिंतीनं बसायचं कुठं याचा विचार करतोय. मला वाटतं आक्कासाहेब महाराज–

**आक्का :** तुम्हाला काहीएक वाटायची गरज नाहीये. बसा त्या कोचावर. एवढ्यात बाबासाहेब आणि शाहूराव येतीलच.

**सटवाजी :** ( काम आटोपत ) बसा बसा सरकार, अगदी निचिंतीनं बसा. इथलं काम आटोपलंच आहे आमचं. चला दशरथबुवा...

**शासाहेब :** सटवाजी, अजून अप्पू किंवा सुभानमामा कोणीही आले नाहीत ना ?

**सटवाजी :** नाही सरकार...

**शासाहेब :** ( घड्याळात पाहात ) गाडी चुकली की लेट झालीय कोण जाणे. एव्हाना ते यायला हवे होते. संध्याकाळची एक्सप्रेस येऊन गेली की नाही, याची चौकशी करायला सांगा देसाईसाहेबांना.

**सटवाजी :** जी सरकार. [ सटवाजी आणि दोन पट्टेवाले जातात ]

**आक्कासाहेब :** त्या अप्पूसाठी का तुमचा जीव एवढा कासावीस झालाय ते मला कळत नाहीये. एवढी बायकोचीसुद्धा लग्नापूर्वी तुम्ही कधी वाट पाहिल्याचं आठवत नाहीये मला.

**शासाहेब :** अरे कुठं पानवाला आणि कुठं प्रेयसी ?

**आक्कासाहेब :** त्यातून प्रेयसी हक्काची बायको झाली की तिचा भाव उतरलाच. पानवाला थोडाच ' हक्काचा ' होतो ?

**शासाहेब :** नेमकं मार्मिक बोललात आक्कासाहेब महाराज.

**आक्कासाहेब :** ते समजलं मला. पण अप्पूकडून काल निघताना पानपट्टीच्या पुड्या बांधून घेतल्या होत्या, नाही का ?

**शासाहेब :** आक्कासाहेब महाराज, त्या घटनेनंतर तब्बल चोवीस तास उलटले आहेत आणि रात्रभर संस्थानच्या रेल्वेतला प्रवास झाला आहे. त्या सगळ्या पानपट्ट्या संपल्या.

**आक्का :** त्या अप्पूला तुमच्या क्लार्क कम् टाइपिस्टप्रमाणं कायमचं नेमूनच घ्या आता तुम्ही तुमच्या सेवेत.

**शासाहेब :** ते माझ्या मिळकतीला झेपणारं नाही सरकार. तरीपण श्रीमंतांची मर्जी पाहून मी सासरेबुवांना सुचवणार आहे की अप्पूला तुम्ही उदार आश्रय द्यावा. जसा दरबार सर्जन किंवा दरबार गवई तसा दरबार पानवाला. बाय अपॉईंटमेंट टू

हिज हायनेस, द राजा ऑफ शारंगधर, हिंमतबहाद्दर दि नाईंथ, जिवाजी मल्हारराव शिलाहार.

**आक्का :** बाबासाहेब तुमच्यावर भयंकर रागावले आहेत हे तुमच्या लक्षात आलंय की नाही ?

**शासाहेब :** थोडंफार आलंय पण त्यांच्या रागावण्याची मी पर्वा करीत नाही. मी श्रीमंतांचा जावई आहे. खरं म्हणजे रागावण्याचा हक्क माझा आहे, श्रीमंत सासरेबुवांचा नाही.

**आक्का :** ( रागानं ) तुम्ही शुद्धीवर आहा ना ! तुमचं डोकंबिकं तर फिरलं नाही !

**शासाहेब :** ( नाटकी कडाडत ) खामोश ! आक्कासाहेब महाराज तुम्ही आमचा अपमान केला आहे. पतिदेवाला उद्देशून उच्चारलेल्या या प्रत्येक शब्दाबद्दल श्रीमंतांच्या समोर तुम्हाला जाब द्यावा लागेल.

**आक्का :** ( बसक्या आवाजात ) हळू हळू ! अहो किती ओरडताय ?

**शासाहेब :** आधी बिनशर्त माफी मागा. अन्यथा तुम्हास कडक नतीजा पावेल याची याद ठेवा.

**आक्का :** ( चिडून ) माफी ? तुमची ? वाट बघा वाट ! जन्मभर.

**शासाहेब :** ( ओरडून ) काऽय ? काय म्हणालात ? पुन्हा बोला...

[ तेवढ्यात श्रीमंत सरकार शाहूरावांशी बोलत येत असल्याची चाहूल लागते तशी—]

**आक्का :** (गडबडीनं न्याहाळत ) काही नाही. बाबासाहेब इकडंच येताहेत. ( ठसक्यात ) अगदी बिनशऽऽऽर्त माफी मागते. झालं समाधान ?

**शासाहेब :** ( खुषीत ) हूंऽऽऽ !

**आक्का :** आता तरी डोकं ताळ्यावर ठेवून बोला.

**शासाहेब :** ( उसळून ) आंऽऽ ?

[ तेवढ्यात जिवाजी मल्हारराव येतात. पाठोपाठ शाहूराव येतात. जिवाजी मल्हारराव तळहातावर मूठ आपटीत आवेशानं म्हणतात— " नाही, नाही, शाहूराव, ते होणं नाही...ते होणार नाही. ब्रिटिश सरकारनं आम्हाला पदच्युत केलं तरी पर्वा नाही पण गादीचा वारस निवडण्याबाबत आम्ही कोणत्याही गोऱ्या अधिकाऱ्याचं दडपण जुमानणार नाही...कदापि नाही ! " ]

**शाहूराव :** सरकार, आपला संताप आम्हाला समजतो, पण दरबारचं एवढंच म्हणणं आहे की आपला हात दगडाखाली सापडला आहे. तूर्त तरी आपण—

**जिवाजी :** ( उपहासानं ) पडतं घ्यायला पाहिजे, हेच ना ? आमचा हात दगडाखाली सापडलाय म्हणजे झालंय तरी काय ? आम्ही युद्धाला मनापासून मदत करीत नाही

आणि राष्ट्रीय चळवळीला आमचा आतून पाठिंबा आहे, असं सरकारला वाटतं. तसं असेल तर सरकारनं आमची सरळ सरळ जाहीर चौकशी करावी आणि—

**शाहूराव :** जाहीर चौकशी करण्याएवढा पुरावा ब्रिटिश सरकारजवळ नाही हे तर उघडच आहे महाराज.

**जिवाजी :** आमचे वडील आठवे हिंमतबहाद्दर भोलेशंकर महाराज यांच्याबद्दल त्या वेळच्या मुंबई इलाख्याच्या गव्हर्नरसाहेबांनी असाच आरोप केला होता. भोलेशंकर महाराज आतून गुप्तपणे क्रांतिकारकांना शस्त्रास्त्रे आणि पैसे पुरवतात आणि लोकमान्यांचा सल्ला घेतात. गव्हर्नरसाहेबांनी खूप घोळ घातला आणि आमच्या वडिलांना अतोनात त्रास दिला; पण भोलेशंकर महाराज त्यांना पुरून उरले.

**शाहूराव :** ते सगळं खरं आहे महाराज पण—

**जिवाजी :** तुम्ही पीटर्सनसाहेबांना स्वच्छपणे कळवून टाका की आमच्या गादीच्या वारसाचा प्रश्न न्याय्य मार्गानं आम्हीच सोडवू. कृपा करा आणि तुम्ही मध्ये लुडबूड करू नका.

**शाहूराव :** पीटर्सनसाहेब म्हणाले की बाळराजांचे वडील राजकुमार जितेंद्र नेताजींच्या आझाद हिंद सैन्यात दाखल झाले होते व इम्फाळच्या लढाईत मारले गेले, याबद्दल निश्चित पुरावा लष्करी अधिकाऱ्यांना मिळाला आहे.

**जिवाजी :** असेल. त्याचा आमच्याशी आणि बाळराजांशी संबंध काय ? आणि संबंध आहे, असं सेक्रेटरीसाहेबांचं म्हणणं असेल तर तसं उघडपणे म्हणा आणि आमची जाहीर चौकशी करा. आम्ही त्याला केव्हाही तयार आहोत. फक्त दमदाटी करून आणि धाकदपटशा देऊन, मंजुळेच्या मुलाचा वारसा निमूटपणे आम्ही मान्य करू या भ्रमात मात्र त्यांनी राहू नये.

**शाहूराव :** कागदपत्रावरून तरी मंजुळेचा दावा भरभक्कम आहे हे आपल्याला सुद्धा मान्य करणं भाग आहे सरकार. आपण गोडीत हा हक्क मान्य केला तर बाळराजांची सगळी तरतूद आपल्याला सरळपणे करून ठेवता येईल.

**जिवाजी :** ती तसली तरतूद स्वीकारायला आमच्या सूनबाई तयार नाहीत. त्या तर गोऱ्या साहेबापेक्षा बड्या साहेबीण होऊन बसल्या आहेत. बॅरिस्टरसाहेब, तुम्ही हे सगळं मुकाट्यानं ऐकताहात. मुंबईला जाऊन तुम्ही काय शोध लावलात, काय विचार केलात, याबद्दल काही बोलला नाहीत तुम्ही ?

**शासाहेब :** विचारल्याशिवाय तोंड उघडायचं नाही, हा संस्थानी रिवाज सरकारांनीच मला एकदा शिकवला होता.

**जिवाजी :** भले, भले. ही शिस्त आम्हाला आवडते. आता आम्ही विचारतो. म्हणून तुमचा शोध आणि निष्कर्ष सांगा आम्हाला.

**शाहूराव :** तुम्ही मंजुळेचं वकीलपत्र घेतलंय बॅरिस्टरसाहेब ?

**शासाहेब :** दिवाणसाहेब मी फक्त न्यायाचं वकीलपत्र घेतलंय.

**जिवाजी :** आमची तीच इच्छा आहे बॅरिस्टरसाहेब.

**शासाहेब :** दिवाणसाहेब, तुम्हाला एकूण जी प्रमाणपत्रं मिळाली आहेत त्या आधारे हा दावा कसा उभा राहातो ते थोडक्यात सांगा मला.

**शाहूराव :** थोडक्यात घडलेल्या गोष्टी अशा आहेत बॅरिस्टरसाहेब, ( फाइल उघडून पाहात ) सुमारे बारा वर्षांपूर्वी मंजुळेचं पहिलं लग्न झालं होतं. दहा फेब्रुवारी १९३२ या दिवशी.

**शासाहेब :** बरोबर आहे.

**शाहूराव :** कोणी सिनेमातलाच एक चिंतामणी मारूलकर नावाचा असिस्टंट कॅमेरा-मन होता म्हणे.

**शासाहेब :** त्याचा विचार नंतर करू. पुढं सांगा.

**शाहूराव :** पुढं मंजुळेचं आणि तिच्या नवऱ्याचं पटेना. वर्षाभरातच तिनं क्रूर वागणुकीची तक्रार दाखल करून कोर्टातून घटस्फोट मिळवला. युवराज रणजीत तिच्या पाठीशी असावेत. कारण घटस्फोट मिळताच ११ एप्रिल १९३३ रोजी मंजुळेनं रणजीतजींशी विवाह केला.

**शासाहेब :** बरोबर आहे. पुढं बोला.

**शाहूराव :** १७ जानेवारी १९३४ ला प्रतापचा जन्म झाला.

**शासाहेब :** कुठं ?

**शाहूराव :** जानकी प्रसूतिगृह, अंधेरी... कोणी जानकीबाई शिरोळे यांच्या दवा-खान्याचा दाखला आहे.

**शासाहेब :** ठीक आहे. पुढं ?

**शाहूराव :** रणजीतपासून मंजुळा विभक्त झाली १९३४ साली. मुलाला घेऊन ती वेगळी राहू लागली. दोन वर्षांनी पुढं रणजीतच वारले.

**शासाहेब :** मंजुळेच्या पहिल्या नवऱ्याचं काय झालं ते नाही सांगितलंत शाहूराव ?

**शाहूराव :** मलाही ते माहीत नाही. पण घटस्फोटानंतर वर्षा-सहा महिन्यांतच तो क्षयानं वारला, असं बाई म्हणाल्या.

**शासाहेब :** असं बाई म्हणाल्या ! अस्सं... ! तर अशा एकूण फॅक्ट्स आहे म्हणता ! आणि त्यावरूनच तुमचा निष्कर्ष असा होतो की, रणजीतचा मुलगा म्हणून शारंग-धरच्या गादीवर फक्त प्रतापचाच हक्क शाबीत होतो. बरोबर आहे ?

**शाहूराव :** बरोबर आहे बॅरिस्टर साहेब.

**जिवाजी :** पण तुम्हाला या निष्कर्षाबद्दल काय म्हणायचंय, बॅरिस्टरसाहेब ?

[ तेवढ्यात रतन दप्तर घेऊन शाळेच्या युनिफॉर्ममध्ये येतो. ]

बोला बाळराजे, तुम्ही तुमच्या वाढदिवसानिमित्त वर्गातल्या सगळ्या मुलांना खाऊ वाटलात ?

**रतन :** तुम्ही वर्गातल्या मुलांना वाटायला सांगितलात की शाळेतल्या सगळ्या मुलांना आजोबा ?

**जिवाजी :** तुम्ही शाळेतल्या सगळ्या मुलांना खाऊ वाटलात ?

**शाहूराव :** तुमच्या खास मित्रांना खाऊ द्यायची योजना होती छोटे सरकार.

**रतन :** शाळेतली सगळीच मुलं माझी दोस्त झाली आहेत आजोबा. मग काय करणार ? दिवाणसाहेब, काही चुकलं का माझं ?

**शाहूराव :** तसं म्हणजे ( महाराजांकडं बघतात )

**रतन :** वाटल्यास आमच्या नेमणुकीतून कापून घ्या ते पैसे.

**जिवाजी :** ( मंद हसत ) कापून घ्यायला तुमच्या नेमणुकीचे पैसे आता उरलेत कुठं बाळराजे ? ते तर केव्हाच फस्त केलेत तुम्ही.

**रतन :** हात्तिच्या, एवढंच ना. मग आजोबा तुमच्या नेमणुकीची थैली उघडा ना आता. तुम्ही सुद्धा आता आमचेच झालात ना !

**जिवाजी :** ऐका दिवाणसाहेब ! यावर आहे काही उत्तर ? बाळराजे, तुमच्या अगंनं तुम्हाला तुमच्या वाढदिवसासाठी एक खास पोशाख शिवून पाठवलाय.

**रतन :** ( आनंदून ) खरंच सांगता आजोबा ? कुठाय ? कुठाय ?

**जिवाजी :** तुमच्या महालात, तुमच्या कपाटात ठेवलाय सटवाजीनं.

**रतन :** तो आता घालू आजोबा ?

**जिवाजी :** तर ? घालायलाच हवा. आज मेजवानी आहे नव्हे का वाड्यावर ? खूप खूप पाहुणे जमायचेत.

**रतन :** अगं सुद्धा येणार आहे ?

**जिवाजी :** तुम्ही नवा पोषाख चढवा, देवाला, वडील माणसांना नमस्कार करा, आणि अगंला दाखवायला म्हणून घरी जाऊन या. येते म्हणाली तर तुमच्या अगंला तुम्ही घेऊन या.

[ रतन आनंदाने– " हा आत्ता येतोच बघा " म्हणत धावत पळत सटवाजीला हाकारत वर जातो. ]

हूं ! तर बॅरिस्टरसाहेब, प्रश्न असा आहे की तुम्हाला शाहूरावांच्या निष्कर्षाबद्दल काय म्हणायचंय ?

**शासाहेब :** तसं मला बरंच काही म्हणायचंय सरकार. पण ते म्हणणं सांगण्यापूर्वी आपण माझी वकील फी मजूर केली पाहिजे.

**आक्का :** वकील फी ? तुम्ही बाबासाहेबांच्याकडून वकील फी घेणार आहात ? सदान् कदा कसली मेली थट्टामस्करी ?

**शासाहेब :** आक्कासाहेब महाराज, ही थट्टामस्करी नव्हे, हा माझा पोटापाण्याचा व्यवसाय आहे, व्यवसाय.

**जिवाजी :** ठीक आहे. मान्य आहे आम्हाला. बॅरिस्टरसाहेब, तुमची वकील फी किती आहे ते तर ऐकू द्या.

**शासाहेब :** सरकार, माझी वकील फी पैशात मागण्यासारखी नाहीये.

**जिवाजी :** ज्या कशात मागण्यासारखी असेल ते मागा. मागणी मंजूर करून टाकू. मग तर झालं.

**शासाहेब :** सरकार, आपल्या संस्थानच्या सर्वांगीण विकासासाठी आणि आम्हा आप्तेष्टांच्या जीवननौका जीवनसागरातून धडपणे पैलतीराला लागण्यासाठी, मागणी अशी आहे की आपण आणखी पंचवीस वर्षे तरी खणखणीत प्रकृतीनं जगलं पाहिजे.

**आक्का :** ही तुमची वकील फी काऽय ?

**शासाहेब :** नाही महाराज, ही वकील फीची प्रस्तावना.

**आक्का :** बाबासाहेब, यांचं बोलणं काही सरळ दिसत नाहीये. काहीतरी द्वाडपणा मनात आलाय.

**जिवाजी :** असू दे. बॅरिस्टरसाहेब, मुद्द्याची गोष्ट सांगा.

**शासाहेब :** मुद्द्याची गोष्ट अशी सरकार की, आपली प्रकृती या वयात खणखणीत राहायची तर जवळच्या नात्यातल्या कोणा जिव्हाळ्याच्या माऊलीनं तुमची अहोरात्र मायाममतेनं देखभाल करायला हवी. अशी माऊली तूर्त तरी आम्हाला एकच दिसते.

**जिवाजी :** ती म्हणजे आमची आक्का, होय ना ?

**शासाहेब :** छे छे सरकार भलतंच काय ? आपण साफ चुकलात. आक्कासाहेब महाराज माउली असतील, पण त्यांच्या नसानसांतून राजरक्त वाहात असल्यामुळं आयुष्यात त्यांनी कोणाची कधी देखभाल केली नाही की त्या कधी करणार नाहीत. उलट त्यांचीच सेवाचाकरी करण्यासाठी माझा जन्म झालाय अशी--

**आक्का :** कसे कसे बोलताहेत बघा बघा बाबासाहेब.

**शासाहेब :** सरकार, एक आठवण देतो. आमच्या लग्नाच्या वेळी श्रीमंत सौभाग्यकांक्षिणी आक्कासाहेब महाराजांना राजवाड्यातून पळवून नेताना मी आपल्याला एक पत्र लिहिलं होतं, आठवतंय का ?

**जिवाजी :** हो हो चांगलं आठवतंय.

**शासाहेब :** त्यात मी आपल्याला कळवलं होतं की– आम्ही 'एक दुजे के लिये' म्हणजे एकमेकांसाठीच जन्मलो आहोत, असा आम्हाला साक्षात्कार झालाय.

**जिवाजी :** होय, कळवलं होतंत. पुढं ?

**आक्का :** पुढं काय ? ते सगळं खोटं होतं असा नवा साक्षात्कार घडलाय आता यांना.

**शासाहेब :** चुकलात आक्कासाहेब महाराज. त्या साक्षात्काराचा खरा अर्थ इतक्या वर्षांनी मला उमजला. 'एक दुजे के लिये', म्हणजे एक जण सेवा चाकरी करण्यासाठी व दुसरा ती करून घेण्यासाठी.

**आक्का :** काय तोंड आहे म्हणून वाटेल ते बरळत सुटलात का काय ? तुम्ही माझी सेवाचाकरी केलीत ? आयुष्यभर ? आपल्या मुलांना आणि नोकराचाकरांना आणून उभं करू का तुमच्यासमोर ?

**जिवाजी :** चिडू नका आक्कासाहेब, बॅरिस्टरसाहेब तुमची थट्टा करताहेत. ते असो. पण मग वकीलसाहेब तुम्हाला जवळच्या नात्यातील जिव्हाळ्याची कोण माऊली सुचवायची होती ?

**शासाहेब :** बाळराजांच्या मातोश्री श्रीमती योगितादेवी. बाळराजांच्यासंगे तुम्ही त्यांनाही या राजप्रासादात राहायला लावलं पाहिजे. तो त्यांचा हक्क आहे आणि ती तुमची गरजही आहे. सरकार, हीच आमची वकील फी.

**आक्का :** हे एवढंस्सं सांगायला एवढा डोंगर पोखरायची काही गरज होती का ? बाबासाहेब, यांचा द्वाडपणा म्हणते तो हाच.

**जिवाजी :** वकीलसाहेब ही फी कसली ? ही तर आम्हाला देणगीच वाटते. पण सूनबाई फार अभिमानी आहेत. दाव्याचा निकाल त्यांच्या बाजूनं लागल्याशिवाय त्या इकडं पाऊलही घालणार नाहीत.

**शासाहेब :** हा तुमचा गैरसमज आहे सरकार.

**जिवाजी :** नाही बॅरिस्टर साहेब, हा आमचा अनुभव आहे, की अगदी जिव्हाळ्याच्या माणसाची मायाममता देखील, राजाच्या बाबतीत, फक्त सिंहासनाला चिकलेटली असते; माणसाला नाही.

**शासाहेब :** तुम्ही म्हणता ते सर्वस्वी खोटं आहे, असं मी म्हणत नाही सरकार, पण या अनुभवालाही काही अपवाद असतातच.

**जिवाजी :** अपवाद फक्त एकच– आमचे बाळराजे.

**शासाहेब :** आणि श्रीमती योगितादेवी.

**जिवाजी :** बॅरिस्टरसाहेब, आमची सूनबाई सज्जन आहे; साधी सरळ आहे; प्रेमळ मायाळू आहे. पण तिला आमच्याबद्दल जिव्हाळा नाही, मायाममता नाही. त्याबद्दल आमची तक्रारही नाही. कारण तिला आमच्याबद्दल जिव्हाळा, मायाममता वाटावी असं आम्ही तिच्यासाठी काहीही केलेलं नाही. काही केलं, घडलं असेल तर तिचा आमच्यावर राग व्हावा अशीच परिस्थिती आहे.

**शासाहेब :** सरकार या बाबतीत मात्र आपण साफ चुकलात. योगितादेवींना तुमच्याबद्दल काय वाटतं ते मला पूर्णपणे ठाऊक आहे.

**जिवाजी :** असेल देखील. पण ती काही या वाड्यात पाऊल टाकणार नाही. सोनचाफा गादीचा वारस होणार नाही हे कळल्यावर तर नाहीच नाही. त्यात तिचं काही फारसं चुकतंय असंही आम्हाला वाटत नाही.

**शासाहेब :** तुमचा हा अंदाजही बरोबर नाही, हे मी तुम्हाला प्रत्ययानंच सिद्ध करून दाखवतो. मग तर तुम्ही मानाल ?

**जिवाजी :** कसला प्रत्यय ? तुम्ही काय करणार आहात ?

[ तेवढ्यात नव्या थाटमाटाच्या पोशाखात रतन येतो. सुरवार, रेशमी अचकन, पायात चढाव... डोक्यावर मात्र काही नाही. युवराजांची खास तुरे असलेली पगडी हातात घेऊन सटवाजी मागोमाग येतो.]

**रतन :** ( येता येता ) नाही, नाही सटवाजी, मी आता काही युवराज नाहीये. आता मी ही पगडी घालणार नाही. परवासारखा फेटा बांधीन.

**जिवाजी :** बाळराजे आईसारखे जिद्दी आहेत. ( त्याला पोटाशी घेत ) बाळराजे, अजून निर्णय झाला नाही तोवर—

**रतन :** नाही आजोबा, ते अगंला आवडायचं नाही.

**जिवाजी :** बघा बघा बॅरिस्टरसाहेब काय राजतेज आहे !

[ रतन सगळ्यांना नमस्कार करतो. आक्कासाहेब त्याला जवळ घेऊन त्याला कुरवाळत—]

**आक्का :** त्याचे वडीलसुद्धा असेच राजबिंडे दिसायचे, नाही का बाबासाहेब

**शासाहेब :** त्यांचे वडीलच काय, पण वडिलांचे वडीलसुद्धा असेच राजबिंडे दिसायचे. खरंय ना दिवाणसाहेब ?

**जिवाजी :** दिवाणसाहेबांची नाही म्हणायची काय हिंमत आहे ?

**शासाहेब :** (सटवाजीच्या हातून पगडी घेऊन रतनच्या डोक्यावर घालीत) जरा बघू तरी बाळराजे, तुम्ही राजे म्हणून कसे शोभता ते वा... लाजबाब ! हां हां काढू नका. माझं भविष्य ऐकून ठेवा. शेवटी दहावे हिंमतबहाद्दर युवराज म्हणून ही पगडी तुम्हालाच घालावी लागणार आहे.

**आक्का :** कशावरून ? तुम्हाला साक्षात्कार झालाय वाटतं ? तुम्ही तर त्या बाईचं वकीलपत्र घेऊन बसला आहात आणि—

**शासाहेब :** मी फक्त न्यायाचं वकीलपत्र घेतलंय आक्कासाहेब महाराज.

**रतन :** ( पगडी काढून आजोबांना देत ) तरीसुद्धा आज नको. मी अगंला भेटायला जाऊन येऊ ना आजोबा ?

**जिवाजी :** जा, पण लवकर परत या बाळराजे. आज संध्याकाळी वाड्यावर वाढदिवसाच्या मेजवानीला खूप पाहुणेमंडळी यायची आहेत.

**रतन :** म्हणूनच आजोबा, अगंला ये म्हणून काही मी म्हणणार नाही. ती येणार नाही. आणि 'येत नाही' असं म्हणाली तर मला रडू येईल. आजच्या दिवशी मी रडता कामा नये, नाही का आजोबा !

**जिवाजी :** ( त्याला पोटाशी घेत ) कसा शहाणा आहे माझा बाळ. तुला उदंड उदंड आयुष्य लाभो.

[ तेवढ्यात अप्पू येतो. हातात बरीचशी कागदी पत्रांची पाकिटे आणि खांद्याला पिशवी अडकवलेली. त्याला पाहताच रतन हर्षभराने धावत जाऊन त्याला बिलगत– "अप्पू... तू आलास ?.... मुद्दाम माझ्या वाढदिवसासाठी म्हणून आलास ना ?" असं म्हणतो तशी—]

**अप्पू :** वकीलसाहेबांची कामगिरी होती. शिवाय तुझा वाढदिवस, मग यायला नको ? ( रतनला खांदे धरून नखशिखान्त न्याहाळत ) आयला...! सोन्या, सोंग तर अगदी झकास, एकदम गहिराबाज काढलं आहेस की रे ?

**रतन :** ( अस्वस्थ होत ) अप्पू, आजोबांना मुजरा....

**अप्पू :** ( गडबडून ) हो हो... विसरलोच.

**शासाहेब :** ते कागदपत्र दे इकडं. [ अप्पूकडून कागदपत्र काढूनच घेतात आणि घाईघाइने उघडून नजर फिरवतात व खिशात घालतात ]

**अप्पू :** ( मुजरा करीत ) मुजरा सरकार.

**रतन :** हा मुजरा नव्हे अप्पू, हा कुर्निसात झाला. तू काय माझ्या आजोबांना आदिलशहा समजलास ?

**अप्पू :** असं नव्हे का ? चुकलंच की ! ( पुन्हा मुजरा करीत ) मुजरा सरकार !

**रतन :** अरे अरे... ही बंदगी झाली. (स्वतः करून दाखवीत) याला म्हणतात मुजरा.

**अप्पू :** ( दाखवल्याप्रमाणे मुजरा करीत ) मुजरा सरकार ! बरोब्बर ?

[रतन मानेनं होय म्हणतो] सोन्या, राजवाड्यावर आज तुझं नाटकबिटक आहे का रे ?

**रतन :** नाटक ? असा कसा रे अप्पू ? हा काय नाटकातला पोशाख आहे ? अरे हा आहे खऱ्याखुऱ्या राजपुत्राचा पोशाख. माझ्यासाठी खास अगंनं शिवलाय.

**अप्पू :** असं नव्हे का ? मग आता तू खराखुरा राजा कधी होणार रे ?

**रतन :** ( नाकावर बोट ठेवीत दटावत) शूऽक ! काहीतरीच काय बोलतोस रे अप्पू. आजोबा आहेत की राजे आणि शंभरावर वर्षं जगणार आहेत. त्यांनी मला वचनच दिलंय तसं. होय ना आजोबा ? आता मी युवराज नसलो तरी तुम्ही मला दिलेलं वचन पाळलं पाहिजे बरं का आजोबा. विसरायचं नाही.

**जिवाजी :** तुमच्या वचनाला कोण विसरेल बाळराजे ?

**रतन :** अप्पू मी अगंला भेटायला जातो आहे. तू येतोस ?

**शासाहेब :** ( पत्राची घडी घालीत ) जरा थांबा छोटे सरकार. अप्पूची थोडी मला गरज पडणार आहे. तुम्हीसुद्धा थोड्या वेळानं निघालात तर आम्ही दोघंसुद्धा तुमच्याबरोबर येऊ.

**रतन :** मग थांबतो मी.

**शासाहेब :** अप्पू, अरे माझ्या मुख्य कामाचं काय केलंस ?

**अप्पू :** ( पिशवीतून पुडा काढीत ) पानांचं ना ? हा काय पुडा तयार !

**आक्का :** दे बाबा, अगोदर पान खाऊ घाल त्यांना. सकाळपासून वकीलसाहेबांचा जीव कासावीस झालाय. " अप्पू कसा आला नाही ? अप्पू कधी येणार ? " असा घोष करीत वाट बघताहेत कधीचे वकीलमहाराज.

[ दरम्यान अप्पूनं दिलेल्या पुड्यातून एक पानपट्टी काढून शासाहेब ती थाटात तोंडात ठेवतात. त्या क्षणी त्यांची मुद्रा खुलते आणि पान चघळत " वा वा ! अप्पू तू बहार केलीस बहार " असे खुषीत म्हणू लागतात. तेवढ्यात सटवाजी येतो आणि— ]

**सटवाजी :** (मुजरा करून ) छोट्या सरकारना भेटाया शाळंमदली मुलं आल्याती सरकार.

**रतन :** ( आनंदून ) होय ? कोण कोण आली आहेत रे ?

**जिवाजी :** ते त्याला कसं कळणार बाळराजे ? तुम्ही स्वतः जाऊन त्यांचं स्वागत केलं पाहिजे. त्यांना घेऊन खेळणीमहालात जा.

**रतन :** होय आजोबा. अप्पू, आलोच हं मी. ( धावत जातो. )

**सटवाजी :** सरकार, सांगायचं मंजी आपल्या भेटीसाठी मंजुळादेवी आल्याती.

**जिवाजी :** त्यांना सांग—

**शासाहेब :** श्रीमंत सरकार त्यांना तावडतोब भेटतील.

**जिवाजी :** बॅरिस्टरसाहेब त्या बाईचं पुन्हा कधी जन्मात तोंड पाहण्याची आमची इच्छा नाही.

**शासाहेब :** त्यासाठीच सरकारनी तिला हे शेवटचं भेटायला हवं. आज तिचा पुरता बंदोबस्त करायलाच हवा.

**जिवाजी :** आम्ही काय करायला हवं म्हणता बॅरिस्टरसाहेब ?

**शासाहेब :** आपण सर्वांनी स्वस्थ बसून मी काय करणार आणि बोलणार आहे ते ऐकायला हवं महाराज.

**जिवाजी :** ठीक आहे. मंजुळेला घेऊन ये सटवाजी.

**सटवाजी :** जी सरकार. ( जाऊ लागतो )

**शासाहेब** : सटवाजी आणखी एक काम आहे. मंजुळादेवींना इथं आणल्यावर, ताबडतोब योगितादेवींच्या घरी जायचं आणि त्यांना सांगायचं, "रक्तदाबावर गुणकारी औषधाची एक मुळी मागल्या खेपेला मी त्यांना दिली होती, ती ताबडतोब हवीय. श्रीमंतांची प्रकृती बिघडलीय. त्यांना मात्रा उगाळून द्यायचीय."

**सटवाजी** : आंऽ (श्रीमंतांच्याकडं संशयानं बघतो.)

**जिवाजी** : हा काय प्रकार आरंभला आहेत बॅरिस्टरसाहेब ?

**आक्का** : काहीतरी नवा द्वाडपणा सुरू करायचा बेत दिसतोय.

**शासाहेब** : जा सटवाजी, मी सांगितल्यापेक्षा एक वाक्यही की शब्दही जास्त बोलायचा नाही. मुळी घ्यायची आणि माघारी यायचं.

**सटवाजी** : (मुजरा करीत) जी सरकार. (जातो)

**जिवाजी** : जावईबापू, आम्हाला खुलासा हवाय.

**शासाहेब** : या गोष्टीचा खुलासा सटवाजी परत आल्याबरोबर आपोआप होईलच सरकार. तूर्त मी फार महत्त्वाची माहिती तुम्हाला देणार आहे. मंजुळा इथं येण्यापूर्वी. आक्कासाहेब महाराज, मी अप्पूची जी वाट पाहात होतो, ती काही पानतंबाखूसाठी नाही. (दाखवीत) या या कागदपत्रासाठी. खरोखर सरकार, तुम्ही आम्ही सर्वांनीच या अप्पूचे ऋणाइत राहिलं पाहिजे. त्यानं फार मोठी कामगिरी केलीय. वस्तुस्थिती अशी आहे शाहूराव, बारा वर्षांपूर्वी मंजुळेचं लग्न ज्या माणसाशी झालं होतं, तो चिंतामणी मारूलकर नव्हे. त्याचं नाव चिमण मारूलकर आणि तो या अप्पूचा थोरला भाऊ. तो अजून चांगला जिवंत आहे. चिमणचं आणि मंजुळेचं कधीच पटलं नव्हतं. पण लग्नापूर्वी तिला चिमणपासून दिवस गेले म्हणून चिमणला तिच्याशी लग्न करावं लागलं.

**जिवाजी** : गुड गॉड ! म्हणजे प्रताप हाऽऽ—

**शासाहेब** : चिमणचा मुलगा. त्याचा जन्म एक वर्ष आधी झालाय.

**शाहूराव** : पण जानकी प्रसूतिगृहानं दिलेलं बर्थ सर्टिफिकेट तर—

**शासाहेब** : ते सर्टिफिकेट साफ खोटं आहे. जानकी प्रसूतिगृह वगैरे काहीही अस्तित्वातच नाही. जानकीबाई नावाच्या एका दरिद्री सुईणीचा दोन खोल्यांचा ब्लॉक आहे तो. मंजुळा प्रसूत झाली ती सेंट मेरी चॅरिटेबल ट्रस्टच्या हॉस्पिटलमधे. हे त्याबद्दलचं अस्सल सर्टिफिकेट.

[शाहूराव ते सर्टिफिकेट घेऊन न्याहाळतात आणि– ]

**शाहूराव** : शंकाच नाही सरकार. एवढ्या एका पुराव्यानं मंजुळाबाईंची लबाडी सिद्ध होईल.

**शाहूराव** : एवढं एकच पत्र नाही शाहूराव. रणजीतजींचा आणि मंजुळेचा, या

मुलाला कुठं ठेवायचा, याबद्दल पत्रव्यवहारही झालाय. त्यात मंजुळेनं प्रताप हा चिमणचा मुलगा असल्याचा स्पष्ट उल्लेख केलाय. अप्पूनं ही सगळी पत्रं चिमण-कडून मिळवून मला आणून दिली. रणजीतजींना मंजुळा हवी होती पण हा मुलगा नको होता. चिमणला हा मुलगा हवा होता पण मंजुळा नको होती या सगळ्याला प्रत्यक्ष साक्षी असलेला एकच माणूस आहे. हा अप्पू. त्या वेळी हा लहान मुलगा होता. अवघा दहा वर्षांचा.

**जिवाजी :** पण आम्हाला आश्चर्य वाटतं, या मंजुळेला एवढं कपट कारस्थान करण्याची हिंमत कशी झाली ? तिला आमची भीती, आमचा धाक, दरारा काही कसा वाटला नाही ?

**शाहूराव :** तिच्या पाठीशी आणखी कोणीतरी आहे सरकार.

**शासाहेब :** ते आणखी कोणीतरी म्हणजे खुद्द पोलिटिकल खात्याचे सेक्रेटरी पीटर्सन-साहेबच आहेत. याचीही मी शहानिशा करून घेतलीय महाराज.

**जिवाजी :** पण आमच्या विरुद्ध एवढा दुष्टावा करण्याची पीटर्सनला गरज काय पडली होती ?

**शासाहेब :** सरकार, आपल्या कारकीर्दीत शारंगधर संस्थानचा पुरोगामी आणि प्रगतिशील संस्थान म्हणून जो बोलबाला झाला होता तो पीटर्सनला बघवत नव्हता. संस्थानच्या कारभारात हस्तक्षेप करायची आपण त्याला एकदाही कधी संधी दिली नाहीत. म्हणून त्याला हवा असलेला वारस तुमच्यावर लादण्याचा त्याचा प्रयत्न होता.

**जिवाजी :** बॅरिस्टरसाहेब, आमच्या वतीनं तुम्ही एकदा त्या पीटर्सनला भेटून खण-खणीतपणे बजावलं पाहिजे की—

**शासाहेब :** सरकार, आपली संमती न घेता, माझा शोध पुरा झाला तेव्हा, पीटर्सनला मी त्याच्या ऑफिसमधे जाऊन सुनावून आलोय. श्रीमंतांच्या वतीनं ही केस मी प्रीव्ही कौन्सिलपर्यंत लढवणार आहे आणि त्यात पीटर्सनला पार उघडानागडा करून त्याची फटफजिती करणार आहे, याची त्याला पुरती खात्री पटवून मी इथं आलोय.

**जिवाजी :** बघा, बघा दिवाणसाहेब, खालसातले वकील कसे निर्भीड आणि किती बाणेदार असतात, ते बघून ठेवा.

[ तेवढ्यात सटवाजी येतो. ]

**सटवाजी :** सरकार, मंजुळाबाई आल्यात.

**शासाहेब :** पाठवून दे त्यांना इकडं. [ सटवाजी 'जी सरकार' म्हणून जातो. ] सरकार, बोलण्याचं काम फक्त मी आणि अप्पू करणार आहोत.

**जिवाजी :** ठीक आहे. तुमच्या मर्जीप्रमाणं होऊ या.

[ तेवढ्यात मंजुळा येते आणि— ]

**मंजुळा :** ( येता येताच ) श्रीमंत सरकार मला आपल्याला असं विचारायचं आहे की–

**शासाहेब :** जस्ट वेट. मंजुळाबाई मला तुम्ही ओळखत असाल ?

**मंजुळा :** ( धुमसत ) मी तुम्हाला चांगलीच ओळखून आहे. तुमच्यासारखे वकील इतक्या उलट्या काळजाचे असतील––

**शासाहेब :** कोणाची काळजं कशी बसली आहेत त्याचा निकाल आता लागणारच आहे. तुम्ही या तरुणाला ओळखत असाल बहुधा ?

**मंजुळा :** ( अप्पूला पाहून चकारत ) क...कोण ? ( सावरीत ) हा कोण ? मला माहीत नाही. मी याला ओळखीत नाही. याला कधी पाहिल्याचंही मला आठवत नाही.

**अप्पू :** काय बाता मारती आहेस बये. मी अप्पू. तुझ्या पहिल्या नवऱ्याचा, चिमणचा मी धाकटा भाऊ. सेंट मेरीच्या इस्पितळात प्रतापच्या वेळी तू बाळंतीण होतीस, त्या वेळी चिमण स्वयंपाक करायचा आणि मी तुझा सकाळ-संध्याकाळ जेवणाचा डबा घेऊन यायचो, खाल्ल्या अन्नाला तरी स्मरशील की नाही बये ?

**मंजुळा :** खोटं आहे. साफ खोटं बोलतोय हा माणूस. प्रतापचा जन्म मुळी सेंट मेरी इस्पितळात झालेलाच नाही. जानकीबाई प्रसूतिगृहात मी बाळंतीण झाले होते. सरकार, मी आपल्याला जानकीबाईंनी दिलेलं प्रतापचं बर्थ सर्टिफिकेट दिलं होतं, नाही का ?

**शासाहेब :** ते सर्टिफिकेट खोटं होतं.

**मंजुळा :** खोटं ? असं कसं होईल. वाटल्यास आपण स्वतः जानकीबाईंना भेटून—

**शासाहेब :** मी भेटून, सगळी चौकशी करून आलोय. जानकीबाई ही एक खाजगी बाळंतपण करणारी सुईण आहे. तिचं प्रसूतिगृह वगैरे काहीही नाहीये. हे एक सर्टिफिकेट तिच्याकडून मिळवण्यासाठी तुम्ही आणि तुमचे पीटर्सनसाहेब यांनी काय काय उद्योग आणि उपद्व्याप केलेत, त्याची सगळी माहिती मी लेखी मिळवलीय.

**मंजुळा :** माझा तुमच्यावर विश्वास नाही. तुम्ही वकील लोक खऱ्याचं खोटं करण्यात आणि साक्षीदार फोडण्यात पटाईत असता.

**शाहूराव :** मंजुळाबाई, सेंट मेरी हॉस्पिटल ही एक नामवंत संस्था आहे. आणि प्रतापच्या जन्माचं खरं सर्टिफिकेट आत्ता मुंबईहून हा अप्पू घेऊन आलाय. पाहायचंय तुम्हाला ?

**मंजुळा :** ( चिडून ) कुठला कोण हा अप्पू ? त्याचा काय संबंध ? सरकार, या वकिली कारवाईवर आपण फसू नये. माझा मुलगा आपल्या रक्ताच्या नात्याचा. त्याचं राजबिंडं रूप पाहिलंत तरी तुमची खात्री पटेल की तो आपलाच वारसदार. मी सांगते हा– हा अप्पू एक हलक्या जातीचा पानवाला आहे. आपल्या सुनेपेक्षा

तुम्ही या पानवाल्याच्या शब्दावर विश्वास ठेवणार का ?

**शासाहेब :** मंजुळाबाई, इतक्यात तर तुम्हीच म्हणत होता की अप्पूला तुम्ही ओळखत नाही.

**मंजुळा :** पानवाला म्हणून ओळखते मी याला थोडाफार.

**शासाहेब :** पण याला कधी पाहिल्याचंही तुम्हाला मघाशी आठवत नव्हतं.

**अप्पू :** सगळ्या थापा हो या बाईच्या. अहो ही बया पानतंबाखूसाठी रोज माझ्या ठेल्यावर यायची. उधारी थकली तशी गायब झाली.

**मंजुळा :** हे सगळं खोटं आहे. मी मुळी पानतंबाखूच खात नाही.

**शाहूराव :** मंजुळाबाई, हे सांगण्यापूर्वी विड्यानं रंगलेलं तोंड धुऊन इथं यायची तरी काळजी घ्यायचीत !

**शासाहेब :** बाई, तुमचा पहिला नवरा वारला म्हणून तुम्ही लिहून दिलं आहेत तुमच्या ॲफिडेव्हिटमध्ये.

**मंजुळा :** हो.... होय. ते त्याच वेळी वारले.

**शासाहेब :** पण ते खरं नाहीये. चिमण अजून जिवंत आहे. इथं आलेलासुद्धा आहे. त्याला बोलावून घेऊ ?

**मंजुळा :** चिमण इथं आलाय ? कधी ? केव्हा ? कशासाठी ? त्या दुष्ट हलकटाचं मला कधी पुन्हा तोंडही पहायचं नाहीये.

**शासाहेब :** ' पुन्हा कधी ' म्हणजे ? पूर्वी कधी पाहिलं होतंत ? आणि तो दुष्ट हलकट कसा झाला ? तुमचा नवरा मेलाय म्हणालात ना ?

**मंजुळा :** माझ्या दृष्टीनं मेल्यातच जमा झालाय.

**शासाहेब :** हां हांऽ तुमच्या दृष्टीनं ! पण माणसं अशी मरत नाहीत मंजुळाबाई. उलट नको त्या वेळी ती नेमकी भुतासारखी सत्य घेऊन उभी राहतात.

**अप्पू :** सरकार, या बाईला आपल्या मुलाला घेऊन येऊ द्या इथं. तो मुलगा माझी आणि बापाची ओळख बरोब्बर सांगेल.

**शासाहेब :** अप्पू तुला ठाऊक नाही, या बाईंनी आपल्या मुलालासुद्धा पढवून तयार ठेवलेला असेल. पण त्याची काही गरज नाहीये. मंजुळाबाई, युवराज रणजीतशी लग्न करण्यापूर्वी त्यांचा तुमचा काही पत्रव्यवहार झाला होता ?

**मंजुळा :** असेल. मला आत्ता आठवत नाही.

**शासाहेब :** युवराजांची पत्रं चिमणच्या ताब्यात आहेत आणि सध्या ती आमच्या स्वाधीन झाली आहेत.

**मंजुळा :** काय आहे त्या पत्रात ?

**शासाहेब :** विशेष काही नाही. फक्त लग्नानंतर चिमणपासून झालेल्या प्रतापची

व्यवस्था तू काय करणार आहेस, असं युवराजांनी पत्रात तुम्हाला विचारलंय.

**मंजुळा :** ते पत्र तुमच्या हाती कसं लागलं ?

**अप्पू :** वकीलसाहेबांना मी ते आणून दिलं. हेच नव्हे. आणिक पुष्कळ पत्रं दिली आहेत मी त्यांना. पार बाराच्या भावात काढतील त्यातील एकेक पत्र तुला.

**मंजुळा :** ( संतापानं ) अरे पण चांडाळा तू हे का केलंस ? कशासाठी केलंस ? अरे तुझा पुतण्या, भावाचा मुलगा, संस्थानचा राजा होण्यात आपल्या सगळ्यांचा केवढा फायदा होणार आहे, याचा तरी पोच ठेवायचास !

**शासाहेब :** दॅटस ऑल ! श्रीमंत सरकार या बाईंनी आपल्या सर्वांच्या समक्ष आपल्या अपराधाची आणि हेतूची अगदी स्पष्ट शब्दांत कबुली दिलीय. तेव्हा ही सगळी केसच संपलीय.

**मंजुळा :** नाही नाही... मी चुकून बोलून गेले ! मी चुकून बोलून गेले.

**शासाहेब :** बरोबर आहे मंजुळाबाई, तुम्ही चुकूनच बोलून गेलात पण नेमकं खरं काय आहे ते बोलून चुकलात. आता सारवासारवी करण्याचा काहीही उपयोग होणार नाही. सगळा लेखी पुरावासुद्धा तुमच्याविरुद्ध जाणार आहे.

**मंजुळा :** ( प्रचंड क्रोधानं अप्पूला उद्देशून ) हरामखोरा, चांडाळा, तुझं तळपट होईल. तुझी सगळी माणसं अंगात किडे पडून—

**शाहूराव :** ( कडाडत ) खबरदार मंजुळाबाई, तोंड संभाळून बोला. तुम्ही श्रीमंतांच्या समोर उभ्या आहात. तुम्ही खुद्द श्रीमंतांना फसवण्याचा घाट घातलात. गादीच्या लोभानं खोटे कागदपत्र सादर केलेत. तुम्हाला मी इथल्या इथं गिरफ्तार करू शकतो. पोलिस केस झाली तर या गुन्ह्याबद्दल तुम्ही सात वर्षं तुरुंगात सक्तमजुरी-साठी जाल. ज्यांनी तुम्हाला भरीला घातलं ते साहेब हात झटकून मोकळे होतील आणि तुम्हाला मात्र शिक्षा भोगावी लागेल. युवराज रणजीतजींनी तुमच्याशी लग्न करून काही काळ संसार केला होता, एवढ्याचसाठी मी तुम्हाला पोलिसांच्या स्वाधीन करीत नाहीये. पण हीच तुमच्यावर मेहेरबानगी आहे हे समजून तुम्ही तात्काळ शारंगधर संस्थानची हद्द सोडून चालत्या व्हा आणि पुन्हा असल्या उपद्व्यापात पडू नका. जड जाईल, फार फार जड जाईल.

**मंजुळा :** ( दीनवाणेपणे ) श्रीमंत सरकार, माझं चुकलं. क्षमा करा. पण आपल्या मुलाची मी बायको म्हणून काहीतरी माझी तरतूद आपण कराल तर—

**जिवाजी :** बाई, तुम्हाला बाहेर जाण्याचा रस्ता ठाऊक आहे. तुम्ही ताबडतोब आपला मार्ग सुधारावा हे बरं !
[ मंजुळा संतापानं पाय आपटून पुटपुटत चालती होते. ती गेल्यावर] दिवाणसाहेब, रणजीतची बायको म्हणून तिच्यावर काही उपकार करण्याची गरज वाटते का

तुम्हाला ?

**शाहूराव :** सरकार, तूर्त आपण काहीही करू नये. एवढ्यावरून ती धडा शिकते आहे की आणखी काही उपद्व्याप करते आहे, यावर आपल्याला डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवायला हवं.

**जिवाजी :** बॅरिस्टरसाहेब, तुम्ही आज फार मोठी कामगिरी पार पाडली आणि आमच्या छातीवरचं ओझं दूर केलंत. अप्पू, तुझ्या चांगुलपणाला तर सीमा नाही. केवळ सोनचाफ्यावरील प्रेमानं तू मंजुळेचं कारस्थान उघडकीला 'आणलंस. तुम्हा दोघांना आमचे त्रिवार धन्यवाद.

**आक्का :** बाबासाहेब, अप्पूनं जी कामगिरी केली त्याबद्दल त्याला विशेष बक्षीस द्यायला हवं आपण.

**जिवाजी :** अवश्य! त्याचा विचार जरूर केला जाईल. पण जावईबापू तुमच्यासारख हुशार, कर्तबगार आणि गुणी जामात आम्हाला मिळाला याचा आम्हाला सानंद अभिमान वाटतो.

**शासाहेब :** पण सरकार, आपल्या या सानंद अभिमानात सौ. आक्कासाहेब महाराज अंशतः तरी सहभागी आहेत का ?

**जिवाजी :** अर्थात असणारच! राजघराण्यातील स्त्रियांना पतीच्या पराक्रमाचं कौतुक कसं करावं, हे सांगावं लागतं का ?

**आक्कासाहेब :** बाबासाहेब, वकीलसाहेबांना जी शंका आलीय ती रास्तच आहे. खाई त्याला खवखवे म्हणतात ते हे असं. काय हो, या मंजुळेचा कावा तुम्हाला तपशील-वार आधी माहीत होता की नाही ?

**शासाहेब :** तसं म्हणजेऽऽ—

**आक्का :** आता तुम्ही उगीच सारवासारवी करू नका. तुमच्या सगळ्या कळा मी ओळखून आहे. इतके दिवस आमच्या झोपा उडाल्या होत्या, काळजीनं प्रत्येकजण आपआपल्यापरी चूर होता आणि तुम्ही काय सगळ्यांची मजा बघत होता ?

**शासाहेब :** तसं नाही आक्कासाहेब महाराज—

**आक्का :** चला, काही एक बोलू नका. तुमच्या जवळची सगळी पानं आम्हाला उलगडून दाखवली असतीत तर—

**शासाहेब :** आक्कासाहेब महाराज, वकिली करणाऱ्याला इतकी तडकाफडकी आपली पानं उलगडून दाखवून चालत नाही. तसं केलं तर पक्षकार त्याच्या हातावर चणे-फुटाणेच ठेवूनच निरोप देईल.

**आक्का :** आम्ही काय पक्षकार आहोत तुमचे ? बाबासाहेब यांना एक दमडीसुद्धा तुम्ही द्यायची नाही. मुलगी दिलीय हेच उपकार आहेत असं समजा, म्हणून सांगा त्यांना.

**जिवाजी :** आक्कासाहेब पतिराजांना असं बोलू नये. राजघराण्यातील स्त्रिया—

**आक्का :** बाबासाहेब, मी आता राजघराण्यातील स्त्री राहिले नाही. यांच्यासारखीच पक्की भटीण झालेय मी भटीण. नवऱ्याला कसं वळणावर आणायचं ते मी पक्कं जाणते. तुम्ही आमच्यात पडू नका.

**जिवाजी :** बॅरिस्टरसाहेब, हे तुमचं प्रकरण तुम्हीच संभाळा.

**शासाहेब :** संभाळलंय, संभाळतोय आणि संभाळणार आहे. एक दुजे के लिये. शाहूराव, तुम्ही आता श्रीमंतांच्या तर्फे पीटर्सनला खलिता धाडा. हा सगळा पुरावा सादर करा आणि पत्राची एक प्रत माझ्याकडे पाठवा. मी दिल्लीला जाणार आहे त्या वेळी मला या पत्राची गरज लागेल.

**शाहूराव :** आपण सांगाल त्याप्रमाणं सगळी तरतूद होईल, बॅरिस्टरसाहेब. तुमच्यामुळं आज हा आनंदाचा दिवस उगवला हे आम्ही कधीच विसरणार नाही.

**जिवाजी :** दिवाणसाहेब, गेले काही दिवस आम्ही चिंताग्रस्त होतो. आमची प्रकृतीही हाताबाहेर जाते की काय असं वाटू लागलं होतं पण—

[ तेवढ्यात योगिता येते. हातात एक चांदीची छोटी वाटी ]

**योगिता :** पण महाराज मला मात्र आत्ता सटवाजी औषधाची मुळी मागायला आला तेव्हाच समजलं.

**जिवाजी :** तसं नाही सूनबाई—

**योगिता :** जी गोष्ट मुंबईहून येणाऱ्या पाहुण्यांना समजते ती इथं एका हाकेच्या अंतरावर राहणाऱ्या मला मात्र कळत नाही, हे बरं नाही सरकार. आपण मला दिलेला शब्द पाळला नाहीत.

**जिवाजी :** तसं नाही सूनबाई. तशी आमची प्रकृती ठणठणीत आहे.

**योगिता :** आधी ही मात्रा घ्यावी. ( चांदीची वाटी पुढं करते)

**जिवाजी :** पण खरोखरीच सूनबाई...आम्हाला काहीही झालं नाहीये.

**शासाहेब :** तरी सुद्धा सरकार ती मात्रा आपण घ्यावीच. अपाय तर काही होणार नाहीच. पण त्या मात्रेत सूनबाईंची आपल्याबद्दलची मायाममताही उगाळली गेलीय; त्यामुळं आपल्याला नवी दृष्टी येईल.

[ जिवाजी मल्हरराव बोटानं मात्रा चाखू लागतात. ]

**योगिता :** मी एक गोष्ट आपल्याला स्पष्टपणे सांगण्यासाठी आलेय. रतनच्या युवराज-पदाचा प्रश्न मी प्रतिष्ठेचा मानलेला नाही मंजुळादेवी आणि त्यांचा प्रताप काही एका वारसा हक्कानं या राजवाड्यात राहायला आल्यावर, आमच्या इथं राहण्यानं गुंतागुंत वाढेल, सरळ संबंध बिघडतील—त्यांचे आमचे, म्हणून गोडीत दूर राहणं बरं असं माझं मत होतं.

**जिवाजी :** पण सूनबाई आता तो प्रश्न संपलेला आहे.

**योगिता :** तसा तो प्रश्न संपणारा नाहीये. पण मी माझ्याकडून संपवलेला आहे. गादी कोणाला मिळणार याचा तुम्ही त्रास करून घेणार असलात तर गादीचा वारस सरळ मंजुळादेवींच्या प्रतापला करून टाका असं मी सांगायला येणार होते. रतनला आणि मलाही गादीपेक्षा त्याचे आजोबा हवे आहेत हे तर मी मागंच सांगितलंय.

**जिवाजी :** पण आता त्याचा काय सवाल उरलाय ?

**योगिता :** आपण योग्य तोच निर्णय घेतला आहे हे मला ठाऊक आहे. तरी सुद्धा केवळ तुम्हाला बरं वाटणार असलं तर मी रतनला घेऊन इथं राहायला तयार आहे.

**जिवाजी :** तयार आहे म्हणजे ? नाहीतर जाणार कुठं ?

**योगिता :** तेही मी तुम्हाला सांगितलं होतं. पण आता माझा विचार बदलला. या वयात तुम्हाला एकट्याला एकाकी सोडून मी मुलाला घेऊन मुंबईला दूर राहणं हे बरं नाही. रतनच्या वडिलांना ते मुळीच आवडलं नसतं. म्हणून आम्ही इथंच राहायचं ठरवलंय. फक्त तुम्ही एकदा मंजुळादेवींशी बोलून त्यांची संमती घेतलीत—

**जिवाजी :** हे तू काय बोलतेस सूनबाई ? मंजुळेची...त्या त्या निर्लज्ज, बदमाश, बेशरम बाईची संमती ? तू आणि बाळराजे इथं या राजवाड्यात राहण्याबद्दल ? ती काय म्हणून ?

**योगिता :** महाराज, पूर्वी आपला माझ्यावर राग होता; तसा आता मंजुळादेवींच्यावर झालेला दिसतोय.

**जिवाजी :** त्याच लायकीची ती बाई आहे.

**योगिता :** तरी सुद्धा महाराज तिचा मुलगा आपलाच नातू आहे.

**जिवाजी :** खोटं आहे. प्रताप आमचा नातू नाही.

**योगिता :** खोटं कसं असेल ? म्हणून तर आपण प्रतापचा वारसा मान्य केलात, हे तर खरं आहे ना ?

**जिवाजी :** प्रतापचा वारसा आम्ही मान्य केला ? कोणी सांगितलं तुला हे ?

**योगिता :** मी इकडं यायला निघाले तेव्हा मला मंजुळादेवी भेटल्या. त्यांनीच तर मला आनंदाची वार्ता दिली.

**जिवाजी :** ही काय आनंदाची वार्ता होती ? तसं खरंच घडतं तर आमच्यावर आकाश कोसळलं असतं.

**शाहूराव :** योगितादेवी, वस्तुस्थिती नेमकी उलट आहे. मंजुळाबाईंचं सगळं कपट कारस्थान उघडकीला आलं. तिचा मुलगा प्रताप हा तिच्या पहिल्या नवऱ्याचा चिमणचा, म्हणजे अप्पूच्या थोरल्या भावाचा मुलगा आहे हे सिद्ध झालं; म्हणून श्रीमंतांनी तिला संस्थानातून हद्दपारीचा हुकूम दिलाय.

**शास्त्राहेब :** तरीसुद्धा जाता जाता योगितादेवींना खोटं सांगून तिनं कसा वळसा दिला ते पाहा शाहूराव. मंजुळा ही हाडाचीच दुष्ट बाई आहे. तिच्यासाठी सरकार आपण कसलीही तरतूद करू नये.

**जिवाजी :** सूनबाई, बाळराजे आता निःशंकपणे गादीचे वारस दहावे हिंमतबहाद्दर झाले. आमच्या आयुष्याच्या सायंकाळी आमच्या बागेत देवाच्या कृपेनंच हा सोनचाफा बहरतो आहे. आम्ही फार फार सुखी आहोत.

**आक्का :** योगिता आम्हाला सगळ्यांना इतका आनंद झालाय, तसा तुला झाला नाही ?

**योगिता :** आनंद होणार नाही कसा ? पण महाराज मंजुळादेवींच्या अपराधाला आपण क्षमा करावी. तिच्या हातून जे घडलं त्याचं कारण तिच्या दारिद्र्यात आहे. तेवढ्यासाठी त्या मायलेकरांना आपण रस्त्यावर सोडून पोरकं करू नये पोरकेपणाचं दुःख अपार अपार असतं. मी ते भोगलंय. आक्कासाहेब, कदाचित तुम्हाला हे समजणार नाही. आणि देवकृपेनं समजण्याची वेळ येऊ नयेही. पण डोळ्यांतून ओघळणाऱ्या अश्रूंसंगे कधीकाळी शिळी भाकर खावी लागली म्हणजे पुढं तूप-साखरेला लावून खाल्लेल्या पोळीचीसुद्धा चव नाहीशी होते.

**जिवाजी :** ठीक आहे सूनबाई, तुझ्या इच्छेप्रमाणं सगळं होईल. दिवाणसाहेब, मंजुळेला आणि तिच्या मुलाला योग्य ती नेमणूक करून द्या.

[ तेवढ्यात रतन धावत धापा टाकीत येतो आणि आजोबांना बिलगून ]

**रतन :** आजोबा, माझ्या शाळेतल्या मित्रांनी माझ्यासाठी काय काय गमतीजमती आणल्या आहेत, ते पाहायला चला तर खरे. ( अप्पूजवळ जात ) अप्पू गड्या तू रागावला तर नाहीस ना ! अरे माझे मित्र मला मुळी सोडेनातच. इथं आल्या-पासूनच सगळीच माणसं माझ्यावर इतकं प्रेम करतात की काही विचारू नकोस.

**अप्पू :** सोन्या, तुझ्यासाठी मी एक छानदार पण छोटीशी भेट आणलीय. प्रेमानं घेशील का रे ? किंमत काय फार नाहीये, पण—

**रतन :** हे काय बोलतोस रे तू अप्पू ? प्रेमानं दिलेल्या भेटवस्तूची किंमत कधीही पैशात करायची नसते— असं कोण म्हणतं ते सांग पाहू ? Pl note that

**अप्पू :** तुझी 'अगं'...दुसरं कोण ?

[ योगिता दरम्यान मागे अंधारात जाते ]

**रतन :** करेक्ट ! आता काय आणलं आहेस माझ्यासाठी ते काढ बाहेर.

**अप्पू :** ( पिशवीतून एक रंगीबेरंगी रुमाल काढून रतनच्या गळ्याला बांधत) सोन्या, तुला एक सांगून ठेवतो—

**रतन :** नेहमीचंच ना ? मला ठाऊक आहे रे !

**अप्पू :** काय ठाऊक आहे रे ?

**रतन :** तेच ना— मोठा झालास म्हणजे राज्य नेकीनं करायचं, प्रजेवर प्रेम करायचं लोक साले हरामखोर, लुच्चे, पक्के चारसोबीस असले तरी !

**अप्पू :** बरोब्बर त्याची तुला आठवण राहावी म्हणून हा रुमाल. निढळाच्या घामाच्या कमाईचा, बरं का. काळ्या बाजाराच्या हरामीचा नाही.

**रतन :** पण अप्पू, चारसोबीस म्हणजे काय ?

**अप्पू :** चारसोबीस म्हणजे...म्हणजे ना ? अप्पूची उधारी बुडविणारे भामटे.

**रतन :** आजोबा, अप्पूची ही भेट किती छान आहे नाही ?

**जिवाजी :** छानच आहे. पण बाळराजे, आम्ही तुमच्यासाठी काय भेट आणलं आहेत ते नाही विचारलंत तुम्ही ?

**रतन :** ( उत्सुकतेनं ) कोणती भेट आणलीत आजोबा ? दाखवा ना.

**जिवाजी :** सूनबाई—

[तशी संथ पावलानं प्रसन्न हसऱ्या मुद्रेनं योगिता पुढं येते.]

बाळराजे, ही आमची तुम्हाला वाढदिवसाची भेट.

**रतन :** ( आश्चर्यानं ) अगं तू...तू आलीस ? इथं राहायला आलीस ? आता मला कध्धी कध्धी सोडून जाणार नाहीस ना ?

[ हे म्हणताच पाणावल्या डोळ्यांनी आईला जाऊन बिलगतो. ती त्याला पोट घेत ]

**योगिता :** नाही रे राजा... आता तुला सोडून मी कध्धी कुठं जाणार नाही.

**रतन :** ( आईला सोडून आजोबांना बिलगत ) आजोबा, तुम्ही इतके चांगले आ इतके चांगले आहात.... ( म्हणत तो त्यांच्या दोन्ही गालाचे पापे घेतो. )

[ मग जिवाजी मल्हारराव ' इकडं माझ्यासंगे बसा या शाही आसनावर ' म्हणत ते त्याला मांडीवर घेऊन बसतात आणि ]

**जिवाजी :** सूनबाई, तुझ्या शुभहस्ते ही पगडी घाल तू बाळराजांच्या मस्तकावर.

[ योगिता ती पगडी रतनच्या डोक्यावर चढवीत असतानाच— ]

बाळराजे, दहावे हिंमतबहाद्दर युवराजपदाची ही पगडी. तुम्ही आजपासून गा वारस झालात.

[ त्याच वेळी रोषणाई सुरू होते आणि बाहेरच्या मैदानात दारूकामालाही प्रा झाल्याचे खिडक्यांतून दिसते. बँडही वाजू लागतो. आणि तशातच खाली येतो— — पडदा. ]

Very good drama

**अंक तिसरा संपला**

IRBK-0121911



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र....29599 नों. दि 28/8/16